१ जानेवारी १८१८
कोरेगाव भीमा लढाईचे
वास्तव




COLUMN AT CORYGAUM.

ॲड. रोहन जमादार (माळवदकर)
जयस्तंभ 'इन-चार्ज' जमादार खंडोजीबीन गजोजी माळवदकर यांचे वंशज

१ जानेवारी, १८१८

कोरेगाव भीमा लढाईचे वास्तव

ॲडव्होकेट रोहन बाळासाहेब जमादार (माळवदकर)



कोरेगाव भीमा लढाईचे अस्सल समकालीन संदर्भ पुरावे, लढाईला जातीय रंग देण्यासाठी इतिहासाचे विकृतीकरण आणि वास्तव मुद्दे, जयस्तंभचा इतिहास, इंग्रजांचे जातीवादी धोरण आणि त्या विरोधात डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयस्तंभ भेट. हे सर्व जाणून घेण्यासाठी हे पुस्तक आवर्जून वाचले पाहिजे.

या पुस्तकाची किंमत ६० रुपये आहे पण समाजापर्यंत सत्य इतिहास पोहचला पाहिजे या हेतूने मी पुस्तकाची पीडीएफ कॉपी मोफत वितरित करीत आहे. तरी स्वेच्छामूल्य देण्यासाठी सोबत क्यू आर कोड स्कॅन करू शकता किंवा 08796373883 वर ऑनलाईन पेमेंट करू शकता. तसेच ज्यांना हे पुस्तक विकत घ्यायचे आहे त्यांनी खालील लिंक वर जावे...

https://www.bookganga.com/R/8GW8W

सत्यमेव जयते !

१ जानेवारी, १८१८- कोरेगाव भीमा लढाईचे वास्तव

लेखक : ॲडव्होकेट रोहन बाळासाहेब जमादार (माळवदकर)

© **प्रकाशक / मुद्रक**
भूमिका प्रकाशन, पुणे.
यशवंत अपार्टमेंट, चैत्रबन सोसायटी,
नवी सांगवी, पिंपळे गुरव, पुणे ४११०६१
फोन नंबर - +९१ ८७९६३७३८८३
ईमेल- bhumikaprakashan21@gmail.com

लेखन सहाय्य : श्री. सौरभ वीरकर

प्रथम आवृत्ती : ७ डिसेंबर, २०२१
दुसरी आवृत्ती : २२ नोव्हेंबर, २०२२

मुखपृष्ठ व मलपृष्ठ रचना: श्री. देवदत्त प्रकाश बलकवडे

मूल्य : रु. ६०/-

ISBN : 978-81-955013-0-4

मुखपृष्ठ टीप : सदर छायाचित्र इंग्रजांनी बनविलेल्या जयस्तंभाच्या अंतिम आराखड्यातील रेखाचित्र आहे. हा आराखडा इंग्रजांचा पुण्यातील अधिकारी कॅप्टन नट याने तयार केला होता.

देशाच्या संरक्षणासाठी
सर्वोच्च बलिदान देणाऱ्या
भारतीय सैनिकांना
ही पुस्तिका अर्पण...

अनुक्रमणिका

•••

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने...

सप्रेम नमस्कार,

मी ॲडव्होकेट रोहन बाळासाहेब जमादार (माळवदकर). १ जानेवारी, १८१८ रोजी पुणे जिल्ह्यातील कोरेगाव भीमाच्या लढाईत शौर्य गाजविणारे जमादार खंडोजीबीन गजोजी माळवदकर यांचा मी सातवा वंशज आहे.

१८१७-१८१८ दरम्यान झालेल्या तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धशृंखलेतील एक अनिर्णायक लढाई कोरेगाव भीमा येथे लढली गेली. नोव्हेंबर १८१७ मध्ये झालेल्या खडकी व येरवडा येथील लढाईनंतर आणि फेब्रुवारी १८१८ मधील आष्टी येथील लढाईपूर्वी, १ जानेवारी १८१८ रोजी कोरेगाव भीमा परिसरात ही घटना घडली. या लढाईत इंग्रजांचे नेतृत्व कॅप्टन फ्रान्सिस स्टाँटनकडे होते. इंग्रजी सैन्यात 'बॉम्बे नेटिव्ह ईन्फंट्री, मद्रास आर्टिलरी आणि पूना ऑक्सिलरी हॉर्स' या पलटणी होत्या. ज्यात काही युरोपीय सैनिकांबरोबरच इथल्या विविध जाती धर्माचे सैनिक होते. त्याचप्रमाणे मराठा सैन्यातही विविध जाती धर्माचे सैनिक होते. कोरेगाव भीमाची लढाई चालू असताना स्वतः साताऱ्याचे छत्रपती प्रतापसिंह भोसले हे दुसरे बाजीराव पेशवे यांसह फौजेसोबत होते. तिसरे इंग्रज-मराठा युद्ध व कोरेगाव भीमाच्या या अनिर्णायक लढाईचे तत्कालीन अस्सल संदर्भ, कागदपत्र उपलब्ध आहेत. त्यांचा अभ्यास केल्यास ही जातीअंताची लढाई नव्हती हे समजते.

तत्कालीन समाज व्यवस्थेत जातीभेद असले तरी अव्वल मराठेशाहीत महार बांधवांना कधीच सैन्यात प्रवेश बंदी नव्हती. अगदी पेशव्यांच्या सैन्यातही महार सैनिकांनी पराक्रम गाजविल्याचे ऐतिहासिक संदर्भ उपलब्ध आहेत. तसेच १८१८ पूर्वी व नंतरही इंग्रजांच्या सैन्यात महार सैनिक होते व त्यांनी इंग्रजांच्या बाजूने अनेक लढायांमध्ये भाग घेतला, शौर्य दाखविले. तरीही जातीवादी कारणांमुळे इंग्रजांनी महार बांधवांना आपल्या सैन्यात प्रवेश बंदी केली. कोरेगावच्या लढाईच्या स्मरणार्थ इंग्रजांनी जयस्तंभ उभारला, तिथेच उभे राहून १ जानेवारी, १९२७ रोजी

डॉ. आंबेडकरांनी इंग्रजांच्या विरोधात आंदोलन पुकारले होते. डॉ. आंबेडकरांनी कोरेगावच्या युद्धास जातीअंताची लढाई कधीच म्हटलेले नाही. १९२७ नंतर डॉ. आंबेडकर पुन्हा कधी जयस्तंभाला गेल्याचे आढळून येत नाही. १ जानेवारीला विजयदिन अथवा शौर्यदिवस म्हणून साजरा करा असेही डॉ. आंबेडकरांनी कधीच सांगितले नाही.

जयस्तंभास भेट दिली त्यावेळी आपल्या भाषणात डॉ आंबेडकरांनी महार सैनिकांनी इंग्रजांच्या बाजूने लढावे ही काही विशेष अभिमानाची गोष्ट नाही असे म्हटले होते. डॉ आंबेडकरांचे म्हणणे आम्हालाही पटते. लढाईच्या स्मरणार्थ इंग्रजांनी जयस्तंभ उभारला आणि त्याचे 'इन-चार्ज' म्हणून आमचे पूर्वज खंडोजीबीन गजोजी माळवदकर यांची नियुक्ती केली म्हणून आम्ही कधीही मोठेपणा मिरवला नाही. पण त्यांनी लढाईत शौर्य गाजविल्याने इंग्रजांनी त्यांना जयस्तंभाची जबाबदारी दिली हे सत्य आहे. इंग्रजांनी त्यांना दिलेली सनद आजही आमच्याकडे आहे. तीच लष्करी परंपरा सुरु ठेवत माझे पणजोबा कै. गुलाबराव बाबुराव जमादार माळवदकर यांनी भारतीय सैन्यात मराठा लाईट ईन्फंट्री मध्ये सेवा बजावली व १९६० साली ते निवृत्त झाले.

माझे वडील सुभेदार मेजर ऑनररी कॅप्टन बाळासाो आनंदराव जमादार माळवदकर (सेवानिवृत्त) यांनीही देशसेवेसाठी सैन्यात जाण्याचा निर्णय घेतला. २८ जुलै १९८२ रोजी ते भारतीय सैन्यात भरती झाले. ३२ वर्षे भारतीय सैन्याच्या मराठा लाईट इन्फंट्रीमध्ये त्यांनी देश सेवा केली. जम्मू काश्मीर, पूर्वोत्तर भारतात बॉर्डरवर अनेक वर्षं खडतर परिस्थितीत काम केले. उत्तम कामगिरीसाठी जुलै १९९९ मध्ये त्यांना जनरल ऑफिसर कमांडिंग इन चीफ दक्षिण कमान द्वारे प्रशंसापत्र मिळाले आहे. त्यांना राष्ट्रपतींचे प्रशंसापत्रही मिळाले आहे. त्यांनी काँगो देशात संयुक्त राष्ट्र संघाच्या मोहिमेत भाग घेतला आहे. १ मे २०१४ रोजी ते सेवा निवृत्त झाले.

खोटा इतिहास मोठ्या प्रमाणात सांगितला जात आहे हे समजल्याने २०१५ पासून माझ्या वडिलांनी कोरेगावच्या लढाईचे व जयस्तंभाचे समकालीन पुरावे, मूळ ऐतिहासिक संदर्भ, कागदपत्र जमा करायला सुरुवात केली. मी त्यांना या कामात मदत करत होतो. मोडी लिपीतील कागदपत्रांचा अभ्यास करण्यासाठी आम्हाला श्री.संदीप महाळू शिवले यांची मोलाची मदत झाली. महाराष्ट्र शासनाचा

मोडी लिपी प्रशिक्षण वर्गही मी पूर्ण केला. कोरेगावच्या लढाईत प्रत्यक्ष सहभागी इंग्रज अधिकाऱ्यांचे पत्रव्यहार व अन्य समकालीन महत्त्वाचे दस्तऐवज, जयस्तंभ बांधणीबाबतचे कागदपत्र आणि इतर माहिती खूप कष्टाने आम्ही मिळवली आणि त्याआधारेच ही पुस्तिका लिहिली आहे.

जयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी पूर्वी भारतीय सैनिक आणि अधिकारी येत असत. पण एका लष्करी लढाईला जातीय रंग दिल्याने भारतीय सैन्याने जयस्तंभाला येणे बंद केले. जयस्तंभावर इंग्रजांनी जी माहिती आणि सैनिकांची नावे कोरलेली आहेत ते वाचले तरी हे एक लष्करी स्मारक असून त्याचा कोणत्याही जाती धर्माशी संबंध नाही हे सहज समजते. तरीही जातीअंताच्या नावाखाली समाजात जातीय तेढ निर्माण होईल अशा पद्धतीने कोरेगावच्या लढाईचा खोटा इतिहास मांडला जात आहे. जातिभेदांमुळे महार सैनिक पेशव्यांच्या विरोधात लढण्यासाठी इंग्रजांच्या सैन्यात सामील झाले आणि कोरेगावच्या लढाईत ५०० महार सैनिकांनी २८,००० ब्राह्मण सैनिकांचा पराभव केला असा खोटा आणि जातीवादी प्रचार काही लोक करत आहेत. हे योग्य नाही. या लढाईत इंग्रजांच्या बाजूने जे महार सैनिक लढले त्यांचे नेतृत्व सिदनाक महार यांनी केले असेही सांगितले जाते. मात्र हे साफ खोटे आहे. सिदनाक महार मराठ्यांकडील वीर योद्धा होते. ते कधीही पेशव्यांच्या विरोधात लढल्याचे पुरावे नाहीत. १ जानेवारी, १८१८च्या कोरेगाव भीमा लढाईविषयी कोणत्याही समकालीन संदर्भ, कागदपत्रात सिदनाक महार यांचा उल्लेख सापडत नाही. काही गट तर कोरेगावच्या लढाईला स्वातंत्र्याचे बंड म्हणतात, जे वास्तव नाही.

मी सोशल मीडियाच्या माध्यमातून कोरेगावच्या लढाईची खरी माहिती देण्यास सुरुवात केली तर काही समाज कंटकांनी माझ्यावर घाणेरड्या भाषेत टीका केली, मला धमक्या दिल्या, माझे व माझ्या बहिणीचे अश्लील चित्र तयार करून सोशल मीडियावर पोस्ट केले. याबाबत पोलिसांत तक्रारीही दाखल केल्या आहेत. काही लोकांनी माझ्या वडिलांनाही धमक्या दिल्याने त्यांनाही पोलीस संरक्षण देण्यात आले होते. इतकेच नव्हे तर जयस्तंभाच्या जागेवरून आमच्या कटुंबाला हटविण्याचे प्रयत्नही सुरु आहेत. या अन्यायाविरोधात आम्ही शासन दरबारी, सरकारकडे वारंवार तक्रारी केल्या तसेच न्यायालयातही गेलो. सध्या प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने त्याबाबत अधिक लिहिणे उचित होणार नाही. माहिती अधिकारात प्राप्त पोलिसांच्या

अहवालानुसार तर १ जानेवारी २०१८ रोजी जयस्तंभाशेजारील आमच्या कुटुंबाच्या घरावर हल्ला करण्याचे नियोजन असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने तेथे संरक्षण देण्यात आले होते. अशा प्रकारे खोट्या इतिहासामुळे समाजात जी तेढ निर्माण झाली आहे त्याचा प्रत्यक्ष अनुभव आम्ही घेत आहोत. आणि म्हणूनच सामाजिक सलोखा कायम राहावा या उद्देशाने संदर्भ पुराव्यांच्या आधारे दोन शतकांपूर्वी झालेल्या कोरेगाव भीमाच्या लढाईचे वास्तव सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न या पुस्तिकेच्या माध्यमातून केला आहे. कोरेगाव भीमा लढाई, जयस्तंभाची उभारणी, डॉ. आंबेडकरांची जयस्तंभ भेट आणि इंग्रज विरोधी आंदोलन, विविध प्रकारे होणारा खोटा प्रचार आणि वास्तव यावर प्रकाश टाकणारी माहिती पुस्तिकेत दिलेली आहे.

यथायोग्य पुराव्यानिशी सत्य इतिहास समाजबांधवांपर्यंत पोहोचावा म्हणून अभ्यासाअंती तयार झालेल्या पुस्तिकेच्या प्रकाशनाची जाहीर घोषणा मी दि. १२ डिसेंबर २०२१ रोजी सोशल मीडियावरून केली. त्यानंतर लगेच पुढच्या काही दिवसात मला वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमधून पुस्तिका प्रकाशन थांबविण्यासाठी म्हणून तीन नोटीसा आल्या. सदर नोटीसामध्ये नमूद केले गेले की, ''आपण प्रकाशित करीत असलेल्या पुस्तकात कोणत्याही जाती धर्मामध्ये मतभेद होऊन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे, तरी दि.१ जानेवारी २०२२ नंतर पुस्तकाचे प्रकाशन करावे व दि.१२ डिसेंबर २०२१ रोजीची फेसबुक पोस्ट काढून टाकावी.''

पुस्तिका वाचनाच्या आधीच आलेल्या तीन नोटिसा वाचून माझ्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणल्याचा मला निश्चित खेद होता तरीसुद्धा प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचीच माझी भूमिका होती. माननीय पोलीस प्रशासनाच्या नोटिसचे पालन करत मी दि.०२/०१/२०२२ रोजी पुस्तिकेची पहिली प्रत पोलिसांना दिली व त्यानंतर दि. १८/०१/२०२२ रोजी श्रीमंत राजे मुधोजी भोसले (नागपूरकर भोसले) यांच्या हस्ते पुस्तिकेचे प्रकाशन केले. या सर्व आणि पुढील काळात देखील विविध समाजबांधवांकडून माझ्यावर अत्यंत हीन शब्दात टिका करण्यात आली. याची झळ माझ्या कुटुंबाला देखील पोहोचली आहे. तथापि मी सत्य इतिहास समाजापुढे मांडण्यासाठी कटिबद्ध आहे.

काही वाचकांनी केलेल्या सूचनांनुसार पुस्तिकेमध्ये यथायोग्य बदल केले आहेत. त्यांच्या प्रतिसादासाठी मी सदैव ऋणी आहे. त्याचप्रमाणे सर्वच वाचकांनी या पुस्तिकेच्या पहिल्या अवृत्तीला भरघोस प्रतिसाद दिला त्यासाठी सुद्धा मी सर्वांचा आजन्म ऋणी राहीन.

मी भारतीय संविधानाला, कायद्याला श्रेष्ठ मानतो. माझ्या मनात सर्व जाती-धर्मांविषयी आदर आहे. ही पुस्तिका लिहिताना कोणालाही दुखवायचा माझा हेतू नाही. आपण सर्वांनी ही पुस्तिका आवर्जून वाचावी. जे संदर्भ पुरावे दिले आहेत त्याबाबत विचार करावा, शहानिशा करावी. तसेच पुस्तिकेतील कोणताही मजकूर चूक आहे असे पुराव्यांसह दाखवून दिले तर तशी दुरुस्ती करण्याचे आश्वासन मी देतो.

देशाच्या संरक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या भारतीय सैनिकांना मी ही पुस्तिका अर्पण करीत आहे.

जय हिंद !

ॲडव्होकेट रोहन बाळासाहेब जमादार (माळवदकर)

•••

पुस्तिकेविषयी प्रसिद्ध झालेल्या काही बातम्या.

सकाळ पुणे, बुधवार, १९ जानेवारी २०२२



पत्रकार भवन, पुणे : '१ जानेवारी १८१८ : कोरेगाव भीमा लढाईचे वास्तव' या पुस्तिकेचे प्रकाशन करताना श्रीमंत राजे मुधोजी भोसले. या वेळी (डावीकडून) सौरभ वीरकर, ॲड. रोहन जमादार-माळवदकर, भोसले आणि बाळासाहेब जमादार-माळवदकर.

'कोरेगाव भीमा'चे वास्तव समजून घ्या : राजे मुधोजी भोसले

पुणे, ता. १८ : ''इतिहासाचा सखोल अभ्यास करून सत्य समोर आणणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण मूळ संदर्भांचे वाचन केले पाहिजे. यूट्यूब आणि सोशल मीडियावरून उपलब्ध होणारी माहिती परिपूर्ण नसते. सामाजिक ऐक्यासाठी कोरेगाव भीमाच्या लढाईचे वास्तव समजून घेतले पाहिजे,'' असे मत नागपूरचे श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांनी मंगळवारी (ता. १८) व्यक्त केले.

कोरेगाव भीमा लढाईतील इंग्रजांकडील सैनिक व जयस्तंभाचे इन्चार्ज जमादार खंडोजी माळवदकर यांचे सातवे वंशज असलेले ॲड. रोहन जमादार (माळवदकर) यांनी लिहलेल्या '१ जानेवारी १८१८ : कोरेगाव भीमा लढाईचे वास्तव' या पुस्तिकेचे प्रकाशन भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

सेवानिवृत्त भारतीय लष्करी अधिकारी कॅप्टन बाळासाहेब जमादार-माळवदकर या वेळी उपस्थित होते. ॲड. शिवाजी कोकणे, मोडी कागदपत्र अभ्यासक संदीप शिवले यांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

या वेळी बोलताना भोसले म्हणाले, ''लेखकाने पुराव्यानिशी कोरेगाव भीमा लढाईची माहिती पुस्तिकेत दिली आहे. म्हणूनच मी त्याचे प्रकाशन करण्यास होकार दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वांना समान मानून, सोबत घेऊन मोठे कार्य केले. तोच आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण जगले पाहिजे. इंग्रजांनी डिव्हाईड अँड रूल' तत्त्वाचा अवलंब केला. आपण समाजात फूट पडू द्यायची नाही. त्यासाठी आपल्या संविधानातील तत्त्वांचा अभ्यास, प्रचार केला पाहिजे.'' तर ॲड. जमादार म्हणाले, ''समकालीन संदर्भ पुराव्यांसह कोरेगाव भीमा लढाईचा सत्य इतिहास पुस्तिकेत दिलेला आहे. इंग्रज-मराठा तिसऱ्या युद्धातील एक अनिर्णायक लढाई कोरेगाव भीमा येथे झाली. या लढाईत दोन्ही सैन्यांत विविध जाती धर्मांचे सैनिक होते. खुद्द छत्रपती प्रतापसिंह महाराज हे लढाईच्या वेळी दुसरे बाजीराव पेशवे यांच्यासह फौजेसोबत होते. या लढाईच्या इतिहासाला धरून काही लोक सोईस्कर आणि संदर्भहीन मांडणी करतात. मूळ ऐतिहासिक कागदपत्रांचा अभ्यास केल्यास ही काही जातीअंताची लढाई नव्हते हे समजते.'' सौरभ वीरकर यांनी सूत्रसंचालन केले.

The Indian Express

दि. ०४ जानेवारी २०२२

KOREGAON BHIMA BATTLE

'Both British and Peshwa forces had soldiers from lower and upper castes'

According to book by descendant of British soldier in-charge of Jaystambh

CHANDAN HAYGUNDE
PUNE, JANUARY 3



Advocate Rohan Jamadar holds a copy of his book.

A DESCENDANT of a soldier who was in 1824 appointed as in-charge of the Jaystambh has penned a book on the battle of Koregaon Bhima. The Jaystambh, a military monument at Perne village in Pune district, was erected by the East India Company in 1821 in memory of its soldiers who fought against the Maratha forces at Koregaon Bhima on January 1, 1818.

The British, on December 13, 1824, appointed soldier Kandojibin Gajoji Jamadar (Malvadkar), who was injured in the battle, as the in-charge of the Jaystambh. Now, his seventh-generation descendent, advocate Rohan Jamadar, from Pune has written a book in Marathi titled '1 January 1818 Koregaon Bhima Ladhaiche Vastav (Facts of the battle of Koregaon Bhima)'.

"The book in Marathi gives information about the battle of Koregaon Bhima based on authentic contemporary historical documents and evidence, collected by me and my father, retired Indian Army officer Honorary Captain Balasaheb Jamadar. Many of these references have been submitted before the Koregaon Bhima Commission of Inquiry," said advocate Rohan.

"After I announced the book in December, the Pune city and Pimpri-Chinchwad police issued notices asking me to publish it after January 2, citing law and order problems. The police also asked me to delete my Facebook post about the book. This was shocking as they issued notices without reading the book. But respecting the police, I followed the instructions in the notice and gave the first copy of my book to the Sangvi police station on January 2. The book is now available."

As per a Dalit narrative, a British Army comprising 500 soldiers from the Dalit Mahar community defeated a 25,000-strong force of the Peshwas in the battle. Lakhs of people, mainly from the Ambedkarite Mahar community, visit the Jaystambh on January 1 to pay tribute to the soldiers who, they believe, fought a war for freedom against casteism during the Peshwa rule.

But advocate Rohan, who is from the Maratha community, says, "Going by contemporary records, both the British and Peshwa forces consisted of soldiers from different lower and upper castes and religions. Even the details inscribed by the British on the Jaystambh are enough to show that this battle cannot be linked to any particular caste or community."

"The book also has a chapter on Dr B R Ambedkar's visit to the Jaystambh in 1927. Dr Ambedkar visited the Jaystambh only once and delivered a speech against the casteist decision of the British government to ban the entry of the then untouchable Mahar community in the Army. There are no original records to show that Dr Ambedkar ever visited the Jaystambh again," said Rohan.

"The book aims to stop the distortion of the history of the battle of Koregaon Bhima that my ancestors had fought and clear several misconceptions about it. If anyone points out mistakes in the book based on authentic references, I will make the corrections," he said.

प्रकरण १

मराठेशाहीचा इतिहास

शिवाजी महाराजांनी १६४५ साली वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी तोरणा किल्ला जिंकला व जुलमी सत्तेविरूद्ध रणशिंग फुंकले. गनिमी–काव्यासारखे युद्धतंत्र, सुनियोजित मोहिमा व मुत्सद्दी धोरण अवलंबून त्यांनी मराठा साम्राज्याचा पाया रचला. असहिष्णू इस्लामी सत्तेविरुद्धच नव्हे तर वसाहतवादी पोर्तुगीज,इंग्रज यांच्या विरोधातही लढा दिला. जनतेच्या आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक रक्षणासाठी त्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. १६७४ मध्ये रयतेची कणव असलेल्या ह्या जाणत्या राजाचा राज्याभिषेक झाला. त्यानंतर सहा वर्षांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला. मराठेशाहीतील समकालीन संदर्भात वेळोवेळी झालेल्या उल्लेखांवरून, १६७४ ते १८१८ पर्यंतच्या मराठा साम्राज्याच्या ह्या संपूर्ण अस्तित्वाला 'शिवशाही' म्हटले गेले आहे.

१६८० मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर १६८१ मध्ये त्यांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी अभिषिक्त झाले. १६८१ पासून १६८९ पर्यंत छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यविस्ताराचे धोरण स्वीकारले. ८ वर्षांच्या कारकिर्दीत छत्रपती संभाजी महाराजांनी पोर्तुगीज, सिद्दी आणि मुघल अशा आघाड्यांवर यशस्वी तोंड देत राज्याची आणि प्रशासनाची घडी बसवली. त्यांना वेळप्रसंगी स्वकियांशी देखील लढावे लागले. १६८९ साली छत्रपती संभाजी महाराज औरंगजेबाच्या कैदेत अडकले. औरंगजेबाच्या आदेशावरून, शरियानुसार सलग चाळीस दिवस अमानुष छळ करून छत्रपती संभाजी महाराजांची ११ मार्च १६८९ रोजी वढू (बुद्रुक) येथे क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेबासमोर मान न झुकवता, धर्माभिमान स्मरून मरण यातना स्वीकारल्या आणि मृत्युंजय झाले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांचे कनिष्ठ बंधू राजाराम स्वराज्याचे तिसरे छत्रपती झाले. स्वराज्याच्या अतिशय प्रतिकूल काळात (१६८९ ते १७००) त्यांनी संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या विश्वासू सेनापतींच्या साहाय्याने नेतृत्व केले. कारकिर्दीच्या मोठ्या कालखंडात त्यांनी तामिळनाडूतील जिंजी येथून स्वराज्याची धुरा सांभाळली. ३ मार्च, १७०० रोजी छत्रपती राजाराम महाराजांचे सिंहगडावर निधन झाले.निधनानंतर त्यांची विधवा पत्नी ताराराणी यांनी त्यांचा पुत्र शिवाजीच्या नावाने

साम्राज्याचे नियंत्रण मिळवले. ताराराणी यांनी मुघलांच्या विरोधात शौर्याने मराठ्यांचे नेतृत्व केले. प्रचंड सैन्य आणि साधन सामुग्री घेऊन स्वराज्य गिळंकृत करण्यासाठी दक्षिणेत आलेला औरंगजेब येथे असताना १७०६पर्यंत उत्तरेकडे कूच करत मराठ्यांनी नर्मदा नदी ओलांडली होती.छत्रपती संभाजी महाराजांच्या दुर्दैवी मुत्यूनंतर अतिशय प्रतिकूल परिस्थितीत औरंगजेबाशी सलग १८ वर्ष ज्याप्रकारे मराठ्यांनी झुंज दिली असा कडवा प्रतिकार जगाच्या इतिहासात तुरळकच पाहायला मिळेल. हिंदवी स्वराज्य बळकाविण्यात औरंगजेब अखेर अपयशी ठरला व १७०७ साली महाराष्ट्रातच मरण पावला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र शाहू यांची पुढचा मोगल बादशाहा बहादूरशाहने मुक्तता केली. मुक्तता झाल्यानंतर शाहू (प्रथम) यांनी मराठा सिंहासनावर हक्क सांगितला आणि ताराराणी यांना आव्हान दिले. वारसा हक्काच्या वादातून १७०७ नंतर मराठा साम्राज्याची सातारा व कोल्हापूर अशी दोन सत्ताकेंद्रे तयार होत गेली.ज्यावर पुढे १७३१ च्या वारणा कराराने शिक्कामोर्तब झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून अष्टप्रधान मंडळात पेशवा/पंतप्रधान हे पद अस्तित्वात होते. शामराज नीळकंठ रांझेकर हे पहिले पेशवा होत. त्यानंतर महाराजांनी पेशवा हे पद मोरोपंत पिंगळ्यांना दिले. मोरोपंत पिंगळे यांच्या मृत्यूनंतर पेशवा पद त्यांचे चिरंजीव नीळकंठ पिंगळे यांच्याकडे आले तर नीळकंठ पिंगळे यांच्या मृत्यूनंतर पेशवा पद त्यांचे बंधू बहिरोपंत पिंगळे यांच्याकडे आले.छत्रपती शाहू (प्रथम) आणि ताराराणी यांच्यात उद्‌भवलेल्या अंतर्गत संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, ताराराणींशी एकनिष्ठ असलेल्या कान्होजी आंग्रे यांनी बहिरोपंत पिंगळे यांना कैद केले होते. त्यांना सोडविण्याची जबाबदारी शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ भट यांचेवर सोपविली. बाळाजी विश्वनाथ यांनी बहिरोपंत पिंगळे यांना यशस्वीरित्या, सुखरूप सोडवून आणल्यानंतर शाहू महाराजांनी पेशवा हे पद बाळाजी विश्वनाथ भट यांच्याकडे सोपविले.

१७१२ साली फर्रुखसियार याने स्वत:ला मुघल बादशहा म्हणून घोषित केले होते. सत्ताग्रहण करण्यात त्याला सय्यद बंधूंची मदत घ्यावी लागली. कालांतराने दोन्ही सय्यद बंधू आणि फर्रुखसियार यांच्यामध्ये वैर निर्माण झाले. स्वराज्याचे तत्कालीन पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी या संधीचा फायदा घेत सय्यद बंधूंशी वाटाघाटी केल्या. यामुळे मराठ्यांना मुघल बादशाहाच्या विरोधात लढण्यासाठी नवी तरफ मिळाली. मराठा सैन्य आणि सय्यद बंधूंच्या सैन्याने एकत्रित दिल्लीला कूच केले आणि फर्रुखसियारला मुघल बादशहा पदावरून बाजूला केले. या मदतीच्या बदल्यात, बाळाजी विश्वनाथ यांनी आधी झालेल्या वाटाघाटींप्रमाणे भरीव मोबदला


घेतला. त्यानुसार शाहू महाराजांनी दक्षिणेत मुघलांशी सहकार्याचे धोरण स्वीकारले. त्या बदल्यात शाहू महाराजांना दक्षिणेतील भूभागावर स्वतंत्र मराठा साम्राज्य घोषित करणारी फर्माने दिली गेली. तसेच गुजरात, माळवा आणि दक्षिणेतील मुघलांच्या ताब्यात असलेल्या सहा प्रांतांचे चौथ आणि सरदेशमुखी वसुलीचे हक्क व अधिकार प्राप्त झाले.या करारानुसार शाहू महाराजांच्या मातोश्री व छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी, येसूबाई यांनाही मुघल कारागृहातून सोडण्यात आले. शाहू महाराजांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रोत्साहनाने जे जे मराठा सरदार पुढे आले त्यामध्ये नागपूरकर भोसल्यांचाही समावेश होता. नागपूरकर भोसल्यांनी पूर्व भारतामध्ये पराक्रम गाजवीत मराठ्यांचा दबदबा निर्माण केला आणि साम्राज्य विस्तारास हातभार लावला.

एप्रिल १७१९ मध्ये बाळाजी विश्वनाथ यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र बाजीराव यांची छत्रपती शाहू महाराजांनी पेशवा म्हणून नियुक्ती केली. अवघ्या विशीत त्यांनी पेशवेपदाची जबाबदारी स्वीकारली. बाजीराव पेशव्यांनी आपले बंधू चिमाजी अप्पा व राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर, उदाजी पवार अशा मातब्बर सरदारांसोबत मराठा साम्राज्याचा विस्तार केला. वीस वर्षांच्या अभूतपूर्व कारकिर्दीत त्यांच्या नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या एकाही लढाईत मराठा सैन्याला हार पत्करावी लागली नाही, पर्यायी मराठा साम्राज्याचा प्रदीर्घ विस्तार झाला. पहिले बाजीराव पेशवे यांच्या पश्चात, त्यांचे पुत्र बाळाजी बाजीराव (नानासाहेब) यांना शाहू महाराजांनी पेशवा म्हणून नेमले. शाहू महाराजांचा १७४९ मध्ये मृत्यू झाला. १७५८-५९ दिल्लीच्या राजकारणात उद्‌भवलेल्या राजकीय पोकळीचा फायदा घेऊन, नानासाहेबांचे बंधू रघुनाथराव यांनी मराठा सैन्यासह पंजाबपर्यंत धडक मारली. १७६० मध्ये दक्षिणेत हैदराबादच्या निजामाचा पराभव केल्यानंतर, मराठा साम्राज्य भौगोलिकदृष्ट्या भारताच्या मोठ्या भूभागावर राज्य करत होते. मात्र अफगाणी नेतृत्वाखालील तयार झालेल्या सैन्याने (ज्यात रोहिले नजीब खान, शुजा-उद्-दौला यांचा समावेश होता) १४ जानेवारी १७६१ रोजी पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठा सैन्याचा निर्णायकरित्या पराभव झाला. पानिपतच्या पराभवामुळे मराठा साम्राज्य विस्तार रोखला गेला आणि पर्यायाने अंतर्गत दुफळीमधून साम्राज्याचे नियंत्रण मातब्बर सरदारांमध्ये विभागले गेले. या युद्धानंतर मराठा साम्राज्यातील सरदार परत कधीही एकत्र लढले नाहीत. दिल्ली/आग्र्याचे नियंत्रण ग्वाल्हेरहून महादजी शिंदे यांनी केले.मध्य भारताचे नियंत्रण इंदूर येथील होळकरांनी तर पश्चिम भारतातील भागाचे नियंत्रण सरदार गायकवाड यांच्याकडे होते. १७६१ नंतर, माधवराव पेशवे यांनी साम्राज्याचे पुनर्निर्माण करण्याचा

पुरेपूर प्रयत्न केला. मोठ्या साम्राज्याचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने, सरदारांना अर्ध-स्वायत्तता देण्यात आली.

मुंबईमध्ये जम बसविलेल्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने १७७५ मध्ये, रघुनाथरावांच्या वतीने पुण्यात पेशव्यांमध्ये वारसाहक्कावरून उद्‌भविलेल्या संघर्षात हस्तक्षेप केला ज्याचे परिवर्तन पहिल्या इंग्रज-मराठा युद्धात झाले. पेशवे पदाच्या शर्यतीत, युद्धपूर्व स्थितीला मान्यता मिळून पहिले इंग्रज-मराठा युद्ध १७८२ साली निकालात निघाले. अशाच प्रकारे १८०२ मध्ये बडोदा घराण्यात उद्भवलेल्या अंतर्गत वादात मध्यस्थी करून कंपनी सरकारने पुन्हा एकदा हस्तक्षेप केला. घराण्याच्या नवनेतृत्वाशी वाटाघाटी करून बडोद्याला स्वतंत्र संस्थानाचा दर्जा देत कंपनी सरकारचे मांडलिक बनविले. ३१ डिसेंबर १८०२ रोजी दुसरे बाजीराव पेशवे आणि इंग्रज कंपनी सरकार यांच्यात वसईचा तह झाला. यानुसार पेशव्यांबरोबर ६००० इंग्रजी फौज कायमस्वरूपी पुण्यात तैनात करण्यात आली. त्याचप्रमाणे, कुठलाही तह आणि युद्ध इंग्रजांच्या सल्ल्याशिवाय करू नये, पेशव्यांनी सुरत आणि बडोद्यावरील हक्क सोडून द्यावा अशा स्वरूपाच्या पेशव्यांच्या राजकारणावर नियंत्रण मिळविणाऱ्या अन्य अटींचा या तहात अंतर्भाव होता. या तहाची परिणती दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धात(१८०३-१८०५) झाली.

दक्षिणेतील भूभागावर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने निर्णायकरित्या झालेल्या तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात (१८१७-१८१८) हार पदरी पडून मराठा साम्राज्य लोप पावले. विविध लढायांची मालिका असलेल्या तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धातील कोरेगाव भीमा येथे झालेली लढाई ही अनिर्णायक लढाई होती. या लढाईचा सविस्तर परामर्श पुढील भागात घेतला आहे.



पेशवे मुद्रा

शिवशाहीच्या मध्य-उत्तरार्धात छत्रपतींच्या अधिपत्याखाली राज्याचे प्रमुख प्रधान किंवा 'पेशवा' यांनी राज्यकारभार केला. पेशवे सार्वभौम राजे कदापि नव्हते. त्यांनी छत्रपतींच्या अधिपत्याखाली शिवशाहीचा राज्यकारभार चालविला असा उल्लेख त्यांच्या मुद्रेमध्ये केला आहे. त्यापैकी पहिले बाजीराव पेशवे यांच्या मुद्रेमध्ये 'श्री राजा शाहू नरपति हर्षनिधान बाजीराव बळाळ मुख्य प्रधान' असा मायना आहे. त्यांची मुद्रा शेजारी दाखविली आहे.

•••

प्रकरण २

१ जानेवारी १८१८, कोरेगाव भीमा लढाई

कोरेगाव भीमा लढाई – पूर्व इतिहास

१८व्या शतकाच्या उत्तरार्धात पेशवे–जहागीरदारांच्या संघर्षाचे प्रश्न पुढे येण्यास सुरुवात झाली. यांमध्ये पटवर्धन, पानसे, रास्ते, गोखले, निपाणीकर–देसाई, कित्तूरकर देसाई आदी जहागीरदारांचा समावेश होता. या संघर्षातूनच पुढे पंढरपूरचा तह घडून आला.

१८११ साली पुण्यात इंग्रजांचा रेसिडेंट म्हणून माऊंटस्टयूअर्ट एल्फिन्स्टन रुजू झाला. दीर्घ प्रलंबित राहिलेला पेशवे–जहागीरदारांचा प्रश्न सैन्याने सोडवल्याशिवाय इंग्रजांना यश मिळणार नाही, अशी एल्फिन्स्टनची धारणा होती. पेशव्यांनी त्रिंबकजी डेंगळे याला सल्लागार म्हणून नियुक्त केले होते. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी डेंगळ्यांच्या साहाय्याने आपले स्थान बळकट करण्यास सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर इंग्रजांनी तटस्थ राहणे योग्य नाही, हे एल्फिन्स्टनने ओळखले व कलकत्त्यामधील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने पेशवे–जहागीरदार संबंधांत हस्तक्षेप केला. एल्फिन्स्टनने आपल्या प्रतिनिधीच्या मार्फत सर्व जहागीरदारांना पंढरपूरला एकत्र येण्याचे निमंत्रण दिले. त्यानुसार ११ जुलै १८१२ रोजी पंढरपूरचा तह करण्यात आला. तहातील अटींवरून, मराठा सरदार आणि पेशवे यांच्यात फूट पडून मराठ्यांची ताकद कमकुवत होईल याकडे अग्रक्रमाने लक्ष देण्यात आले. ज्या मध्ये पेशवे–जहागीरदार



माऊंटस्टयूअर्ट एल्फिन्स्टन

वाद उत्पन्न झाल्यास दोघांनी इंग्रजांचा निवाडा मान्य करावा, इंग्रजांना कोणत्याही जहागीरदाराशी स्वतंत्रपणे करार करण्याचा अधिकार असावा अशा प्रकारच्या अटी घालण्यात आल्या.

याप्रकारे पंढरपूरचा तह करून मराठा साम्राज्यात अनेक छोटी संस्थाने निर्माण करून साम्राज्याची ताकद खिळखिळी करण्याचा इंग्रजांचा प्रयत्न एकाअर्थी यशस्वी झाला. याविरुद्ध पेशव्यांनी साम्राज्यावरील पकड मजबूत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू ठेवले. यातूनच मराठा सैन्याच्या अनेक छोट्या मोठ्या लढाया इंग्रज सरकारच्या सैन्याशी झाल्या. ज्यात तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धातील खडकीची लढाई, येरवड्याची लढाई, कोरेगाव भीमाची लढाई, अष्टीची लढाई अशा लढायांची मालिका आहे.

कोरेगाव भीमा येथे झालेली लढाई याच मालिकेतील एक अनिर्णायक लढाई आहे. या सर्व लढायांचा थेट संदर्भ तत्कालीन सत्ताकारणाशी आहे. इंग्रजांना येथील भूभागावर आपले वर्चस्व प्रस्थापित करून सत्ता हस्तगत करायची होती तर पेशव्यांना शक्य ते राजकारण करून स्वकियांच्या मदतीने इंग्रजांना विरोध करत मराठा साम्राज्य टिकवून ठेवायचे होते. या सर्व लढायांमध्ये जातीअंताच्या लढाईचा काहीही संबंध नाही.

१८१५ मध्ये घडलेल्या एका घटनेचा दुवा साधून इंग्रजांनी मराठ्यांच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करून 'फोडा आणि राज्य करा' नीतीचा अवलंब चालू ठेवला. पेशवे आणि बडोद्याचे गायकवाड ह्यांच्यात महसूल गोळा करण्यावरून आर्थिक वाद प्रकोपाला गेला होता. हे आर्थिक वाद मिटवण्यासाठी गायकवाडांनी गंगाधर शास्त्री पटवर्धन ह्यांस इंग्रजांच्या हमीवर, पेशव्यांकडे पाठविले. परंतु फिस्कटलेल्या चर्चेनंतर १४ जुलै १८१५ला गंगाधर शास्त्रींचा पंढरपूर येथे खून झाला. इंग्रजांच्या हमीपत्रावर आलेल्या व्यक्तीचा खून केल्याचा आरोप ठेवून त्रिंबक डेंगळेला इंग्रजांनी अटक केली आणि त्यांना ठाण्याच्या कारागृहात ठेवण्यात आले.

पेशव्यांनी मराठा साम्राज्यातील सर्व सरदार एकत्र आणण्याचे प्रयत्न विविध मार्गांनी चालूच ठेवले, ज्या संदर्भातील अनेक पत्रे, दूत इंग्रजांकडून पकडले गेले. मराठेशाहीचे एकीकरण टाळण्यासाठी म्हणून इंग्रजांच्या मध्यस्थीशिवाय इतर सरदारांशी संपर्क करू नये अशी सक्ती पेशव्यांवर लादण्यात आली.

सप्टेंबर १८१६ मध्ये त्रिंबक डेंगळेनी इंग्रजांच्या कैदेतून विस्मयकारकरित्या पलायन केले. मांग, भिल्ल, रामोशी व इतर अनेक जातीजमातीतील लोकांना एकत्र करून डेंगळेंनी मराठ्यांसाठी मोठे सैन्य उभारले. ज्याची नोंद ब्रिटिशांच्या कागदपत्रात आहे. पेशव्यांच्या सैन्याचे सरसेनापती बापू गोखले यांनी इंग्रजांविरुद्ध निर्णायक युद्धाचे नियोजन सुरू केले. परंतु अशा व्यापक आघाडीबाबत इंग्रज सजग होते.

डेंगळेंचे निमित्त साधून इंग्रजांनी दि. ८ मे १८१७ रोजी पुण्याला वेढा दिला. १३ जून १८१७ रोजी दुसरे बाजीराव पेशवे व इंग्रजांमध्ये 'पुण्याचा तह' झाला. मराठा साम्राज्याचा बराचसा भूभाग, गडकिल्ले इंग्रजांनी ताब्यात घेतले व १८ जाचक अटी मराठा साम्राज्यावर लादल्या. पेशव्यांचे सैन्यबळ पूर्णपणे कमी करून काही नाममात्र सैनिक ठेवण्याची मुभा त्यांना देण्यात आली. इंग्रजांविरुद्ध लढण्यास अथवा प्रतिकार करण्यास पुरेसे सैन्यबळ नसल्याने पेशव्यांना ह्या अटी मान्य कराव्या लागल्या. मात्र स्वरक्षणाचा बहाणा करून, त्यांनी पुण्यात घोडदळ आणि ७००० अरब पायदळ तयार केले. पुण्याच्या तहानंतर जून ते नोव्हेंबर १८१७, ह्या सहा महिन्यात पेशव्यांनी आपली पूर्ण शक्ती आणि प्रभाव वापरून जवळपास २८,००० संख्येचे मराठा सैन्य उभे केले. पेशव्यांच्या ह्या मराठा सैन्यात त्रिंबक डेंगळे यांनी एकत्र केलेले रामोशी, भिल्ल व इतर जातीजमातीतील सैनिकांचा समावेश होता.

पेशव्यांच्या ह्या सैन्यजमावाची बातमी इंग्रजांना लागली. ''पेशव्यांनी पिंडारीविरुद्ध इंग्रजांना मदत केली नाही'' ही सबब पुढे करून पुण्याचा रेसिडेंट एल्फिन्स्टन याने जनरल स्मिथला त्याच्या सैन्यासह पुण्यात बोलवून घेतले. युद्धाचे पडघम लक्षात घेऊन इंग्रजांनी 'पूना ऑक्सिलरी हॉर्सेस' ही नवी पलटण उभारली. इंग्रजांच्या सैन्यभरतीच्या जाहिरातीत 'सदर सैनिक सुन्नी, शेख, मुघल, पठाण, सिंधी, बलुची, ब्राह्मण, राजपूत आणि मराठा भालदार या समुहाचे असावेत. खालच्या जातीच्या सैनिकांना यात प्रवेश नाही.' असे स्पष्ट म्हटले होते. यातून इंग्रज कसा जातीभेद करत हे दिसून येते. ह्याच पूना ऑक्सिलरी होर्सेस दलातील २५० घोडदळ कोरेगाव भीमा लढाईत सहभागी होते.

(पूना ऑक्सिलरी हॉर्सेसची मूळ इंग्रजी जाहिरात –वाचा परिशिष्ट १)

१८१७च्या दसऱ्याला पेशव्यांनी एकत्रित सैन्याचे भव्य शक्तिप्रदर्शन केले. त्यानंतर तिसरे इंग्रज-मराठा युद्ध अटळ होते. ५ नोव्हेंबर १८१७ रोजी खडकी येथे पेशवे आणि इंग्रजांमध्ये अनिर्णायक लढाई झाली. वाढता युद्धज्वर लक्षात घेऊन एलफिन्स्टनने पुण्यात अजून मोठ्या संख्येने सैन्य गोळा करण्याचे आदेश धाडले.

खडकी लढाईमध्ये इंग्रजांचे जवळपास ८० हजाराचे आर्थिक नुकसान झाले. यात इंग्रज व मराठ्यांचे अनुक्रमे एकूण ८६ आणि ५०० सैनिक जखमी व मृत्युमुखी पडले. खडकीच्या लढाईनंतर पुढे काही दिवसातच म्हणजे दि. १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी दुसरी लढाई येरवडा येथे झाली. ही लढाई देखील खडकी लढाई सारखीच अनिर्णायक होती. येरवड्याच्या लढाईमध्ये इंग्रज व मराठ्यांचे अनुक्रमे एकूण १०३ आणि ५०० सैनिक जखमी व मृत्युमुखी पडले. खुल्या मैदानात इंग्रजांच्या सैन्याशी लढण्याची कमकुवत बाजू लक्षात घेऊन पेशव्यांनी २८,००० संख्येचे सैन्य साताऱ्याजवळ माहुलिकडे हलविण्यास सुरुवात केली. पुढे गोदावरीपाशी शिंदे, होळकर आणि पेशवे यांच्या सैन्याने एकत्र मिळून इंग्रजांच्या सैन्याचा सामना करावा असा प्राथमिक मनसुबा होता. तत्पूर्वी बाजीराव पेशवे यांनी आपले कुटुंब सुरक्षित ठिकाणी म्हणून रायगडावर हलविले आणि छत्रपती प्रतापसिंह यांच्या रक्षणासाठी त्यांनी मराठा सैन्यासह असावे या हेतूने त्यांना आणण्यासाठी म्हणून सरदार नारोपंत आपटे यांना पाठविले. तर दुसरीकडे एलफिन्स्टनने जनरल स्मिथला फौजेनिशी पेशव्यांच्या मागावर पाठविले.

येरवड्याच्या लढाई नंतर दि. १७ नोव्हेंबर १८१७ रोजी दुसरे बाजीराव पेशवे यांनी सैन्यासह साताऱ्याच्या दिशेने कूच केले. छत्रपती व दुसरे बाजीराव यांची भेट होण्याआधीच कंपनी सरकारचा अधिकारी जनरल स्मिथ सैन्यासह त्यांच्या मागावर असण्याची शक्यता लक्षात घेऊन छत्रपती प्रतापसिंह यांच्या भेटीची प्रतीक्षा न करता बाजीराव पेशवे पुरंदरला निघून गेले. पुढे जवळपास महिनाभर बाजीराव पेशवे इंग्रजांना हुलकावण्या देत गनिमीकावा करत होते. १५ डिसेंबर १८१७ नंतर छत्रपती प्रतापसिंह महाराज यांची बाजीराव पेशवे, इतर मराठा सरदार व सैन्य यांच्याशी ब्राह्मणवाडी येथे भेट झाली. मराठ्यांचा हा सर्व लवजमा पुढे चाकणला पोहोचताच जाणीवपूर्वक 'मराठा सैन्य छत्रपतींच्या सोबत कोकणच्या दिशेने जाणार आहे' अशी अफवा पसरविण्यात आली.

कोरेगाव भीमा लढाई

यादरम्यान बाजीराव पेशवे (यापुढे पुस्तिकेत 'दुसरे बाजीराव पेशवे' यांचा उल्लेख 'बाजीराव पेशवे' असा केला आहे. वाचकांनी याची नोंद घ्यावी.) यांनी पुणे सोडल्यावर इंग्रजांनी शनिवार वाडा ताब्यात घेऊन त्यावर आपला युनियन जॅक फडकवला. डिसेंबर अखेरीस पुण्याचा प्रमुख अधिकारी म्हणून कर्नल बर्र ची नियुक्ती करण्यात आली.

"मराठा सैन्य कोकणच्या दिशेने वाटचाल करत आहे" अशी अफवा कर्नल बर्रपर्यंत पोहोचली. कर्नल बर्रने तातडीने दुसऱ्या बटालियनच्या ६व्या रेजिमेंटच्या सैनिकांना तयार राहायचे आदेश दिले. त्याचप्रमाणे लेफ्ट. कर्नल प्रॉथरला अधिक कुमक पुण्यात पाठवून देण्याचे आदेश पाठविले. प्रत्यक्षात मात्र बाजीराव पेशवे मराठा सैन्यासह कोकणच्या दिशेने न जाता पुण्याच्या दिशेने वाटचाल करत होते. बाजीराव पेशवे आणि मराठा सैन्य, इंग्रजांना गाफील ठेवत फिरून पुण्याच्या अगदी जवळ पोहोचले. पेशव्यांच्या मागावर असलेल्या जनरल स्मिथचा पाठलाग अयशस्वी ठरला. अवघ्या काही मैलांवर येऊन थांबलेल्या मराठा सैन्याच्या बातमीने, कर्नल बर्र धास्तावला होता. छत्रपती, पेशवे आणि मराठा सैन्य पुण्यापासून अवघ्या ४० मैल दूर असलेल्या 'फुलशहर'मध्ये पोहोचले होते. कर्नल बर्र याने शिरूर येथे असलेल्या कॅप्टन स्टाँटन या इंग्रज अधिकाऱ्याला मदतीसाठी तातडीचे पत्र पाठवले.

३१ डिसेंबर १८१७ रोजी छत्रपती प्रतापसिंह, बाजीराव पेशवे व त्यांचे जवळपास २८,००० सैन्य (२०,००० घोडेस्वार आणि ८,००० पायदळ) फुलशहर(सध्याचे फुलगाव) येथेच मुक्कामी होते. त्याच दिवशी शिरूर येथे कॅप्टन स्टाँटनला 'मदतीसाठी सैन्यासह पुण्याला निघावे' असे कर्नल बर्रचे पत्र मिळताच, तो शिरूर येथील छावणी मधून रात्री ८वाजता सैन्यासह पुण्याच्या दिशेने निघाला.

कॅप्टन स्टाँटन सोबतच्या सैन्यामध्ये 'बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्री'चे ५०० पायदळ सैनिक (मराठा, महार, गुजर, मुस्लिम, मीना, अहिर, शीख इत्यादी सैनिक या पायदळात होते), 'दि पूना ऑक्सिलरी हॉर्स'चे २५० घोडेस्वार सैनिक (सुन्नी, मुस्लिम, पठाण, बलोचि, ब्राह्मण, राजपूत आणि मराठा या समुहांचे घोडेस्वार) आणि मद्रास आर्टिलरी च्या दोन ६ पाउंडर तोफा व त्यावरील २५ युरोपियन सैनिक आणि काही निवडक प्रायव्हेट सैनिक अशा जवळपास ७७५ सैनिकांचा समावेश होता.

(या युद्धात सहभागी असलेल्या असिस्टंट सर्जन वायली याने लिहून ठेवल्याप्रमाणे या पलटणीत एकूण संख्या ८६५ होती. तर मुंबई गॅझेट या वृत्तसंस्थेने प्रकाशित केलेल्या वृत्तानुसार ही संख्या ८३४ होती. लढाईनंतर इंग्रजांकडून बांधल्या गेलेल्या लष्करी स्तंभावर ही संख्या ७७५ इतकी नोंदविली आहे.) रात्रभर प्रवास करून १ जानेवारी १८१८ रोजी ही पलटण सकाळी सुमारे १०वाजता कोरेगाव पासून २ मैलावर तळेगाव ढमढेरे जवळ येऊन पोहोचली तेव्हा अनपेक्षितरित्या भीमा नदीपलीकडून फुलगावच्या बाजूने मराठ्यांचे अफाट सैन्य चालत पुढे येत असल्याचे त्यांना कळून आले.

भीमा नदीच्या काठावर वसलेले कोरेगाव म्हणून त्याचा कोरेगाव भीमा असा देखील उल्लेख होतो. (या अनुषंगाने माध्यमांमधून सध्या या गावाचा उल्लेख 'भीमा कोरेगाव' असा चुकीच्या पद्धतीने केला जातो). पश्चिमेला नदीच्या बाजूने एक मजबूत तटरक्षक भिंत होती,ज्याचे अवशेष आजही तेथे आढळून येतात. या तटरक्षक भिंतीचा फायदा कॅप्टन स्टाँटनने पुढे घेतला. मराठ्यांच्या मोठ्या सैन्याशी खुल्या मैदानात निभाव लागू शकत नाही याचा अंदाज घेत कॅप्टन स्टाँटनने आत्मरक्षणासाठी कोरेगाववर ताबा घेण्याचा आदेश सैन्याला दिला.


काही घोडेस्वार सैनिकांना मागेच थांबायचे आदेश देऊन सकाळी सुमारे ११ वाजता कॅप्टन स्टाँटन उर्वरित सैन्यासह कोरेगाव भीमात दाखल झाला. मराठ्यांचे सैन्य इंग्रजांच्या हालचालींवर लक्ष ठेवून होते. मराठा सैन्यातील सर्वात पुढे असलेली अरब, गोसावी व इतर काही निवडक सैनिकांची अंदाजे ३००० संख्येची एक तुकडी इंग्रज सैन्याच्या हालचाली बघून कोरेगावच्या दिशेने वाटचाल करू लागली. शत्रू सैन्याची ही चाल लक्षात येताच कॅप्टन स्टाँटनने आपल्या सैनिकांना कोरेगावात मोक्याची ठिकाणे ताब्यात घेण्याचे आदेश दिले. मराठा सैनिकांनी कोरेगावात घुसखोरी करण्यापूर्वीच त्यांना नदीपलीकडे रोखण्याचा प्रयत्न करावा हा त्याचा मनसुबा होता. मराठा सैन्याची अंदाजे ३०००ची तुकडी भीमा नदी ओलांडण्याचा प्रयत्न करू लागताच कॅप्टन स्टाँटनने मद्रास आर्टिलरीच्या २५ सैनिकांना दोन तोफा घेऊन हल्ल्याच्या तयारीत राहाण्याचे आदेश दिले. कॅप्टन स्टाँटनने यापैकी एक तोफ गावाच्या पश्चिमेला ठेवली जेणेकरून भीमा नदीच्या किनाऱ्यावर लक्ष ठेवून नदी पात्रातून येणाऱ्या मराठा सैन्याला रोखता येईल तर दुसरी तोफ गावाच्या मध्यवर्ती

भागात ठेवून शिरूरकडून येणाऱ्या रस्त्यावर टेहळणी करता येईल. २५० घोडेस्वारांना कोरेगावच्या उत्तर आणि ईशान्य दिशेला टेहळणी करण्याचा आदेश होता.

जनरल स्मिथ व इंग्रजी सैन्य मराठा सैन्याचा पाठलाग करत आहेत याची कल्पना बाजीराव पेशव्यांना होती त्यामुळे या अचानक उद्भवलेल्या चकमकीमध्ये फार वेळ दवडणे जोखमीचे ठरले असते. परंतु छत्रपती प्रतापसिंह बरोबर असल्याने स्टाँटनच्या सैन्याला सामोरे जाणे क्रमप्राप्त होते. कोरेगाव भीमा येथे घडलेल्या लढाईची पाहणी छत्रपती प्रतापसिंह व बाजीराव पेशवे यांनी नदीपलीकडच्या टेकडीवरील छावणीतून केली.

मराठा सैन्याचे सेनापती बापू गोखले, सरदार रास्ते आणि निपाणीकर देसाई हे तिन्ही सरदार सैन्यासह कोरेगाववर चालून जाण्यास सज्ज झाले. मराठा सैन्याच्या तुकडीतील घोडेस्वारांना कोरेगावला वेढा द्यायचे हुकूम देण्यात आले व त्यांच्यासोबत एक तोफ पाठविण्यात आली. कॅप्टन स्टाँटनच्या आदेशानुसार कोरेगावच्या मधोमध ठेवण्यात आलेली तोफ पाहून मराठ्यांच्या सैन्यातील पुढे सरसावलेल्या अरब, गोसावी व इतर निवडक सैनिकांच्या प्रत्येकी १००० च्या तीन तुकड्या बनवण्यात आल्या.

नदीपात्र ओलांडून बऱ्याच मराठा सैनिकांनी कोरेगावला वेढा दिला तर त्या तुकडीतील उर्वरित सैन्य तोफेजवळच थांबले. कोरेगावची पूर्व बाजू पूर्ण खुली होती, ज्याबाजुने मंदिर होते. कॅप्टन स्टाँटनने त्याचे काही सैनिक शिरूरच्या मार्गावर उभे केले तर काही सैनिक नदीच्या दिशेने उभे केले होते. मराठा सैनिकांनी एकाच वेळेस तीन वेगवेगळ्या दिशेने इंग्रज सैन्यावर हल्ला चढवला. त्यापैकी १००० संख्येच्या एका तुकडीने खुल्या असलेल्या पूर्वेच्या बाजुकडून हल्ला करून गावामध्ये शिरण्याचा प्रयत्न केला. या तुकडीच्या संरक्षणासाठी नदीपलीकडून एक तोफ माऱ्यासाठी सज्ज होती.या तुकडीचा हल्ला होताच कॅप्टन स्टाँटनच्या सैन्याने तोफगोळ्यांचा मारा करून प्रतिकार केला.मराठा सैन्याच्या तोफेची जागा अडचणीची असल्यामुळे त्याचा मारा स्टाँटनच्या सैन्यापर्यंत पोहोचत नव्हता. ही बाब लक्षात येताच मराठा सैनिकांनी तोफमारा बंद करून तेथे असलेल्या उर्वरित सैन्याने देखील कोरेगाववर हल्ला चढविला. स्टाँटनकडे दोन तोफा होत्या परंतु गावात योग्य जागा न मिळाल्याने त्यांचा मारा कुचकामी ठरत होता. मराठ्यांचे सैन्य



कोरेगाव भीमा लढाईचा इंग्रजांनी बनविलेला नकाशा. सदर नकाशा इंग्रज अधिकारी व कोरेगाव भीमा लढाईतील असिस्टंट सर्जन जॉन वायली याच्या पुस्तकात आहे. त्याचप्रमाणे हा नकाशा 'बॉम्बे प्रेसिडेन्सनी'च्या गॅझेटमध्ये (व्हॉल्युम ८– भाग ३रा) १८८५ साली छापला होता.

संधी साधून गावात शिरत होते तर त्यांच्यावर प्रतिहल्ला करून स्टाँटनचे सैन्य त्यांना हुसकावून लावत होते. तोफांच्या माऱ्यामुळे गावात बरीच जाळपोळ आणि नुकसान झाले होते. गावातील नागरी वस्तीला हानी पोहोचू नये याचा विचार करून मराठा सैनिक मागे फिरत. परंतु स्टाँटनच्या सैन्यावर हल्ला करण्याची एकही नामी संधी मराठा सैन्याने गमावली नाही.

कॅप्टन स्टाँटनच्या सैनिकांनी ३१ डिसेंबरच्या रात्रीपासून जवळपास १८ तास एकसलग अन्न पाण्याशिवाय काढले होते. त्यामुळे शत्रूसैन्यावर त्यांचा प्रतिहल्ला दुबळा ठरत होता. नदीच्या बाजूने मराठ्यांच्या सैन्याने स्टाँटनच्या सैनिकांचा पाणी पुरवठा देखील पूर्णतः तोडल्यामुळे त्यांना पिण्याच्या पाण्याची वानवा होती. लढाई सुरु झाल्यानंतर काही तासांतच स्टाँटनच्या सैन्याचे अन्नपाण्याविना हालहाल होऊ लागले. बरेच जखमी सैनिक जिवाच्या आकांताने पाण्यासाठी मागणी करत होते. ज्यामध्ये मद्रास आर्टिलरीचा विंगेट नावाचा अधिकारी देखील होता.

मराठा सैनिक मंदिरांवर हल्ला करणार नाहीत या खात्रीने इंग्रजांचे जखमी सैनिक व अधिकारी मंदिरामध्ये आसरा घेण्यासाठी थांबले होते. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे मराठा सैनिकांनी मंदिरावर हल्ला केला नाही परंतु जखमी इंग्रजी सैनिक व अधिकारी बाहेर येतील याची प्रतीक्षा करत काही मराठा सैनिक मंदिराबाहेर वाट रोखून होते. परिस्थिती आजमावण्यासाठी जखमी विंगेट मंदिराबाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. तिथेच लपलेल्या काही अरबी सैनिकांनी विंगेटला पकडून ठार केले.मंदिरातील इतर जखमी सैनिक मराठा सैनिकांच्या दराऱ्यामुळे विंगेटच्या मदतीला गेले नाहीत. विंगेटच्या क्रूर हत्येची धास्ती इंग्रज सैनिकांनी घेतली. कॅप्टन स्वान्स्टन लढाईत दोन वेळा जखमी झाला होता. मंदिराबाहेर असलेल्या अरबी सैनिकांना हुसकावून लावण्याचा आदेश त्याच्याबरोबर असलेल्या सैनिकांना दिला. लेफ्टनंट जोन्स, असिस्टंट सर्जन वायली व काही हत्यारबंद सैनिक त्यांच्या मदतीसाठी आले आणि अरबी सैनिकांना मंदिरापासून माघारी पळवले. स्टाँटनच्या सैन्याने मंदिरावर ताबा मिळविला. मंदिरातील इतर जखमी सैनिकांना व अधिकाऱ्यांना गावातील कमी जोखमीच्या ठिकाणी हलविण्यात आले. मंदिर व आजूबाजूचा परिसर ताब्यात येताच इंग्रजी सैनिकांना हुरूप चढला. या कामात इंग्रजांच्या काही सैनिकांनी उत्कृष्ट कामगिरी केली. तरी देखील त्यांच्या सैन्याचा

मराठा सैन्याच्या तुकड्यांसमोर दीर्घ काळ टिकाव लागणार नाही या परीस्थितीची इंग्रज सैनिकांना कल्पना होती. त्याप्रमाणे अनेक सैनिक शरण जाण्याचा सल्ला कॅप्टन स्टाँटनला देत होते. तर याविरोधात कॅप्टन स्टाँटन सैन्याचे मनोबल राखण्याचा हरप्रकारे प्रयत्न करीत होता. शरण जाताच मराठा सैन्य कुणालाही जिवंत सोडणार नाही याची पुरेपूर कल्पना त्याला होती.

मराठ्यांच्या वतीने लढणाऱ्या अरब सैनिकांच्या तुकडीने इंग्रजांवर पुन्हा मोठा हल्ला केला व मद्रास आर्टिलरीच्या चिशोम नामक अधिकाऱ्याला डोक्यात गोळी घालून ठार करण्यात आले. या अरबी सैनिकांनी बक्षिसाच्या आशेने चिशोमचे शिर धडापासून वेगळे करून पेशव्यांकडे पाठवून दिले. यादरम्यान काही इतर अरब सैनिकांनी बरेच युरोपियन अधिकारी जायबंदी केले. चिशोम मेल्यावर मराठ्यांनी इंग्रजांच्या एका तोफेवर विजय मिळवला. त्या तोफेच्या मदतीनेच अरबी सैनिकांनी इंग्रजांवर हल्ला चढविला. तोफेजवळच कॅप्टन स्टाँटनच्या सैन्यातील लेफ्टनंट पॅटिन्सन नावाचा अधिकारी गोळी लागून जायबंदी होऊन पडलेला होता. इंग्रज सैन्याची तोफ अरबी सैनिकांच्या ताब्यात गेलेली बघून पॅटिन्सन जखमी अवस्थेत काही सैनिकांच्या मदतीने अरबी सैनिकांशी लढू लागला. पॅटिन्सन व सैनिकांनी अरब सैनिकांवर चढवलेला प्रतिहल्ला पाहून इंग्रजी सैन्याला चेव चढला. त्यातच त्यांनी गमावलेली तोफ पुन्हा जिंकून घेतली. पॅटिन्सनचा प्रतिकार बघून स्टाँटनने त्याच्या इतर सर्व सैनिकांना धैर्याने लढण्यासाठी प्रोत्साहित केले.

मराठा सैन्याचे अरबी, गोसावी आणि इतर निवडक सैनिक, गावातल्या काही पडलेल्या घरांमध्ये आणि तिथे असलेल्या एका गढीमध्ये दबा धरून बसले होते. चिशोमच्या शिर कापलेल्या धडाकडे नजर रोखून बोलताना स्टाँटन त्याच्या सैनिकांना उद्देशून म्हणाला,''जर असा हालहाल होऊन तुम्हाला मृत्यू नको असेल तर मराठ्यांविरुद्ध लढा देण्याची हीच वेळ आहे, त्यामुळे स्वतःचे रक्षण करा.'' कॅप्टन स्टाँटनचे हे वाक्य पुढे ऐतिहासिक ठरले कारण याच प्रोत्साहनाच्या जोरावर गलितगात्र झालेल्या सैन्यामध्ये नवीन धडाडी निर्माण झाली. मराठा सैन्य तुकडीवर इंग्रज सैनिकांनी जोरदार प्रतिहल्ले सुरू केले. एकाएकी नव्या दमाने सुरू झालेल्या इंग्रजांच्या हल्ल्यामुळे बरेच मराठा सैनिक मागे सरले होते.

याप्रकारे रात्री ८वाजेपर्यंत लढाई चालली. चढ्या प्रतिकारासमोर काही वेळ किरकोळ हल्ले करण्याचा प्रयत्न मराठा सैनिक करत होते परंतु इंग्रज सैनिक या दारुण अवस्थेत आपल्या मागावर येणार नाहीत हे हेरून मराठा सैनिकांचे हल्ले थांबल्यानंतर रात्री ९ वाजता कोरेगाव भीमाची लढाई थांबली.उशिरापर्यंत चाललेल्या लढाईमध्ये कॅप्टन स्टाँटनच्या सर्वच सैनिकांचा दम निघून गेला होता. इंग्रजांशी अजून सलग लढून वेळ काढण्यात अर्थ नव्हता हे पाहून कोरेगावला वेढा घालून असलेल्या इतर मराठा सैनिकांनी मागे फिरायचा निर्णय घेतला.

अचानक उद्‌भवलेल्या या लढाईत आक्रमक हल्ले करताना मराठ्यांचा दुहेरी हेतू होता.एक, छत्रपती प्रतापसिंह आणि बाजीराव पेशवे यांना साताऱ्याच्या दिशेने प्रयाण करण्यासाठी म्हणून सुरक्षित मोकळी वाट करून देणे आणि स्टाँटनच्या सैन्याला पुण्याच्या दिशेने वाटचाल करण्यापासून रोखणे. मराठ्यांचे हे दोन्ही हेतू बव्हंशी साध्य झाले.

कॅप्टन स्टाँटनच्या सैन्याने ३१ डिसेंबरची पूर्ण रात्र अन्नपाण्याशिवाय प्रवास केला होता आणि १ जानेवारी रोजी संपूर्ण दिवस ते कोरेगावमधल्या लढाईत अडकून पडले होते. स्टाँटनचे सैनिक उपाशी तर होतेच परंतु त्यांचा पाणीपुरवठा देखील मराठा सैनिकांनी तोडून टाकला होता. अशा कठीण परिस्थितीत इंग्रजी सैन्याने कोरेगावची लढाई केली आणि स्वतःला मरणापासून वाचवले. इंग्रजी अधिकाऱ्यांपैकी फक्त कॅप्टन स्टाँटन, लेफ्टनंट जोन्स आणि असिस्टंट सर्जन वायली या अधिकाऱ्यांशिवाय उरलेले बाकी सर्व युरोपियन अधिकारी लढण्याच्या परिस्थिती मध्ये नव्हते. रात्री लढाई संपेपर्यंत कॅप्टन स्टाँटनच्या ७७५ सैनिकांपैकी १७५ मृत व जखमी झाले तर मराठ्यांचे अंदाजे ५०० ते ६०० सैनिक मृत व जखमी झाले. (या संख्येमध्ये 'पूना ऑक्सिलरी हॉर्स' या पलटणीतील जखमी व मृतांची संख्या अंतर्भूत नाही.)

या लढाईला इंग्रजांनी 'डिफेन्स ऑफ कोरेगाव' असे संबोधले. नंतर उभारल्या गेलेल्या स्तंभावर देखील 'डिफेन्स ऑफ कोरेगाव' असा उल्लेख केलेला आहे.

कोरेगाव भीमा लढाईच्या रात्री ९ वाजेपर्यंतच्या घडामोडींवरून ही लढाई अनिर्णायक पद्धतीने थांबली असा निष्कर्ष निघतो. पुण्याकडे निर्णायक युद्धासाठी कूच करण्याऱ्या मराठ्यांना अचानक समोर उभ्या राहिलेल्या स्टाँटनच्या छोट्याशा सैन्यावर विजय मिळवून फारसे काही साध्य होणार नव्हते. तर प्रत्यक्षात स्टाँटनच्या मदतीसाठी कोणतीही पुढची इंग्रजी कुमक येण्यापूर्वीच छत्रपती प्रतापसिंह आणि

बाजीराव पेशवे यांना सुखरूप पुढच्या मुक्कामी पोहोचवणे हा मराठा सैन्याचा मुख्य हेतू होता. त्यामुळे कोरेगावचा वेढा फारसा ताणण्यात त्यांना काही स्वारस्य नव्हते. १ जानेवारीच्या रात्री अंदाजे ९ वाजता लढाई संपल्यानंतर मराठ्यांच्या फौजा हळूहळू मागे फिरून छत्रपती प्रतापसिंह व बाजीराव पेशवे यांच्या दिशेने निघू लागल्या. नदीच्या पलीकडे असणारे बाजीराव पेशवे स्वतः छत्रपतींच्यासह तिथून पुढे राजेवाडीच्या दिशेने निघाले व त्या रात्री त्यांनी तिथेच मुक्काम केला.

या अनुषंगाने एका संदर्भाचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे.महाराष्ट्र शासन प्रकाशित (२००३) 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज अँड स्पिचेस' या ग्रंथ संग्रहातील १७ व्या खंडात भाग ३ मध्ये पहिल्या प्रकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोरेगाव भीमा जयस्तंभाला भेट दिल्याचा संदर्भ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येथे केलेल्या भाषणाचा उल्लेख त्यात केला आहे. या प्रकरणात पृष्ठ क्रमांक ५वर पुढील वाक्य आहे. ''रात्री ९ वाजता, निर्णायक यश टप्प्यात असताना देखील पेशव्यांच्या सैन्याने हल्ला थांबवत माघार का घेतली हे सांगणे अवघड आहे.''

कोरेगावच्या लढाईत इंग्रजी सैन्याचे बरेच नुकसान झाले त्याचप्रमाणे मराठ्यांचे देखील बरेच सैनिक मारले गेले. इंग्रजांनी केलेल्या या बचावात्मक लढाईमध्ये मद्रास आर्टिलरीच्या २५ युरोपिअन सैनिकांपैकी २० सैनिक/अधिकारी मृत व जखमी झाले.कॅप्टन स्टाँटनच्या आदेशानुसार हलाखीच्या परिस्थितीत शरण न जाता त्याच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून इंग्रजी सैन्य लढत राहिले. बाजीराव पेशवे यांच्या मागावर असलेला जनरल स्मिथ आणि पुण्यातील अधिकारी कर्नल बर्र यापैकी किमान एक अधिकारी लढाई चालू असेपर्यंत पुरेशी कुमक घेऊन कोरेगाव भीमा येथे पोहचतील अशी आशा कॅप्टन स्टाँटनला होती. १ जानेवारी १८१८ रोजी जनरल स्मिथ पेशव्यांचा पाठलाग करता करता ओझरच्या घाटात पोहोचल्यावर त्रिंबक डेंगळे यांनी तयार केलेल्या रामोशी सैनिकांच्या एका तुकडीने त्याला इतके सतावून सोडले कि तो २ जानेवारीला महत्प्रयासाने चाकणला येऊन पोचला. २ जानेवारीला मराठ्यांनी नव्या दमाने कोरेगावावर हल्ला केला तर उर्वरित इंग्रज सैनिक जनरल स्मिथ आणि कर्नल बर्र यांच्या मदतीशिवाय यशस्वी लढ्याच्या परिस्थितीत नसतील याचा कॅप्टन स्टाँटनला अंदाज होता. त्यामुळे वेळ

न दवडता १ जानेवारीच्या रात्री उसंत मिळताच तातडीच्या मदतीसाठी त्याने एक पत्र लिहून काही घोडेस्वार सैनिकांद्वारे वरिष्ठांकडे रवाना केले. त्या पत्रातील संदर्भ पुढीलप्रमाणे: *"आम्हाला पेशव्याच्या सैन्याने संपूर्ण घेरलेलं आहे आणि आम्ही आज रात्रीपेक्षा जास्त तग धरू शकत नाही. आमचे बरेच सैनिक आणि अधिकारी मारले गेले आहेत. आम्हाला लवकर मदत पाठवा नाहीतर हे उद्यापर्यंत आम्हाला मारून टाकतील."* (मूळ इंग्रजी पत्र-वाचा परिशिष्ट २)

Dear Colonel,
We are completely surrounded by the Peshwa's Army, and Cannot defend ourselves longer than to night - We have lost many men and Officers, send us aid, or we are all cut up tomorrow.

Corygaum

yours truly
I. I for Captn. Stan:
much engaged

कॅप्टन स्टाँन्टन याने १ जानेवारी १८१८ रोजी रात्री तातडीच्या मदतीसाठी पाठविलेल्या पत्राची मूळ प्रत.

स्टाँटनने पाठविलेल्या या पत्रातून इंग्रज सैन्याची हलाखीची स्थिती समजते. याशिवाय दोन्ही सैन्याचे तुलनात्मक संख्याबळ लक्षात घेता मराठा सैन्याला स्टाँटनच्या सैन्याचा पूर्ण पराभव शक्य होता पण दुरान्वये त्यांना लढाईत अधिक वेळ घालवणे फायद्याचे नव्हते. मराठ्यांच्या दृष्टीने कोरेगाव भीमा येथील लढाईतील जय पराजय यापेक्षा छत्रपतींची सुरक्षा अग्रक्रमाची होती. (संदर्भ-मराठा रियासत)

स्टाँटनने मदतीसाठी पाठविलेल्या पत्रानंतर त्याने रात्रभर मदतीची निष्फळ वाट पहिली. स्टाँटनचे सैन्य रात्रभर कोरेगावातच तळ ठोकून थांबले. पुढच्या दिवशी म्हणजे २ जानेवारी १८१८ रोजी सकाळी देखील सैन्य तहानलेले होते.

संधी मिळताच जवळ असलेल्या नदीचे पाणी पिण्यासाठी तुकडी तुकडीने सैनिक गेले. गावात जखमी पडलेल्या सैनिकांसाठी देखील पाणी नेण्याची सोय करण्यात आली. या सर्व हालचालींवर मराठा सैन्य नजर ठेवून होते. स्टाँटनला ३१ डिसेंबर रोजीच आपल्या सैन्यासह पुण्यात पोहोचण्याचा स्पष्ट आदेश होता परंतु कोरेगाव लढाईचा प्रसंग अचानक उद्भवल्यामुळे त्याला शिरूरकडून पुण्याकडे येताना मध्ये थांबावे लागले. यानंतरसुद्धा मूळ आदेशानुसार उर्वरित सैन्य घेऊन पुण्याच्या दिशेने मदतीसाठी जाता येईल का याची त्याने चाचपणी केली. परंतु मराठ्यांचे बरेच घोडेस्वार सैनिक इंग्रज सैन्यावर पाळत ठेवून होते तर इतर बरेच सैनिक कोरेगाव व पुण्याच्या मार्गावर मध्य भागावर होते. अशा परिस्थितीत दमलेल्या सैनिकांसह पुण्याकडे कूच करण्याचे धाडस करणे त्याला रास्त वाटले नाही. म्हणूनच उर्वरित सैनिकांसह पुण्याच्या दिशेने न जाता शिरूरच्या दिशेने परतावे असा निर्णय त्याने घेतला. बऱ्याच जखमी सैनिकांना बैलगाडीत ठेवून तर काही गंभीर जखमी झालेल्या सैनिकांना व अधिकाऱ्यांना गोधडीत गुंडाळून इतर सैनिकांच्या खांद्यावर टाकून शिरूरकडे निघाले. ३ जानेवारी १८१८रोजी कॅप्टन स्टाँटन सैन्यासह सकाळी शिरूरला पोहोचला. पॅटिन्सन लढाईमध्ये जबर जखमी झाला होता. लढाई नंतर त्याची अवस्था खूप खालावली होती. त्याला जखमी अवस्थेत शिरूरपर्यंत आणले परंतु तिथे पोचताच काही वेळाने त्याने प्राण सोडले.

३ जानेवारीला कॅप्टन स्टाँटन सैन्याला घेऊन शिरूरला पोचल्यावर त्याच्या कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल फिट्झीमानला लिहिलेल्या पत्रामध्ये त्याने ३१ डिसेंबर १८१७ पासून ते शिरूरला पोहचेपर्यंतचा सविस्तर अहवाल लिहून पाठविला. अहवाल खालीलप्रमाणे:

(मराठी अनुवाद, मूळ इंग्रजी अहवाल – वाचा परिशिष्ट ३)

"मी आपणास कळवू इच्छितो कि आपल्या आदेशानुसार, आम्ही ३१ डिसेंबरला शिरूरवरून रात्री ८.३० वाजता निघालो, यावेळेस सोबत दुसऱ्या तुकडीच्या पहिल्या रेजिमेंटचे ५०० पायदळ, २ (६ पाउंड) तोफा आणि स्वान्स्टनच्या नेतृत्वाखाली २५० घोडेस्वार एवढे सैन्य होते. १ जानेवारीला सकाळी १० वाजता कोरेगाव येथे पोहोचलो असता मिळालेल्या

माहितीनुसार तेथे पेशव्यांचे जवळपास २०,००० घोडेस्वार आणि ८,००० पायदळ व सोबत दोन तोफा असे अफाट सैन्य उपस्थित होते. भीमा नदीच्या पलीकडे असलेल्या या सैन्याचा आमच्यावर हल्ला करायचा मनसुबा होता. पुण्याच्या दिशेने येताना आम्ही कोरेगाव येथे पोहोचेपर्यंत मार्गक्रमण चालू ठेवले होते परंतु शत्रूसैन्य इतक्या मोठ्या प्रमाणात हल्ल्याच्या तयारीत असताना तोफांसाठी योग्य ती जागा निवडून प्रतिकार करण्याचा निर्णय घेतला. माझ्या पवित्र्याची शत्रूला कल्पना येताच, त्यांच्याकडून अरब फौजेच्या ३ तुकड्या ज्यात प्रत्येकी १००० सैनिक होते त्याचप्रमाणे एक तोफ आणि बरेच घोडेस्वार असे सैन्य आमच्यावर हल्ला करण्यासाठी निघाले.

लढाईचे पुढील वृत्त कळविण्यास खेद होतो की, शहराची त्यांना जास्त चांगली माहिती असल्यामुळे, शत्रुसैन्याने आधीच तेथे मोक्याच्या ठिकाणी कब्जा मिळविला होता. अशा मोक्याच्या ठिकाणाहून त्यांना हुसकावून लावण्यात आम्हाला दिवसभरात यश मिळाले नाही. हा निकराचा लढा आम्ही त्या दिवशी रात्री ९ वाजेपर्यंत चालू ठेवला.आणि यानंतर शत्रुसैन्याला पिछाडीवर ढकलण्यात आम्हाला यश मिळाले. २ जानेवारी रोजी सकाळी शत्रूने काबीज केलेल्या जागा आम्ही हस्तगत केल्या पण त्यांनी कोणताही प्रतिकार केला नाही. २ जानेवारीच्या संध्याकाळी आमचा पुण्याला जायचा मार्ग मोकळा झाला होता पण गेले ४८ तास माझ्या सैन्याला अन्न व पाणी देखील मिळाले नव्हते आणि पुढे कुठे त्याची सोय होईल याची खात्री नसल्याने मी पुण्याच्या दिशेने कूच न करता पुन्हा शिरूरला माघारी वळण्याचा निर्णय घेतला. सगळे जखमी शिपाई, दोन तोफा व एक सामान गाडी घेऊन आम्ही संध्याकाळी ७ वाजता शिरूरकडे परतीचा प्रवास सुरु केला यामध्ये नाईलाजाने एक रिकामी सामानगाडी निकामी करण्याचा आणि तंबू सामान तेथेच सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला. लढाईच्या या वर्णनावरून मी घेतलेले निर्णय न्याय्य आहेत यावर आपला विश्वास बसेल अशी अशा करतो. आपले खूप जास्त नुकसान झाले हे सत्य आहे पण त्या

विशिष्ट परिस्थितीचा विचार केल्यास त्यासमोर हे नुकसान नगण्यच म्हणावे लागेल. नुकसान खालीलप्रमाणे:

मृत्यू –लेफ्टनंट चिशोम (तोफखाना)
असिस्टन्ट सर्जन विंगेट (दुसरी तुकडी पहिली बटालियन)
जखमी –लेफ्टनंट पॅटीन्सन (जबरी जखमी)
कॉनलेन (जखमी)
स्वान्स्टन (जखमी)
मृत्यू – सैनिक ५० (दुसरी तुकडी पहिली बटालियन)
तोफखाना गोलंदाज १२ (तोफखाना)

मृत्यू एकूण ६२ (यात ऑक्सिलरी घोडदळातील संख्या नाही)

जखमी १०५ सैनिक (दुसरी तुकडी पहिली बटालियन)
८ तोफखाना गोलंदाज (तोफखाना)

एकूण जखमी ११३

एकूण जखमी व मृत्युमूखी संख्या – १७५ सैनिक (यात ऑक्सिलरी घोडदळातील संख्या नाही.)

या माझ्या अहवालांमधून मी अवश्य नमूद करू इच्छितो कि, युरोपियन अधिकारी व सैनिक , तसेच लष्करी सेवेतील व लष्करी सेवेच्या बाहेरील भारतीय अधिकारी आणि सैनिक यांच्या गुणवत्ता आणि शौर्याला योग्य तो न्याय देणे माझ्याकडून शक्य नाही. या कठीण प्रसंगात या सर्वांचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली हा माझा सन्मान समजतो.

(सही) कॅप्टन एफ एफ स्टाँटन   शिरूर ३ जानेवारी १८१८.

कॅप्टन स्टाँटनचा हा अहवाल दिनांक ९ जून १८१८ रोजी लंडन गॅझेट या इंग्लंडमधील वृत्तपत्रात छापून आला होता, तसेच जॉन वायलीच्या ‘‘स्केच

ऑफ द कॉलम एॅट कोरिगम, विथ ए प्लॅन ऑफ व्हिलेज, सम लेटर्स प्रायव्हेट अँड पब्लिक, द जनरल ऑर्डर्स अँड द डिस्पॅच रीलेटिंग टू अॅक्शन ऑन द १ जानेवारी १८१८'' या पुस्तकात देखील आहे. बॉम्बे कुरिअर न्यूजपेपर, भारत सरकार पुराभिलेखागार, इतर समकालीन इंग्रजी पुस्तके अशा अनेक ठिकाणी या अहवालाचा संदर्भ मिळतो.

३ जानेवारी १८१८ रोजी इंग्रज अधिकारी एल्फिन्स्टन याने कोरेगावच्या लढाईबाबत दोन पत्र लिहिली आहेत. यापैकी एक पत्र प्रत्यक्ष लढाईच्या ठिकाणी भेट दिल्यानंतर लिहिले आहे. या दोन्ही पत्रातील मजकुरावरून कोरेगावच्या लढाईत इंग्रजांचे मोठे नुकसान झाल्याचे समजते. दोन्ही पत्रांमध्ये कोणत्याही जातींचा उल्लेख नाही किंवा ही जातीअंताची लढाई होती असेही म्हटलेले नाही. (दोन्ही पत्रांसाठी पहा परिशिष्ट १३ व १४)

इंग्रजांचा इतर सर्व समकालीन पत्र व्यवहार वाचला तर कोरेगावच्या लढाईचा उल्लेख 'डिफेन्स वॉर' म्हणजेच 'बचावात्मक लढाई' म्हणून केला आहे. यावरून समजते कि, १ जानेवारी १८१८ रोजी कोरेगाव भीमा येथे झालेली लढाई इंग्रजांच्या दृष्टीने बचावात्मक लढाई होती तर मराठा सैन्य आणि पेशव्यांच्या दृष्टीने तो मार्गक्रमण करताना आलेला अनावश्यक अडथळा होता.

कोरेगावच्या लढाईमध्ये इंग्रजांच्या बाजूने एकूण तीन लष्करी तुकड्या होत्या; त्या खालीलप्रमाणे–

१. 'सेकंड बटालियन फर्स्ट रेजिमेंट ऑफ बॉम्बे नेटिव्ह इन्फन्ट्री' जी आज भारतीय लष्करामध्ये '२ ग्रेनेडिअर' या नावाने कार्यरत आहे.

२. 'द पूना ऑक्सिलरी हॉर्स' जी आज भारतीय लष्करामध्ये 'द १७ पूना हॉर्स' या नावाने कार्यरत आहे.

३. 'मद्रास आर्टिलरी" यात बहुतांशी युरोपियन सैनिक होते व ती एक सहाय्यक तुकडी होती.

हा समकालीन पत्रव्यवहार किंवा पुस्तके यात 'ही लढाई तत्कालीन भारतीय समाजातील जातीभेद नष्ट करण्यासाठी झालेली लढाई होती' अशा आशयाचा कुठलाही संदर्भ मिळत नाही. या लढाईच्या अनुषंगाने सध्या प्रचलित असलेल्या '५०० महार, महार समाजावर अन्याय, सिदनाक महार, पेशवाईचा अंत, २८,०००

कापले, छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येचा बदला, ब्राह्मणांविरुद्ध जातीअंताची लढाई, महार रेजिमेंट ' इत्यादी शब्दांचा उल्लेख देखील आढळून येत नाही. इंग्रजांचे अहवाल,समकालीन संदर्भ व भारतीय लष्कराच्या माहितीनुसार कोरेगाव भीमाच्या लढाईत खालीलपैकी जाती धर्मातील लोक कोरेगावच्या लढाईमध्ये लढले होते.

'सेकंड बटालियन फर्स्ट रेजिमेंट ऑफ बॉम्बे नेटिव्ह इन्फन्ट्रीच्या ५०० पायदळ सैनिकांमध्ये 'मराठा, महार, शीख, गुजर, मीना, मुस्लीम, अहिर' या समुहांच्या सैनिकांचा समावेश होता.'द पूना ऑक्सिलरी हॉर्स' २५० घोडेस्वार सैनिकांमध्ये 'सुन्नी, शेख, मोगल, पठाण, सिंधी, बलोची, सिया, हिंदुस्थानी, ब्राह्मण, राजपूत आणि मराठे (खालच्या जातीचे सैनिक नसावेत) – मुसलमान, विशेषता सय्यद, शीख आणि हिंदुस्थानी' या समुहाच्या सैनिकांचा समावेश होता.

कोरेगाव भीमा लढाईच्या पश्चात..

जानेवारी १८१८च्या अखेरीस, पेशव्यांनी तीन महिन्यांत सुमारे १४०० किलोमीटरचा प्रवास केला आणि काही धावत्या लढाया लढल्या. विविध अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली इंग्रजी सैन्याने त्यांना शोधण्याचा आटोकाट प्रयत्न केला. बाजीराव पेशवे पुण्यापासून निघून साताऱ्याजवळील माहुली, नंतर मिरज, पंढरपूर आणि उत्तरेकडे संगमनेर, ओझर, कोरेगाव असा प्रवास करून सातारा येथे पोहोचले.

फेब्रुवारी १८१८ मध्ये जनरल स्मिथच्या नेतृत्वाखालील इंग्रजांनी काही जुजबी प्रतिकाराला तोंड देऊन सातारा किल्ला घेतला. यानंतर विजयासाठी इंग्रजांचे धोरण पेशव्यांना ताब्यात घेण्यावर अवलंबून होते आणि त्यावरच तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धाचा निर्णय अवलंबून होता. डिसेंबर १८१७ पासून छत्रपती प्रतापसिंह पेशव्यांच्या सैन्याबरोबर होते आणि कोरेगाव भीमा येथे उपस्थित होते. त्यामुळे छत्रपती प्रतापसिंह यांना बाजीराव पेशवे यांच्यापासून विलग करणे महत्त्वाची चाल होती. या अनुषंगाने एल्फिन्स्टनने असे घोषित केले की, छत्रपतींना पेशव्यांपासून 'मुक्त' केल्यावर, त्यांचे गतवैभव प्राप्त करून दिले जाईल.त्याचप्रमाणे 'बाजीराव पेशवे यांची साथ सोडली तर हितसंबंध अबाधित राहतील' असे आश्वासन त्यांनी इतर सर्व संबंधितांना दिले.

फेब्रुवारी १८१८ मध्ये बाजीराव पेशवे सोलापूर किल्ल्यावर पोहचले. तेव्हा त्यांच्याकडे रोख पंचाहत्तर लाख रुपये होते. परंतु किल्ल्याच्या रखवालदाराने

यातील काही रोख चोरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर पेशव्यांना केवळ तीस लाख रुपये इतकी रोख रक्कम मिळू शकली. यापश्चात बाजीराव पेशवे यांनी दक्षिणेस निपाणीकडे जाण्याची योजना आखली, परंतु इंग्रजी सैन्याने त्यांचा मार्ग अडवला. त्यामुळे मार्ग वळवून ते पंढरपूरच्या दिशेने गेले आणि वाटेत १९ फेब्रुवारी १८१८ रोजी आष्टी येथे तळ ठोकला. येथे इंग्रज-मराठा तिसऱ्या युद्धाची अंतिम लढाई लढली गेली. जनरल स्मिथने पेशव्यांच्या मागावर भीमा नदीवर आष्टीच्या दिशेने कूच केले. २० फेब्रुवारी १८१८ रोजी सकाळी त्या परिसरात एका टेकडी पलीकडच्या बाजूला, त्याने पेशवे छावणी निघाल्याचे दर्शवणारे नगारे ऐकले. इंग्रज सैन्याच्या उपस्थितीची बातमी समजताच मराठ्यांचे सेनापती बापू गोखलेंनी पेशव्यांना पुढे जाण्यास सांगितले.

लढाईची संपूर्ण जबाबदारी बापू गोखलेंनी घेतली. निपाणीकर सरदारांनी, गोखले आणि सैन्याला मदत करावी असा आदेश देऊन बाजीराव पेशव्यांनी उर्वरित सैन्यासह आष्टीपासून पुढे कूच केली. निपाणीकर सरदारांनी बापू गोखले यांना गरजेला मदत केली नाही. बापू गोखले यांच्याबरोबर जेमतेम पाचशे माणसे शिल्लक राहिली आणि त्यापैकी फक्त तीनशे सैनिक घेऊन त्यांनी इंग्रजांवर हल्ला केला. या लढाईत बापू गोखले आणि सैन्याचा पराभव झाला. 'मराठा साम्राज्याची तलवार' म्हणून ओळखले जाणारे बापू गोखले लढाईत मरण पावले. गोविंद राव घोरपडे आणि आनंदराव बाबर हे दोन प्रमुख सरदारही आष्टी येथील युद्धात मारले गेले.

आष्टीहून कूच करताना पेशव्यांच्या बरोबर छत्रपती प्रतापसिंह निघू शकले नाहीत आणि लवकरच इंग्रजांच्या ताब्यात आले. जनरल स्मिथने लिहिलेल्या २१ फेब्रुवारीच्या पत्रात म्हटले की, "सातारचे छत्रपती, त्यांचा भाऊ आणि मातोश्री यांची पेशव्यांपासून सुटका करून छावणीत सुरक्षित आणण्यात आल्याचे कळविताना मला अत्यंत समाधान आहे". प्रताप सिंह यांची छत्रपती म्हणून सातारा येथे पुनर्स्थापना करण्यात आली आणि १० एप्रिल १८१८ रोजी त्यांनी छत्रपतींच्या मांडलिकत्वाची घोषणा केली. यानंतर दुसरे बाजीराव पेशवे यांची पेशवा म्हणून नियुक्ती रद्दबातल ठरविण्यात आली.

मे १८१८ पर्यंत रायगडसह सर्व मराठा किल्ले इंग्रजांनी काबीज केले होते. अपेक्षित दीर्घ संघर्षासाठी मराठ्यांनी काळजीपूर्वक जमा केलेला संपूर्ण खजिना इंग्रजांच्या हातात पडला. इंग्रजांपासून पळून गेल्यानंतर मे महिन्याच्या अखेरीस

बाजीराव पेशव्यांबरोबर सहा हजार माणसे राहिली होती.यानंतर ते 'पेशवा'न राहता इंग्रजांनी घोषित केल्याप्रमाणे 'बंडखोर' म्हणून गणले गेले. अशा हलाखीच्या परिस्थितीत बाजीराव पेशव्यांनी त्यांचा इंग्रज मित्र जॉन माल्कमशी संवाद साधला.

माल्कम आणि बाजीराव यांच्यात शरणागतीच्या वाटाघाटी सुरू झाल्या. २ जून १८१८ रोजी दोघे खैरी येथे भेटले जेथे माल्कमने बाजीराव पेशवे यांना वर्षाला आठ लाख पेन्शन देण्याचे आश्वासन दिले परंतु पेशवा म्हणून त्यांना पूर्वपदावर कामकाज करता येणार नाही अशी ताकीद दिली. बाजीराव पेशव्यांनी उत्तरेत आपल्या पसंतीच्या ठिकाणी जाऊन राहायची इच्छा व्यक्त केली ज्याला इंग्रजांनी परवानगी दिली. ३ जून १८१८ रोजी माल्कमने पेशव्यांच्या आत्मसमर्पण आणि तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाच्या विजयी समाप्तीची बातमी संबंधितांना दिली.

कुटुंब आणि निवडक सैन्यासह बाजीराव पेशवे कानपूरजवळील बिथूर शहरात हद्दपार झाले. तिथेच २८ जानेवारी १८५१ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

•••

प्रकरण ३

जयस्तंभ

१ जानेवारी १८१८ कोरेगाव भीमा लढाई नंतर १८२२ साली मौजे पेरणे येथे इंग्रजांकडून जयस्तंभ उभारण्यात आला. येथे प्रथमतः हे नमूद करणे गरजेचे आहे की, ही लढाई अनिर्णायक रित्या थांबली हे इंग्रजांची समकालीन कागदपत्रे आणि इतर संदर्भ यावरून स्पष्ट होते. म्हणजेच या लढाईत इंग्रज अथवा मराठा सैन्य यांच्यापैकी कुणाचाही विजय झाला असे म्हणता येत नाही. तथापि स्तंभावर इंग्रजांकडून स्थापन केल्या गेलेल्या मराठी पाटीवर त्याचा उल्लेख 'जयस्तंभ' असा केला आहे. सदर स्तंभ इंग्रजांच्या पुढाकाराने 'मिलिटरी मॉन्युमेंट (लष्करी स्मारक)' म्हणून उभारण्यात आला. विशिष्ट लढाईत शौर्य गाजविलेल्या सैनिकांप्रति आदर म्हणून असे स्तंभ जगभरातून विविध ठिकाणी उभारले जातात. सदर स्तंभ सध्या प्रचलित प्रचाराप्रमाणे महार बांधवांनी केलेल्या जातीअंताच्या लढाईचे स्मारक देखील नाही. माऊंट एल्फिन्सटन या अधिकाऱ्याने पुढाकार घेऊन २६ जून १८१८ रोजी वरिष्ठ अधिकाऱ्याला स्तंभाच्या उभारणीसाठी पत्र लिहून याबाबत सूचना केली. पत्रात तो लिहितो –

(मराठी अनुवाद, मूळ इंग्रजी पत्र–वाचा परिशिष्ट ४)

मी आपणास सुचवू इच्छितो कि, सन्माननीय गव्हर्नर जनरल यांनी कोरेगावच्या लढाईत जे सैनिक आणि अधिकारी जखमी अथवा मृत झाले त्यांच्या स्मृती कायम राहाव्या यासाठी एक स्मारक उभे करावे. खरे तर याआधी मी स्वतः गव्हर्नर जनरल यांना शिफारस करणार होतो मात्र आत्तापर्यंत आपली लढाई सुरूच होती त्यामुळे मी अशी शिफारस करू शकलो नाही. माझ्या अखत्यारीत मी अशी शिफारस करू शकतो परंतु, ही ऑर्डर गव्हर्नर जनरल यांच्या सहीनेच व्हावी असे माझे मत आहे

कारण त्यांनी केलेल्या शिफारशीमुळे सैनिकांच्या पराक्रमाचा खऱ्या अर्थाने सन्मान होईल. आणखी विशेष बाब म्हणजे हे स्मारक उभारण्याचा सर्व खर्च सार्वजनिक खर्चातून केला जावा असे देखील मला वाटते. हे स्मारक बांधतांना मी एक सूचना अवश्य करू इच्छितो की, या लढाईत सहभागी प्रत्येक सैनिकांचे नाव हे इंग्लिश, पर्शियन आणि मराठी भाषेत कोरले जावे.

(सही)

माऊंट एल्फिन्सटनने केलेल्या शिफारशीवर दि.१९ सप्टेंबर १८१८ रोजी चीफ सेक्रेटरी ऑफ गव्हर्न्मेंट, जे. ॲडम याने खालीलप्रमाणे उत्तर दिले.

(मराठी अनुवाद, मूळ इंग्रजी पत्र-वाचा परिशिष्ट ५)

आदरणीय माऊंट एल्फिन्सटन यांस,

२६ जून रोजी तुम्ही पाठवलेल्या शिफारशीच्या पत्रानुसार कौन्सिलच्या गव्हर्नर जनरल यांनी मला निर्देश दिले आहेत की, तुम्ही पाठवलेल्या शिफारशींना गव्हर्नर जनरल यांचा पाठिंबा असून १ जानेवारी रोजी कोरेगाव येथे झालेल्या लढाईतील शौर्याचे प्रतीक म्हणून सार्वजनिक खर्चातून स्मारक बांधण्याची तुमची संकल्पना त्यांना आवडली आहे.


हे स्मारक कोणत्याही विलंबाशिवाय लवकरात लवकर पूर्ण करावे असा संदेश गव्हर्नर जनरल यांनी दिला आहे. त्यासाठी स्मारकाचा आराखडा, स्मारकाचे ठिकाण आणि स्मारकाच्या उभारणीसाठी येणारा अंदाजे खर्च किती असेल, याचा तपशील कळवण्यास सांगितले आहे.

स्मारकावर जखमी आणि मृत सैनिकांची नावे इंग्लिश, पर्शियन आणि मराठी ह्या भाषेत करण्यास मान्यता दिली आहे.

(सही) जे. ॲडम

कोरेगावच्या लढाईत इंग्रज सैन्याने जो पराक्रम केला त्याची आठवण कायम राहावी म्हणून 'जयस्तंभ' उभारणीला परवानगी देण्यात आली आणि बांधणीसाठी अंदाजे किती खर्च येईल ह्याचा हिशोब काढायला सांगितले.

२९ सप्टेंबर १८१९ रोजी माऊंट एल्फिन्सटन ह्या अधिकाऱ्याला शिरूर छावणीतून पत्र लिहिले गेले ज्यामध्ये स्तंभाच्या उभारणीचा अंदाजे खर्च दिला होता.



स्मारकाचा आराखडा आणि छायाचित्र याची मूळ प्रत


या पत्रात उंचीनुसार अंदाजे खर्चाची माहिती खालीलप्रमाणे दिली होती

३० फुटी स्तंभासाठी लागणारा खर्च होता– १७,२२३ रुपये

५० फुटी स्तंभासाठी लागणारा खर्च होता- २४,८४५ रुपये

६५ फुटी स्तंभासाठी लागणारा खर्च होता- ३४,१५१ रुपये

हा सर्व खर्चाचा अंदाज आणि आराखडा पुण्याचा इंजिनियर कॅप्टन नट ह्या अधिकाऱ्याने काढलेला होता. या आराखड्यांपैकी ६५ फुटी स्तंभाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला , ज्याला अंदाजे ५०,७८६ रुपये इतका खर्च आला.



COLUMN AT CORYGAUM.

Dimensions.

	ft	in			ft	in
Base of Pedestal	11	0	square	Height of flight of Steps	3	0
Die of ... do	10	0	do	Do. of Pedestal	15	0
Base of Obelisk	9	0	do	Do. of Obelisk	50	0
Top of ... do	4	6	do	Total height	68	0

स्मारकाचा अंतिम आरखडा

दि. २२ मार्च १८२१ रोजीच्या पत्रामध्ये स्तंभाच्या पायाभरणीच्या संदर्भात नियोजनाचा खुलासा केला गेला.

(मराठी अनुवाद, मूळ पत्र –वाचा परिशिष्ट ६)

पुणे कमिशनर विल्यम चॅप्लिन यांस,

कॅप्टन नट यांनी कोरेगाव येथे उभारण्यात येणाऱ्या लष्करी स्तंभाचा पायाभरणी कार्यक्रम या महिन्यातल्या २६ तारखेला करण्याची तयारी केली आहे.या कार्यक्रमाला पायाभरणीसाठी उपस्थित राहण्याचे भाग्य मला मिळणार आहे. यासाठी मी सशस्त्र दलाची एक तुकडी आणि १ ग्रेनेडिअर बटालियनच्या पहिल्या रेजिमेंटच्या २०० सैनिकांना कोरेगाव येथे उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.

हेड क्वार्टर पुणे
आर्मी डिव्हिजन
शिरूर कॅम्प , २२ मार्च १८२१
सही

सोमवार, दि. २६ मार्च १८२१ रोजी लष्करी स्तंभाच्या पायाभरणीचा समारंभ मोठ्या उत्साहाने पार पडला. कोरेगाव भीमा स्तंभ उभारणी समारंभाच्या वेळेस तिथे मेजर जनरल स्मिथ हे मोठे आणि महत्त्वाचे अधिकारी उपस्थित राहू शकले नाहीत म्हणून त्यांच्या वतीने कर्नल हस्कीनसन उपस्थित होते. कर्नल हस्कीनसन यांच्या हस्ते या मिलिटरी जयस्तंभाचा पाया भरला गेला. या समारंभासाठी प्रांतातील बहुतांशी सर्व लष्करी अधिकारी उपस्थित होते. समारंभ सायंकाळी ५.३० वाजता पार पडला. या ठिकाणी लष्कराचा भव्य शामियाना उभारण्यात आला. सर्व परिसरात हर्षोल्हासाचे वातावरण होते. यावेळी निमंत्रित अधिकाऱ्यांनी 'हिज मॅजेस्टी ४७ रेजिमेंट बँड'च्या तालावर 'धीरेचाल' केले. समारंभास्थळी पाहुण्यांच्या स्वागतासाठी 'मद्रास आर्टिलरी'ची एक तुकडी आणि 'कोरेगाव

रेजिमेंट ग्रेनेडियर'च्या दोन पलटणींकडून मानवंदना दिली गेली. या नंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. स्तंभाच्या पायाभरणीचा समारंभ हा आगळावेगळा होता. पायाभरणी करतांना दगडाखाली एक पितळी प्लेट घालण्यात आली. या पितळी प्लेटच्या सोबत काही ब्रिटीश नाणी आणि एक चर्मपत्र लावण्यात आले. त्यावर उपस्थित मान्यवरांची नावे लिहिण्यात आली. पाटी खालीलप्रमाणे–

THIS FOUNDATION STONE WAS LAID
Anno Domini 1821
The Most Noble The Marquis of Hastings,
Governor General of India.
AND
The Honourable Mountstuart Elphinstone,
Governor of Bombay.

या कार्यक्रमानंतर कर्नल हस्कीनसन यांनी स्तंभाच्या पायाभरणीच्या कामाची पाहणी केली. पुढे मद्रास आर्टिलरीच्या तुकडीने हवेत तीन फैरी झाडून शाही सलामी दिली. या संपूर्ण सोहळ्याची जबाबदारी कॅप्टन नट कडेच होती. त्यांनी उपस्थितांना संबोधित करून सोहोळ्याची सुरुवात केली. ते या भाषणात म्हणाले–

''उपस्थित मान्यवर हो... या किंवा इतर कोणत्याही देशाच्या इतिहासात सर्वात चमकदार लष्करी कामगिरीपैकी एक असलेल्या कोरेगावच्या घटनेच्या स्मरणार्थ आज आपण या ठिकाणी एकत्र जमलो आहोत. ही कामगिरी पूर्वेकडील राष्ट्रांतील सर्वात मोठी कामगिरी असेल आणि भविष्यकाळात इतिहासकार या घटनेची नोंद घेतील या बाबतीत माझ्या मनात शंका नाही. कोरेगावच्या या ऐतिहासिक कामगिरीच्या आठवणी चिरंतन राहाव्यात यासाठी जो कोनशिला समारंभ आज आयोजित केला गेला आहे, त्यासाठी बॉम्बे प्रांताचे गव्हर्नर, ज्यांनी या लढ्यात भावनिकदृष्ट्या समरस होऊन मोठे योगदान दिले तसेच सध्याच्या ईस्ट कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून ज्यांनी स्तंभाच्या उभारणीला मान्यता दिली, त्यांच्याच आज्ञेवरून मान्यता दिलेला हा कोनशिला समारंभ माझ्या डाव्या बाजूला बसलेला शूर कर्नल हस्कीनसन यांच्या शुभहस्ते पार पडत आहे.


सभ्य गृहस्थहो, मला असे वाटते की, हा दिवस त्या लढाईत लढलेल्या सर्व शूर योद्ध्यांमुळे पाहू शकलो; आणि त्याचा यथायोग्य सन्मान कुठल्या सरकारने करायचा ठरवला तर तो याच पद्धतीने केला जाऊ शकतो, जो आपण इथे आज करत आहोत. येथे ज्या शूर सैनिकांची नावे कोरली गेली आहेत त्यांची केवळ वैयक्तिक अभिमानाची गाथा इथे विशद केली जात आहे असे नाही, तर त्यांनी या निकराच्या लढाईत आपल्या सरकारला स्थैर्य मिळवून देण्यात यश प्राप्त केले आहे हे देखील अवश्य नमूद करावे लागेल. आपल्या सैन्य तुकडीच्या पराक्रमी इतिहासात, आपल्या बलिदानाने आणि सहभागाने मानाचा तुरा रोवण्यात देखील त्यांचे योगदान आहे.

हा संघर्ष साधासुधा अजिबातच नव्हता तर तो रोम आणि ग्रीक साम्राज्याच्या लढ्याच्या तोडीचा होता. कमी संख्येने सैनिक असतांना बलाढ्य आणि आक्रमक फौजा ३६ तास सतत आक्रमक होत्या, अशावेळी आपल्या लढवय्या तुकड्या इमान, साहस आणि चिकाटीने लढल्या. त्याच्या कहाण्या इथल्या गावागावात आम्ही सर्वेक्षण करून गोळा केल्या आहेत, यामुळेच ग्रेट ब्रिटेनच्या युद्धाच्या इतिहासात कोरेगावचा हा लढा अजरामर आहे. ग्रीक आणि रोमन लढ्याइतकाच तो रोमांचकारी आहे. आपल्या ब्रिटनमधील सर्व विद्यापीठांमध्ये, राष्ट्रीय सैनिकी शाळांमध्ये या लढ्याचा अध्याय आपल्या विद्यार्थ्यांना सांगावा इतका महत्त्वाचा हा लढा आहे.''

भाषणानंतर कॅप्टन नट मद्याचा एक प्याला उंचावून सर्वांना 'टोस्ट' सादर करत म्हणाले, ''कोरेगावच्या संस्मरणीय लढ्यात कामी आलेल्या शुरांच्या आत्म्यास शांती लाभो.'' यानंतर धीरेचाल मार्चिंगची धून सुरू झाली आणि लष्करी बँडच्या सुरांनी आसमंत व्यापून गेला. या समारंभात झालेल्या अतिरंजित भाषणामध्ये केवळ इंग्रज अधिकारी आणि सैनिक यांचा उल्लेख होता ही बाब विशेष नोंद घेण्यासारखी आहे. दि. २६ मार्च १८२१ चा हा सर्व कार्यक्रम पार पडला. यानंतर जयस्तंभाची बांधणी १८२२ मध्ये पूर्ण झाली.

स्तंभावरील पाट्या खालीलप्रमाणे,

*स्तंभाच्या पश्चिमेची बाजू- वाचा परिशिष्ट ७


THIS COLUMN
IS ERECTED TO COMMLMORATE THE DEFENCF OF CORIGAUM
BY A DETACHMENT COMMANDED BY CAPTAIN STAUNTON OF THE BOMBAY ESTABLISHMENT
WHICH WAS SURROUNDED ON THE 1sT OF JANUARY 1818
BY THE PAISHWAS WHOLE ARMY UNDER HIS PERSONAL COMMAND
AND WITHSTOOD THROUGHOUT THE DAY A SERIES OF MOST CBSTINATE
AND SANGUINARY ASSAULTS OF HIS BEST TROOPS
CAP IAIN STAUNTON
UNDER THE MOST APPALLING CIRCUMSTANCES
PERSEVERED IN HIS DESPERATE RESISTANCE
AND SECONDED BY THE UNCONOUERABLE SPIRIT OF HIS DETACHMENT
AT LENCTH ACHIEVED THE SIONAL DISCOMEITURE OF THE ENEMY
AND ACCOMPLISHED ONE OF THE PROUDEST TRIOMPHS
OF THE BRITISH ARMY IN THE EAST
TO
PERPETUATE
THE MEMORY OF THE BRAVE TROOPS
TO WHOSE HEROIC FIRMNESS AND DEVOTION IT OWES THE CLORY OF THAT DAY
THE BRITISH GOVERNMENT
HAS DIRECTED THE NAMES OF THEIR CORPS AND OTHE KILLED AND WOUNDED
TO BE INSCRIBED ON THIS MANUMENT
MD CCC XX II
SIMPSON & CL LEWELYN SCT[S]
CALCUTTA

स्तंभाच्या पश्चिमेची बाजू

✻ स्तंभाची उत्तरेकडची बाजू

१ मौजे कोरेगांव येथे इंग्रेजी लोक लढाइत जय मेळऊन पडले व जखमी जालेल्याची नावे

१ मद्रासि तोफ खान्याची २५ मनुष्यांची तुकडी १ त्यात तोफा २ त्यात १लेफतनेंत उलीम चीसम सरदार पडला १ डॉक्टर जान वायली

१ मुंबई सर्कार्चो पायदळ लोक पहिले ग्रेनादीररिजमेंट पळटण दुसरेव्यात १ कप्तान स्थान्नन साहेब मुख्य सरदार १ लेफटनेंत टामस पाटीन्सन पडला १ लेफटनेंत ज्यान कॉर्नलन जखमी १ लेफटनेंत जोसिफजोन्स १ डॉक्टर विइनगेट पडला.

१ इंग्रेजी सर्कार्चो पुणे पैकी सिलेदारी स्वार २५० त्यात सरदार च्या लिसस्वानस्थन जखमी

१ तोफ खान्यापैकी पडले १ जमालतांडेल दुइम १ गोविंद लस्कर १ शेख आमद लस्कर १ राम स्वामी लस्कर १ दिसान लस्कर ||पैकी जखमी|| फत्ते महंमद सारग

१ इमाम सायब लस्कर १विलीयादन लस्कर १रामरु लस्कर १ वेंकटचिलिम लस्कर १ वेंकटस्वामी

१ मुंबई सर्कार्चो पायदळ लोक ग्रेनादी ररिजमेंट पळटण दुसरे ||पैकी

*पडले|| बापूसिंदा जमातदार १ गणोजी गोरे जमातदार १ कानसिंग हवालदार, १ एटमेतरबाळमेतर नाईक १ सोननाक कमळनाक नाईक १ रामनाक येसनाक नाईक १ प्रसादसिंग शिपाई १ लक्ष्मण बदोसा शिपाई १ बाबू सावंत शिपाई १ गोंदनाक कोठेनाक शिपाई रामनाक येसनाक शिपाई १ लक्ष्मण कुकडा शिपाई १ भागनाक हरनाक शिपाई १ राघोजी मोद्रे शिपाई १ भागोजी वयार शिपाई १ अबनाक काननाक शिपाई १ खंडोजी शिपाई १ गोपाळजी कोंडे शिपाई १ गणनाक बाळनाक शिपाई १ भवानजी इटेकर शिपाई१ शीऊबक्स सिंग शिपाई १ सजणाजी पवार शिपाई १ चागोजी जाधव शिपाई १ बालनाक घोडनाक शिपाई १ रूपनाक लखनाक शिपाई १ राणोजी जाधव शिपाई १ बपनाक रामनाक शिपाई १ बाळोजी सिग्वान शिपाई १ विटनाक धामनाक शिपाई १ राजनाक गणनाक शिपाई १ अबदुल करसान शिपाई १ सदिशिंग शिपाई १ बपनाक हरनाक शिपाई १ अर्जुनजी चव्हाण शिपाई १ रौनाक जानताक शिपाई १ सजनाक येसनाक शिपाई १ गणनाक *रमनाक शिपाई १ कोठेखान शिपाई १ देवनाक अननाक शिपाई १ गोपाळनाक बाळनाक शिपाई १ हणमंत मातर शिंग शिपाई १ हरनाक हिरनाक शिपाई १ मनसाराम शिपाई १ अनोजी धारसे शिपाई १ जेटनाक दोनाक शिपाई १ ऐश्वम इरेकर शिपाई १ निधानशिंग शिपाई १ गणनाक लाखनाक शिपाई १ सुरतशिंग शिपाई १/पैकी जखमी|| देवशिंग सुभेदार सोनमेतर गोंदमेतर जमातदार १ जानोजी साळुंखे नाईक १ जाननाक हिरनाक परगाववाला १ भोळाशिंग शिपाई १ बक्षुसुशिंग शिपाई १ भीकनाक रतनाक शिपाई १ रतनाक धाननाक शिपाई १ वरसारखार शिपाई १ माहादोजी गोळी शिपाई १ विसरामशिंग शिपाई.*

इंग्रेजी सर्कार्चो पुणे येथील सिलेदार स्वार पैकी ||पडले|| शेख इभ्रम सिलेदार १ शेक नथु सिलेदार १ नथेखान सिलेदार १ शेख महंमद सिलेदार १ आपाजी सिलेदार १ खंडोजी सिलेदार १

*गोपाळा सिलेदार १ मुकुंदराव सिलेदार १ सटवाजी सिलेदार १ डुलोबा सिलेदार १ नारोबा सिलेदार १ इभ्रमखान सिलेदार १ शेख अबदला सिलेदार १ रामजी नाईक सिलेदार १ पिमशिंग सिलेदार १ हैबती नायक सिलेदार १ महीपती सिलेदार १ विठोबा सिलेदार १ इमामखान सिलेदार १ गणेशशिंग सिलेदार १ हरिशिंग सिलेदार १ उदाजी सिलेदार १ गंगाजी सिलेदार १ नेकनाह सिलेदार १ भवानीशिंग सिलेदार १ बातशिंग सिलेदार १ पराजी सिलेदार १ शेख सातू सिलेदार १ वजीर महंमद सिलेदार १ रयमखान सिलेदार १ जमालदिन सिलेदार १ येंकोजी सिलेदार १ दाऊदखान सिलेदार १ गंगाजी सिलेदार १ हुसेनखान सिलेदार १ गोदाजी सिलेदार १ खंडेराव सिलेदार १ शेखलाल महंमद सिलेदार १ नतेखान सिलेदार १ दमाराम सिलेदार १ इठोजी सिलेदार १ लक्ष्मण येमाजी सिलेदार १ रामजाना सिलेदार १ सदाशिव लक्ष्मण सिलेदार १ आलीखान सिलेदार १ ||पैकी जखमी|| मिरागणी रिसालदार १ ओमशिंग जमातदार १ व्यंकटरामराजू दफेदार, हणमत्या सिलेदार १ शेख कासीम सिजमाल सिलेदार १ गुलामरमुल सिलेदार १ शेख जमाल सिलेदार १ हुशेन महंमद सिलेदार १ हामाद सिंग सिलेदार १ ***** सिलेदार १ सयदवुदन सिलेदार १ हिरापा सिलेदार १ इमाम अली सिलेदार १ महिपतु सिलेदार हामदशिंग सिलेदार १ शेख मदार सिलेदार १ हसन महंमद सिलेदार १ बापू भोय सिलेदार १ मीरहसन अली सिलेदार १ राघोजी सिलेदार १ अबदुल कादीर सिलेदार १ फरीक महंमद सिलेदार १ चिमाजी सिलेदार १ **राम सिलेदार १ बालाजी सिलेदार १ मयाजी सिलेदार १ दुलोजी सिलेदार. हलि*सन १८२२ इसवि शके १७४३*

सदर नावे वाचली असता असे समजते की या सैनिकांमध्ये कुठल्याही एका विशिष्ट जाती किंवा धर्माचे सैनिक नसून यात संमिश्र जाती धर्माच्या सैनिकांचा समावेश होता.

* स्तंभाच्या पूर्वकडची बाजू– परिशिष्ट ८

NAMES OF CORPS AND EUROPEAN OFFICERS ENGAGED

DETACHMENT OF MADRAS ARTILLERY — LIEUTENANT - W CHISHOEM KILLED; ASSISTANT SURGEON - J WYLLIE

IID BATT IST REGT BOMBAY NATIVE INFANTRY — CAPTAIN - FF STAUNTON; LIEUTENANT - J JONES; - T PATTINSON KILLED; - J CONNELLAN WOUNDED; - T. WINGATE KILLED; ASSIST SURGEON - SWANSTON WOUNDED

POONA AUXLLIARY HORSE — LIEUTENANT

LIST OF KILLED AND WOUNDED

KILLED·DETACHMENT OF MADRAS ARTILLERY:SERJEANT,MARK BURKE·CORPORAL JOHN GORDON·GONNER WILLIAM GIBSON·MATROSSES.ROBERT SEAT·MICHAEL OGRIEN·THOMAS HORNGELY·MICHAEL HUGHES·JOHN BOYLE·PETER FLYNN·DEWIS HENDRICK·DENNIS DUINN.2D TINDAL JEMAUL·LASCAR GOVINDOO·SHAIK AHMED·DISSAN RAMSWAMY IID BATT IST REGT BOMBAY NATIVE INFANTRY JEMADAR BAPPO SCINDEAH·CUNNAJEE GOWRAY·HAVILDAR CURRUG SING NAIGUE ETMETER BALMETER·SCNNAC CUMMULNAC RAMNAC.ESSNAC·PRIVATE.FURSAD SING·BAPPOO SAWANT·LUXIMAN BONDOSA·GONDNAC COOTEN NAC·RAKNAC ESSNAC LAXIMON KOOADAH·BHAGNAC HORNAC·BACOJEE NIER·AMNAC CANNAC CANOOJEE·GOPAL JEE·MOONDAH·GUNNAC SALNAC·BHOWANJEE ETTAKAR·SUDDY SING·SEW BUCKAS SING·SUGNAJEE POMWAR·HANOOJEE JADOOW·BALNAC OHONONAC·ROOPNAC LUCKNAC·ETTNAC DHACKNAC·RANOJEE JAIDOW ROBNAC RAMNAC·BALLOJEE SHEGWAN·RAZNAC GUNNAC·ABDUL CURSON BOBNAC HUBNAC·ADJUZIE CHOWAN·RYNAC JANNAC·SUJUNNAC ESSNAC·GUNNAC DIRUMNAC·KATTAY KAWN·DEWHAC ANNAC GOPALNAC BALNAC·PUHWANT MATEP·HURNAC HIERNAC·MUNSHA RAM·ANNOJEE DARGEY·JETNAC DOWNAC·ESSRAM EDEKER NEEDHAM SCING·GUNNAC LUCKNAC·SORET SGINE POONA AUXILIARY HORSE SILLADARS SHAICK EBRAM·SHAICK MATTOO·NUTTARY KHAN SHAICK MAHOMED·APPAJEE·CUNDOOJEE·GOPALLAH·MOKUND RAW·SUTWAJEE·DOOLOOBA NAROOBA EMAMKHAN SHAICK ABDOOLLA·RAMJEE NAICH PIM SINS·MYPUTTY·HYBUTTY ECTOBA·EMAMKHAN·GUNNESS SING·HURRY SING GODAJEE·GUNGAJEE·NECKNAMA·BHOWANEY SING·BATT SIN·PARANJEE SHAICK SHATTOO·WOOZEEN MAHOMED·KUNDE ROW·SHAICK LOLL MAHOMED·NUTTAY KHAN·DYSAM ETTOOJEE·RYEM KHAN·NOORJA MOOLLADEEN·ENCOJEE·DAWOOD KHAN·GUNGAJEE·ALLEY KHAN·HOOSSAIN KHAN·GODAJEE·LUXAMAN·ESSAGEE RAMJANA·SUDDASHEE·LUXMAN

WOUNDED

DETACHMENT OF MADRAS ARTILLERY SERJT.WILLIAM PIDGEON·JUNNER,JOHN TAYLOR MATROSSES,JOHN MURRAY·DAN^L M^C CARTHY·JOHN PAREIT·R.C.KING·RICH^d JUKES·JOHN BIRD GUN LASCARS SYRANG FUTTY MAHOMED·LASCARS IMAUM SAIB·NELIADUM·RAMROO·NENKUT CHELLUM NINKAH SWAMY II^D BATT 1^st REGT. B N.I. SUBEDAR DAVEY SING JAMEDAUR SOAN MITTER COND MITTER·SERJEANT W DAVIS NAIGUE,TANOJEE SALOONKAY·DRUMMER TANNAC HURNAC.PRIVATES BHOOLA SCING·BUCKSOO SCINE·BHIGNAC·RUTTONNAC DHANNAC·BURSAR,KHIER·MAHADJEE GOWLEY·BHISRAM SCING POONA AUXILIARY HORSE RUSSALDAR MERAM GUNNEY, JEMIDAR BEEM SING·DUFFADAR VENCAT RAM RAJOO,SILLADARS HUNWOUNTA·SHAICK HASSIM·GOOLLAM RUSSOOL SHICK JUMAUL·HASSAIN MAHOMED·GUNGA RAM·SIED BOODUM·HEERAPAH·EMAM ALLY·MYPUTTOO·HAMED SING·SHAICK MADDAR·HUSSAN MAHOMED·BAPOO BHOE CHIMAJEE·RAMAH·BALDAJEE·MEER HOOSSAIN ALLEY·BAGOJEE ABDOOL CADER·FACKEER MAHOMED MYACEE·DOOLJEE

SIMPSON & CL LEWELYN SCT^S
CALCUTTA

स्तंभाच्या पूर्वेची बाजू

स्तंभाच्या दक्षिणेची बाजू

जयस्तंभ

कप्तान स्थान्तन साहेबाच्या स्वाधीन मुंबइ सर्कोच्या पळटणचे लोक ५००, व स्वार २५० व तोफखान्याची मनुष्ये २५ व तोफा २ होत्या. त्याज वर सन इसवी १८१८ ज्यानेवारी तारीख १ शके १७३९ मार्गशीर्ष वद्य ९ गुरुवार ते दिवसी कोरेगावच्या मुकामी पेशव्यांच्या सारे फौजने चालन येऊन घेरा दिला आणि आरब व दुसरे निवडक लोक पेशव्यांचे यानी मोठ्या चढायावर चढाया केल्या अस्ता पेशवांच्या फौजेचा मोड करून इंग्रेजी लोकानी जय मेळविला ही कीर्ती राहावी म्हणून हा जयस्तंभ उभारिला आहे यावर या वीरांचा पराक्रम व सर्कोचीकरी विषइं प्राणास उदार जाले हा लोकीक बहुत काळ राहावा यास्तव त्यांच्या पळटणाची व लढाईत पडले व जखमी जाहाले यांची नावे इंग्रेजी सर्कार्ची आज्ञा होऊन या जयस्तंभावर दुसऱ्या अंगास लिहिली आहेत.

सन इसवी १८२२

शके १७४३

स्तंभावरील ह्या लेखातून स्तंभाचा हेतू स्पष्ट समजतो. हा जातीअंताच्या लढाईत विजय मिळाल्यावर बांधलेला विजयस्तंभ, क्रांतीस्तंभ, रणस्तंभ, शौर्यस्तंभ नसून फक्त एक लष्करी स्मारक आहे आणि त्याचा कुठल्याही जाती धर्माशी संबंध नाही.

जयस्तंभ प्रभारी (इन–चार्ज)

स्तंभाची उभारणी पूर्ण झाल्यावर तेथे प्रभारी(इन–चार्ज) नेमण्यासंदर्भात अटी शर्ती इंग्रजांच्या दि.२२ नोव्हेंबर १८२४ पत्रात सविस्तर नमूद केल्या आहेत.चीफ सेक्रेटरीने डेक्कन कमिशनरला लिहिलेल्या या पात्रातील खुलासा पुढीलप्रमाणे–

(मराठी अनुवाद, मूळ पत्रासाठी – वाचा परिशिष्ट ९)

कोरेगावच्या लढाईच्या स्मरणार्थ उभारलेल्या स्मारकाचे काम पूर्ण झाले आहे, गव्हर्नर कौन्सिल यांनी स्मारकाचे जतन करण्याच्या दृष्टीने असे नमूद केले आहे की, स्मारकाची जबाबदारी एका गुणवान सैनिकाकडे सोपवावी ज्याचा सहभाग कोरेगावच्या लढाईत होता.

मला गव्हर्नर कौन्सिल यांची विनंती तुमच्यासमोर मांडायची आहे की, लेफ्टनंट कर्नल स्टाँटन यांना सर्वात योग्य व्यक्तीची निवड करायला सांगावे परंतु अशी व्यक्ती परवारी (महार) जातीची नसावी. तसेच ही वास्तू जपण्याची सदर व्यक्तीने काळजी घ्यावी आणि सोबतच त्याने येणाऱ्या–जाणाऱ्या प्रवाशांना स्तंभाबाबत माहिती द्यावी.

ही जबाबदारी पुरुष वंशज असेपर्यंत त्याच कुटुंबावर सोपवली जाईल परंतु असा वंशज न जन्मल्यास, सरकार नवीन व्यक्ती तिथे नेमेल.

स्तंभाशेजारील जमिनीचा तुकडा किंवा वार्षिक रुपये आणि पहिल्या नेमलेल्या व्यक्तीला जमादार हुद्दा देण्यात येईल (इन–चार्ज).

सही

या पत्रांमधून ज्या अटी घातल्या होत्या त्या सर्व इंग्रजांच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाच्या होत्या.

१. ज्या व्यक्तीने कोरेगाव भीमा लढाईमध्ये शौर्य गाजविले असेल त्यालाच स्तंभाचे इन–चार्ज बनवावे.

२. परवारी म्हणजेच महार जातीचा व्यक्ती तिथे इन-चार्ज म्हणून नेमू नये. (याचा अर्थ इंग्रजांनी महार सैनिकांना डावलले. यातून इंग्रजांचा जातीवाद स्पष्ट कळून येतो.)

३. स्तंभाच्या शेजारील जमीन आणि ठराविक अनामत रक्कम वार्षिक पद्धतीने इन-चार्ज यांना देण्यात यावी.

या पत्राचा विचार करून लगेचच पुढील काही दिवसांत कोरेगाव लढाईचे नेतृत्व करणारे कॅप्टन स्टाँटन यांच्या सल्ल्याने कोरेगाव लढाईमधील शूर सैनिक हवालदार खंडोजी माळवदकर यांना स्तंभाचे प्रभारी (इन-चार्ज) म्हणून नेमण्यात आले. दि. १३ डिसेंबर १८२४ रोजी गव्हर्नर जनरल यांनी खंडोजी माळवदकर यांच्या नावाने ऑर्डर दिली, ती ऑर्डर खालीलप्रमाणे-

(मराठी अनुवाद, मूळ पत्रासाठी- वाचा परिशिष्ट १०)

कोरेगाव येथे उभारलेल्या स्मारकाची बांधणी पूर्ण झाली आहे. कॅप्टन स्टाँटन यांच्या शिफारशीवरून पहिल्या कंपनीचे हवालदार खंडोजी, जे कोरेगावच्या लढाईमध्ये जखमी झाले होते त्यांना जयस्तंभाचे इन-चार्ज म्हणून नेमण्यात येत आहे आणि ही जबाबदारी त्यांच्यावर, त्यांचे कुटुंबात पुरुष वंशज असेपर्यंत कायम राहील परंतु असा पुरुष वंशज न जन्मल्यास, सरकारने तिथे नवीन इन-चार्ज नेमावा. खंडोजी यांना जमादार ही बढती दिली जात आहे. त्यानुसार त्यांना वेतनवाढ मिळेल आणि याची नोंद पुणे लष्कर विभगात उपलब्ध होईल.

जयस्तंभाशेजारील जमीन किंवा वार्षिक रुपये त्यांच्या स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी पुढे देण्यात येणार आहे.

(सही)

ही जनरल ऑर्डर स्वतः माननीय गव्हर्नर कौन्सिल यांच्या आदेशावरून खंडोजी माळवदकर यांना देण्यात आली. खंडोजी माळवदकर यांना जयस्तंभाचे इन-चार्ज नेमल्यावर बुधवार, दि. २२ डिसेंबर १८२४ रोजी 'बॉम्बे गॅझेट वॉल्युम ३५ क्रमांक १८०३' ह्या वृत्तपत्रामध्ये पहिल्याच पानावर त्यांची ही बातमी आली. (फोटो - मूळ बातमी बॉम्बे गॅझेट)

Bombay Castle, 13th December 1824.

The erection of the Pillar intended to commemorate the battle of Corygaum having lately been completed near the spot where the action took place; the Hon'ble the Governor in Council is pleased, on the recommendation of Lieutenant Colonel Staunton C. B. who commanded the British Troops on that memorable occasion, to appoint Cundojee Mullojee, now a Havildar in the 1st Company of Invalids, but late of the 1st Battalion 2d Regiment N. I. and wounded in the action of Corygaum; to the charge of this Pillar, and to declare the trust to be hereditary in his family for ever; but, in case of the failure of any male issue to the person enjoying the grant, it will rest with the Government to appoint a successor.

Cundojee Mullojee is promoted to the rank of Jemedar with the pay and advanges of that rank from this date, and will be borne on the books of the Paymaster of the Poona Division of the army.

A piece of land adjacent to the Pillar, or an annual sum of money will be further assigned by Government for the future maintenance of the persons in charge of this trust.

खंडोजी माळवदकर यांना जयस्तंभाचे इन–चार्ज नेमल्यावर बुधवार, दि.२२ डिसेंबर १८२४ रोजी 'बॉम्बे ग्याझेट वोल्युम ३५ क्रमांक १८०३' ह्या वृत्तपत्रामध्ये आलेल्या बातमीची मूळ प्रत

खंडोजी यांना जनरल ऑर्डर मिळाल्यानंतर स्वतः बॉम्बे सरकारने त्यांना स्तंभाशेजारी घर देखील बांधून दिले, आजही ते घर त्याच जागेवर अस्तित्वात आहे. तेव्हापासून म्हणजेच दि. १३ डिसेंबर १८२४ पासून खंडोजी व त्यांचा वंशपरंपरागत परिवार तिथे वास्तव्यास असून जयस्तंभाचे संरक्षण, बंदोबस्त आणि देखभाल करीत आहे. तेथे असलेल्या जमिनीमध्ये शेती देखील केली जाते. ही जमीन तेव्हापासून याच कुटुंबाच्या ताबेवहिवाटीत आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुणे पुराभिलेखागार दफ्तरातील सन १८२९च्या रुमालांमध्ये खंडोजी माळवदकर यांचे नाव आढळून येते. मोडी लिपीतील काही थळझाडे अभ्यासल्यावर खंडोजी माळवदकर यांची

जमीन पेरणे गावामध्ये आहे हे निश्चित होते. इंग्रजांच्या सर्व पत्रव्यवहारामध्ये त्यांनी स्तंभाला प्रभारी म्हणून नेमल्या गेलेल्या व्यक्तीचा उल्लेख 'इन-चार्ज' म्हणूनच केला आहे. दि.२६ मार्च १८२६ रोजी खंडोजी माळवदकर यांना कायदेशीररीत्या स्तंभाशेजारील जमिनीचा हक्क मिळाला.

(मराठी अनुवाद, मूळ पत्र-वाचा परिशिष्ट ११)

दिनांक २६ मार्च १८२६ च्या कोर्ट डिस्पॅचचा सारांश,

कोरेगावच्या लढाई मधील दुसऱ्या रेजिमेंटच्या सैनिकांनी जो धाडसी बचाव केला, त्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ जे स्मारक बांधले आहे त्याची जबाबदारी (इन-चार्ज), लढाईत शौर्य गाजविलेल्या तद्देशीय हवालदार पदावरील सैनिकाला देण्यात आली आहे.यासाठी त्यांना 'जमादार' ही पदवी बहाल करत असून स्तंभाला लागून असलेली वार्षिक रुपये २०० महसुलाची जमीन देखील यांना देण्यात आली आहे आणि हे सर्व त्यांना पुरुष वंशज असे पर्यंत कायमस्वरूपी देण्यात आले आहे परंतु पुरुष वंशज खंडित झाल्यावर सरकारने तिथे नवीन इन-चार्ज नेमावा.

यानंतर दि. १३ जानेवारी १८४१ रोजी इंग्रजांमध्ये काही पत्रव्यवहार झाले. त्यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहारात ॲक्टींग कलेक्टर हे रेवेन्यू कमिशनरला पत्रात लिहितात की (मराठी अनुवाद), ''मला हे सांगण्यास आनंद होत आहे की, जमादार यांनी मला खात्री दिली आहे की या स्मारकावर कोणत्याही प्रकारचा उत्सव आज पर्यंत साजरा केला गेला नाही आणि अशा कोणत्याही कार्याला इथे परवानगी दिली जाणार नाही. पण याचे उल्लंघन झाल्यास जमादार आणि जिल्हाधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल याची त्यांना कल्पना आहे '' या पत्रातून स्पष्ट कळून येते कि, इंग्रजांनी या स्तंभाच्या परिसरात कुठल्याही जाती-धर्माच्या अनुषंगाने उत्सव किंवा धार्मिक क्रिया करू नये असे स्पष्ट आदेश दिले होते.दि. ७ डिसेंबर १८४१ रोजी खंडोजी माळवदकर यांना इनाम म्हणून अधिक जमीन देण्यात आली. याची सनद देखील प्राप्त झालेली आहे.

(मराठी अनुवाद, मूळ सनद -वाचा परिशिष्ट १२)

*प्रति , खंडोजीबीन गजोजी जमादार माळवदकर ******* पाबळ परगणे मजकूर वतन पाटीलकीचे मौजे जेजुरी तर्फ कडेपठार परगणे पुरंदर.*

*तुम्हास कळवण्यात येते की पाबळ परगण्यांमध्ये भीमेच्या दक्षिण किनाऱ्यावर मौजे कोरेगावच्या बाजूस मौजे पेरणे तरफ सांडस परगणे भीमथडी येथे तारीख १ माहे जानेवारी सन १८१८ इसवी रोजी इंग्रजी सरकारचे एक लहान टोळीने बाजीरावसाहेब पेशवे यांचे संपूर्ण सैन्यापासून बाजीरावसाहेब यांनी समक्ष उभे राहून लढाई चालवली असता त्यासी लढाई मारून आपले संरक्षण केले याची स्मृती रहाण्याकरिता इंग्रजी सरकारने तेथे एक जयस्तंभ रोविला आहे व तुम्ही पहिले इन्व्हालिड कंपनीचे हवालदार असून त्या लढाईत तुम्हास जखम लागली सबब लेफ्टनंट कर्नल स्टाँटन साहेब ** त्या लढाईत इंग्रजी सरकारचे फौजेचे सरदार होते त्याचे शीफारशी वरून नेक नामदार गव्हर्नर साहेब यांनी मेहेरबान होऊन तारीख दिनांक १३ माहे डिसेंबर सन १८२४ इसवी रोजचे जनरल ऑर्डरमध्ये सदरहू जयस्तंभाचा बंदोबस्त राखण्याकरिता तुम्हास नेमीले आहे व तुम्हास जमादारीचा मुद्दा देऊन तुम्हास व पश्चात ज्याच्याकडे सरकार सदरहू बंदोबस्त सोपवून देईल त्याचे गुजाऱ्याकरिता काही इनाम जमीन तोडून देण्यात आली आहे ती नवे प्रत बंदीप्रमाणे बतपशील रुपये*

४९ मौजे पिंपरी तर्फ सांडस येथील क्रमांक १२/१३७/१३९/१४० एकूण चार लायक जमीन ५२.२९ एकर आकार कंपनी रुपये

४२ मौजे वाडे व केसनंद व बकरी या तीन गावांमध्ये तकरारी क्रमांक १ केसनंद कागदी आहे तो १६५ लायक एकर ४७.३१ आकार कंपनी रुपये

७८ मोजे केसनंद डोंगरी कुरण क्रमांक १६२/१६३/१६४ एकूण तीन लायक जमीन एकर ५६.६ आकार कंपनी रुपये

*४५ मौजे वाडे बोलाइ येथील डोंगरी कुरण क्रमांक १९५/१९६/१९८ एकूण चार लायक जमीन एकर ६३.*१ आकार कंपनी रुपये*

एकूण २६० एकर १७ गुंठे जमीन व २१४ रुपये नवे आकार झाले आहे तरी तुम्ही व तुमचे पश्चात ज्याला सरकार सदरहू बंदोबस्त सोपून दिल त्याने सदरहू जमिनीचा उपभोग घेऊन त्या जयस्तंभाचा व त्या भोवती आवार आहे त्याचा व त्यातील वृक्षांचा चांगला बंदोबस्त ठेवावा आणि सदरहु जागेची खराब न होईल अशी तजवीज तुम्ही आपले सामर्थ्यनरूप राखावी व या जयस्तंभाजवळ धर्मा संबंधि काही एक क्रिया करू देऊ नये.

सदरहू जमीन तुमच्याकडे वंश परंपरेने चालेल परंतु तुमचा पुरुष वंश बुडाल्यास सदरहु जयस्तंभ संरक्षणाचे काम व जमीन कोणाकडे चालवायची त्याची तजवीज करण्यास सरकार मुकत्यार आहे.

सदरहू जमीन हुकुम झाला त्या दिवसापासून तुम्हास मिळाली नाही सबब तुम्हास जामदार खाण्यातून रोख पैसा पावला आहे व हल्ली सन १२५१ फसली म्हणजे सन १८४१/४२ इसवी सालापासून सदरहु जमीन तुम्हाकडे चालविण्यात येईल. तारीख ७ डिसेंबर सन १८४१''

एकूण २६० एकर १७ गुंठे जमिनीचा उल्लेख या सनदीमध्ये आढळतो. त्यांनी यात स्पष्ट लिहिले आहे की, ''सदरहु जागेची खराबी न होईल अशी तजवीज जमादारांनी त्यांच्या सामर्थ्याने राखावी व या जयस्तंभाजवळ धर्मासंबंधित कोणाला काही एक क्रिया करू देऊ नये.''

या प्रकरणाअंती लिहिताना, १ जानेवारी १८१८ रोजी कोरेगाव येथे झालेल्या लढाईचा आणि मौजे पेरणे येथे उभारलेल्या स्तंभाचा कुठल्याही जातीधर्माशी संबंध नाही असे वारंवार नमूद करावे लागेल. या स्तंभाचा वेळोवेळी अपप्रचार केला गेलेला 'विजयस्तंभ, शौर्यस्तंभ, प्रेरणास्तंभ, रणस्तंभ, विजयरणस्तंभ' इत्यादी उल्लेख देखील इतिहासाला अनुसरून नाही. परकीयांनी येथील सत्ता हस्तगत करण्यासाठी केलेल्या एका छोट्या अनिर्णायक लढाईतील स्मृतीसाठी हा स्तंभ बांधला गेला. या स्तंभाला भेट देताना त्यामागील सत्य इतिहास ध्यानात ठेवणे गरजेचे आहे.

•••



जयस्तंभ

प्रकरण ४

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयस्तंभ भेट: इंग्रजांविरुद्ध बंडाचे निशाण

१ जानेवारी १८१८ कोरेगाव भीमा लढाई ही तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धातील अनेक लढायांच्या मालिकेतील एक लढाई होती. या लढाईत इंग्रज आणि पेशवे दोघांच्या सैन्यात विविध जाती धर्माचे सैनिक होते. उपलब्ध ऐतिहासिक संदर्भ पाहिल्यास ही जातीअंताची लढाई नव्हती आणि या लढाईला कोणत्याही एका जातीशी किंवा धर्माशी जोडता येत नाही हे समजते. तरीही पेशवे काळात महारांवर होणाऱ्या जातीभेदामुळे महार सैनिक इंग्रजांच्या बाजूने लढले आणि ही जातीअंताची लढाई होती असा असत्य इतिहास काही जणांकडून जाणीवपूर्वक पसरविला गेला आहे. वास्तवात १८१८ च्या पूर्वी झालेल्या अनेक लढायांमध्येही इंग्रजांच्या सैन्यात महार सैनिक होते.

चांगदेव भगवान खैरमोडे लिखित डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड ९ मधील संदर्भ पुढीलप्रमाणे, ''महारांच्या अनेक लढवय्यांनी लढायांत मर्दुमकी गाजवून कंपनीच्या लष्करांत अंमलदाराच्या जागा मिळविलेल्या होत्या. १७८७ साली मुंबईच्या पश्चिम समुद्र किनाऱ्यावर जी लढाई झाली तीत मरीन बटालियन मधील हवालदार मदनाक येसनाक याने मर्दुमकी गाजवली. म्हणून त्याला जमादार करण्यात आले. त्या लढाईत सुबनाक वाहनाक याने शौर्याची शर्थ केली. म्हणून त्याला चांदीचा बिल्ला आणि साखळी बक्षीस देण्यांत आली, आणि त्याला हवालदार करण्यात आले. १८१० मध्ये इंग्रज व फ्रेंच यांच्या आरमारांची जी लढाई हिंदी महासागरात झाली तीत मरिन बटालियन मधील धोंडनाक पुलनाक याने मोठे शौर्य दाखवले. म्हणून त्याला रुप्याचे पदक बक्षीस दिले आणि त्याला लेफ्टनंट हवालदार म्हणून बढती देण्यात आली.''

१८१८च्या नंतरही अनेक लढायांमध्ये इंग्रजांच्या सैन्यात महार सैनिक असल्याचे दिसून येते. खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वडील सुभेदार रामजी देखील इंग्रज सैन्यात होते. महारच नव्हे तर अन्य विविध जाती धर्माचे भारतीय लोक इंग्रजांच्या सैन्यात नोकरी करायचे. परंतु जातीवादामुळे इंग्रजांनी तत्कालीन अस्पृश्यांना सैन्यात प्रवेश बंदी केली. यामुळे ज्या अनेकांच्या नोकऱ्या गेल्या त्यात मोठ्या प्रमाणात महार सैनिक होते. इंग्रजांनी साम्राज्य बळकट करण्यासाठी आपला उपयोग करून घेऊन शेवटी वाऱ्यावर सोडले अशी भावना त्या सैनिक व अधिकाऱ्यांची झाली.

अस्पृश्यांच्या लष्कर भरतीवर निर्बंध घातलेल्या या सरकारी अन्यायाच्या विरोधात विनंती अर्ज करण्याची चळवळ लष्करातून कमी केलेल्या लोकांनी व पेन्शनरांनी हाती घेतली. यामध्ये प्रमुख सूत्रधार श्री. गोपाळबाबा वलंगकर हे होते. त्यांनी १८९४ च्या जुलै मध्ये मुंबईच्या गव्हर्नरला यासंदर्भात 'अनार्य दोष परिहारक मंडळ' दापोली, या संस्थेतर्फे विनंती अर्ज पाठविला होता. अस्पृश्य लोकांनी कंपनी सरकारचे राज्य हिंदुस्थानात स्थापन करण्यासाठी किती त्रास काढले व स्वार्थत्याग केला याची माहिती देऊन असे सुचविले की, सरकार स्पृश्य वर्गीयांच्या सल्ल्याला बळी पडले, हे त्यास कमीपणाचे होय. सरकारने, अस्पृश्यांची अतुल सेवा लक्षांत घेऊन त्यांना लष्करात पुन्हा नोकरीस ठेवावे ! पण या विनंती अर्जाला सरकारने किंमत दिली नाही.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयस्तंभ भेट (१ जानेवारी १९२७)

इंग्रजांच्या या जातीवादी धोरणाविरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १ जानेवारी १९२७ ला कोरेगाव जयस्तंभ इथे सभा घेतली. त्याबाबतीत धनंजय कीर यांच्या पुस्तकातील संदर्भ पुढीलप्रमाणे, (प्रकरण ५ - बंडाचे निशाण उभारले) ''सन १९२७ साल उजाडले. आंबेडकरांनी त्या वर्षातील कार्याचा आरंभ कोरेगाव युद्ध स्मारकासमोर भरलेल्या सभेने केला. त्या सभेस अस्पृश्य समाजातले काही नामवंत पुढारी उपस्थित होते. त्या सभेत भाषण करताना आंबेडकरांनी कृतघ्न ब्रिटिश सरकारचा जळजळीत शब्दात निषेध केला. ज्या महार जातीच्या शेकडो सैनिकांनी अनेक लढायांत सरकारला यश मिळवून दिले,त्या महार जातीच्या तरुणांना सैन्यात प्रवेश नाकारून सरकारने त्यांचा (महार जातीचा) विश्वासघात केला आहे असे त्यांनी आपले मत उघडपणे बोलून दाखविले. ब्रिटीशांच्या बाजूने महार सैनिकांनी लढावे ही काही विशेष अभिमानाची गोष्ट आहे असे नाही हे खरे; पण ते ब्रिटिशांच्या मदतीस गेले का? स्पृश्य हिंदू नेत्यांनी नीच मानून कुत्र्यामांजरापेक्षा वाईट वागविले म्हणून! पोट भरण्याचे काही साधन नसल्यामुळे नाईलाजाने ते ब्रिटिशांच्या फौजेत भरती झाले हे लक्षात ठेवले पाहिजे, असेही ते म्हणाले. आपल्या भाषणाच्या शेवटी ते म्हणाले की, महारांवरील लष्कर-प्रवेश-बंदी ब्रिटिश सरकारने उठवावी. जर सरकारने ती गोष्ट केली नाही तर सरकारविरुद्ध चळवळ करावी, अशी त्यांनी आवेशाने त्या समाजास चेतना दिली.''

डॉ. आंबेडकरांच्या या कोरेगाव भीमा येथील भेटीनंतर अंदाजे ३ महिन्यांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला. याठिकाणी भाषण करताना डॉ आंबेडकरांनी जे उद्बोधन केले त्यातील संदर्भ पुढीलप्रमाणे (पुस्तक - धनंजय कीर लिखित डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, प्रकरण ५ - बंडाचे निशाण उभारले) ''नेपोलियनने ज्या इंग्लंड देशाला 'दे माय धरणी ठाय' असे केले, त्या देशाने मराठेशाहीचे उच्चाटन केले ह्याचे कारण मराठ्यांतील जातीभेदाची तेढ व आपसातील दुही हे नसून ब्रिटिशांनी एतद्देशीयांचे सैन्य उभारले हे होय. पण ते सैन्य असे अस्पृश्य जातीचे. अस्पृश्यांचे बळ जर इंग्रजांच्या पाठीशी नसते तर हा देश त्यांना केव्हाच काबीज करता आला नसता.''

पुढे अस्पृश्यांच्या लष्करी भरतीच्या मागणी संदर्भात ८ जून १९२८ रोजी दामोदर हॉल, परळ, मुंबई येथे मिलिटरी पेन्शनर्सच्या सभेत अध्यक्ष म्हणून बोलताना

डॉ. आंबेडकरांनी इंग्रज सरकारच्या कृतघ्नपणाचा इतिहास सांगून सरकारच्या धोरणांवर कडक टीका केली. डॉ. आंबेडकर हिंदी गोलमेज परिषदेसाठी १९३० साली गेले तेव्हापासून त्यांनी अस्पृश्यांच्या लष्कर भरती संबंधीच्या धोरणांत बदल कसा घडवून आणता येईल याबद्दल लंडनमधील अनेक रिटायर्ड मिलिटरी ऑफिसर्स व विद्यमान ऑफिसर्स यांच्याशी विचार विनिमय केला.

१ जानेवारी १९३१ला भरलेल्या अल्पसंख्यांक जमातीच्या सबकमिटीच्या तिसऱ्या बैठकीत डॉ आंबेडकरांनी हा प्रश्न उपस्थित केला आणि भाषण केले. ''अस्पृश्यांच्या लष्करी पेशावर १८९२ सालापासून जी कुऱ्हाड उगारलेली आहे. त्यामुळे अस्पृश्यांवर सरकारने फार मोठा अन्याय केला आहे. आणि हा अन्याय दूर झाला पाहिजे,'' असा त्यांच्या भाषणाचा सारांश होता. (खंड ९)

अस्पृश्यांच्या लष्करी प्रवेशासाठी शिवराम जानबा कांबळे यांनी आर्मी इंडियनायझेशन, डिफेन्स डिपार्टमेंट, सिमला येथे पाठविलेल्या अर्जास १८ सप्टेंबर, १९३९ रोजी उत्तर आले की, ''हिंदूमधील प्रमुख जातीची अस्पृश्यता, प्रमुख जातीचे लोक, लष्करातही मानतात (पाळतात) व त्यांच्या भावना लष्करी अधिकारी लक्षात घेतात म्हणून सरकार लष्करात अस्पृश्यांना घेत नाही. ज्या पलटणीतील अधिकारी अस्पृश्यांच्या भरतीला विरोध करीत नाहीत त्या पलटणीच्या अधिकाऱ्याच्या मर्जीवर अस्पृश्यांची लष्कर भरती अवलंबून आहे, असे सरकारी धोरण असल्यामुळे अस्पृश्यांच्या लष्कर भरतीबाबत खास सोयी करणे शक्य नाही.''

१९०२ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील रामजी मालोजी सकपाळ यांनी इंग्रज सरकारकडे महार बांधवांच्या सैन्यभरतीसाठी अर्ज केला होता. हा अर्ज तयार करण्यासाठी त्यांना महादेव गोविंद रानडे यांनी सहकार्य केले होते.

तेव्हा डॉ. आंबेडकरांची जयस्तंभ भेट ही त्यांनी आणि अन्य लोकांनी अस्पृश्यांच्या लष्कर भरतीसाठी जी इंग्रज विरोधी चळवळ चालविली होती त्याचा एक भाग होती. सत्ता हस्तगत करण्यासाठी झालेल्या अनेक लढायांमध्ये महार सैनिक इंग्रजांच्या बाजूने प्राणपणाने लढले होते. मात्र राजकीय सत्ता प्राप्त होताच इंग्रजांनी जातीवादी तत्त्वाला अनुसरून महार समाजाला सैन्यबंदी करत लष्करात प्रवेश नाकारला. इंग्रज सरकारला या अन्यायकारक धोरणाची जाणीव व्हावी म्हणून कोरेगावच्या लढाईत इंग्रजांसाठीच लढलेल्या महार सैनिकांच्या

शौर्याची आठवण करून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी जयस्तंभाची जागा निवडली होती. तसेच स्पृश्य हिंदूंनी त्यांना दिलेल्या वागणुकीमुळे, उत्पन्नाचे साधन उपलब्ध नसल्यामुळे महार बांधवांच्या शौर्याला अनुसरून इंग्रजांनी त्यांना सैन्यात नोकरी द्यावी अशी त्यांची मागणी होती.वर नमूद केलेले संदर्भ व डॉ. आंबेडकरांचा संपूर्ण कार्यकाल अभ्यासला असता पुढील बाबी स्पष्ट होतात-

- इंग्रजांनी महार जातीला सैन्यात भरती करून घेण्यास बंदी घातली. इंग्रजांना ह्या जातीवादाचा जाब विचारण्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १ जानेवारी १९२७ची सभा बोलावली.
- ''ब्रिटीशांच्या बाजूने महार सैनिकांनी लढावे ही काही विशेष अभिमानाची गोष्ट आहे असे नाही'' हे मत त्यांनी स्पष्ट व्यक्त केले. ''पोट भरण्याचे काही साधन नसल्यामुळे नाईलाजाने ते ब्रिटीशांच्या फौजेत भरती झाले हे लक्षात ठेवले पाहिजे'' अशी हळहळ बाबासाहेबांनी व्यक्त केली. याचा अर्थ कुठल्याही सूडभावनेने वा जुन्या प्रथेवर चिडून नाही तर महार जातीस हक्काचा व्यवसाय नसल्यामुळे रोजगारासाठी ते इंग्रजांच्या सैन्यात नाईलाजाने भरती झाले होते. ही लढाई जातीअंताची नसून महार बांधवांनी पोटापाण्यासाठी पत्करलेली नोकरी होती.
- ''ब्रिटिश सरकारने महार समाजावरील लष्कर-प्रवेश-बंदी उठवली नाही तर सरकारविरुद्ध चळवळ करावी'' अशी चेतना डॉ. आंबेडकरांनी समाजास दिली. परंतु १ जानेवारी १८१८चा उल्लेख बाबासाहेबांनी कुठेही 'शौर्य दिन' असा केला नाही. दरवर्षी शौर्य दिन साजरा करण्याबद्दल देखील आपल्या अनुयायांस त्यांनी सांगितले नाही. तसेच या प्रसंगी सिदनाक महार यांच्या नेतृत्वात ५०० महार सैनिकांनी २८,००० पेशवे सैनिकांचा जातीअंतासाठी पराभव केला असे देखील आंबेडकरांनी म्हटलेले नाही.

या पार्श्वभूमीवर गेल्या काही वर्षांत, दरवर्षी ५०० महार सैनिकांनी २८,००० ब्राह्मण पेशवे सैनिकांचा जातीअंतासाठी पराभव केला अशी दिशाभूल करत दर १ जानेवारी हा शौर्यदिवस साजरा करण्याची प्रथा कोणी व का रूढ केली हा खरा प्रश्न आहे. विशेष म्हणजे १९२७ नंतर महानिर्वाण दिनापर्यंत, २९ वर्षात डॉ. आंबेडकर स्वतः पुन्हा कधीही कोरेगाव जयस्तंभास गेल्याचे आढळून येत नाही. अस्पृश्यांच्या

लष्कर भरतीसाठी जी ऐतिहासिक इंग्रज विरोधी चळवळ झाली त्यातील एक घटना म्हणून डॉ. आंबेडकरांच्या जयस्तंभ भेटीचे स्मरण करणे उचित ठरेल. परंतु अपप्रचार तंत्राने कोरेगावच्या लढाईला जातीय रंग देऊन निव्वळ काल्पनिक कथा सांगून समाजात तेढ निर्माण केली जात आहे.

कोरेगावच्या लढाईचा विशिष्ट जातीशी संबंध जोडताना इंग्रजांचे मध्य भागाचे कमिशनर मि. एल. जे. माऊंटफोर्ड यांच्या भाषणाचा संदर्भ दिला जातो. ५ नोव्हेंबर १९२५ रोजी अस्पृश्यांच्या उन्नतीबद्दलच्या ठरावावर मुंबई कायदे कौन्सिलात भाषण करताना माऊंटफोर्ड म्हणाले, ''....कोरेगावला जो जयस्तंभ उभारलेला आहे तो महारांनी गाजविलेल्या पराक्रमाचे जयचिन्ह होय. पौर्वात्य देशांत जे पराक्रमाचे प्रकार आतापर्यंत समजले जातात त्यात कोरेगावचा महापराक्रम सर्वश्रेष्ठ होय. खडकीची लढाई संपल्यानंतर कॅप्टन स्टाँटन हा कर्नल बर्र याला पुण्याजवळ ससैन्य मिळण्यासाठी शिरुरहून निघाला व तो कोरेगावला थांबला. त्यांचे पायदळ ८०० शिपायांचे होते. त्यात थोडे अरब होते. बाकीचे सर्व महार होते. अरब तोफखान्यावर होते. दुसरा बाजीराव याच्या नेतृत्वाखाली पेशव्यांचे सैन्य त्या बाजुला होते. त्याची व स्टाँटनच्या पायदळाची गाठ पडली. पेशव्यांचे सैन्य २५,००० होते. महार सैनिकांनी पेशव्यांच्या २५,००० लोकांना एक दिवस व एक रात्र जागच्या जागी थोपवून धरले. त्यांना पुढे सरकू दिले नाही. शेवटी महार सैनिकांनी पेशव्यांच्या २५,००० सैनिकांचा धुव्वा उडवून दिला. महार हा कोणत्या दर्जाचा लढवय्या आहे याचा हा एक ऐतिहासिक पुरावा आहे. या लढवय्येपणाबद्दल मुंबई सरकारला व हिंदुस्थान सरकारला महारांबद्दल अभिमान वाटतो. साम्राज्य सरकारच्या सैन्याची वाढ करण्याची वेळ येईल व गरज भासेल तेव्हा सरकार महारांची सैन्यभरती जरूर करेल.''

माऊंटफोर्ड यांचे भाषण समकालीन नसून १८१८च्या लढाई नंतर १०७ वर्षांनी केलेले आहे. माऊंटफोर्ड यांनीही भाषणात महार सैनिक पेशवेकाळात होणाऱ्या जातिभेदांमुळे इंग्रजांच्या बाजुने जातीअंतासाठी लढले असे म्हटले नाही. जयस्तंभावर इंग्रजांनी जी नावे कोरलेली आहेत ती वाचली तरी कोरेगावच्या लढाईत विविध जातीधर्माचे सैनिक लढले हे समजते. तसेच इंग्रजांनी ज्यांना स्तंभाचे 'इन-चार्ज' नेमले ते खंडोजीबीन गजोजी माळवदकर मराठा समाजाचे आहेत. तेव्हा हा स्तंभ

काही विशिष्ट जातीच्या सैनिकांच्या पराक्रमाचे चिन्ह नव्हे. कोरेगावच्या लढाईत इंग्रज आणि पेशवे दोन्ही बाजूचे किती लोक मारले गेले आणि दोन्ही सैन्यांचे कसे नुकसान झाले याचे समकालीन संदर्भ उपलब्ध आहेत. त्यानुसार ही लढाई निर्णायक नव्हती हे समजते.

माऊंटफोर्ड 'अस्पृश्यांच्या उन्नतीबद्दलच्या ठरावावर' भाषण करत होते त्यावेळी इंग्रजांनी अस्पृश्यांना सैन्य बंदी केल्याने असंतोष निर्माण होऊन महारांना लष्कर प्रवेश देण्यात यावा ही मागणी जोर धरत होती. आणि म्हणून त्यांनी कोरेगावच्या लढाईत महार सैनिकांच्या पराक्रमाचे वर्णन करताना याच लढाईतील इंग्रजांकडील अन्य जाती धर्माच्या सैनिकांचा उल्लेख केला नाही हे समजून घेता येते. तसेच आपल्या भाषणात त्यांनी मुंबई व हिंदूस्थान सरकारला महारांबद्दल अभिमान वाटतो व साम्राज्य सरकारच्या सैन्याची वाढ करण्याची वेळ येईल अथवा गरज भासेल तेव्हा सरकार, महारांची सैन्यभरती जरूर करेल, असेही नमूद केले. परंतु वास्तवात महारांची सैन्यभरती तत्काळ झाली नाही.

१८५७च्या उठावानंतर इंग्रजांनी 'Martial Race Theory' नुसार जाणीवपूर्वक भारतीय समाजातील जातींची 'लढाऊ आणि इतर' अश्या गटात विभागणी केली. या सिद्धांताद्वारे विशिष्ठ जातींना सैन्यबंदी केली तर काही जातींना सैन्यभरतीसाठी निवडले गेले. वरकरणी जरी यामागे सैन्यात निवड करण्यासाठीची प्रक्रिया सोपी व्हावी असा हेतू दिसत असला तरीही १८५७च्या उठावात ज्या जातींनी भाग घेतला होता त्यांना सैन्यापासून दूर ठेवता यावे हा अंतस्थ हेतू होता. त्याचप्रमाणे समाजातील जातीजातीत फूट पडून इंग्रज विरोधी उठावाची शक्ती आधीच कमकुवत करावी जेणेकरून १८५७ सारखा उठाव पुन्हा घडून येणार नाही हा देखील त्यामागचा कुटील हेतू होता. तेंव्हा इंग्रजांनी विविध मार्गांनी त्यांच्या सोयीनुसार येथील समाजात जातीवाद वाढीस लागेल यानुसार धोरणे बदलली आहेत. सैन्य भरती करताना देखील तत्कालीन गरज आणि जातीवाद याला अनुसरूनच धोरण आखले गेले. याच धोरणाला अनुसरून इंग्रजांनी महार बांधवाना सैन्यबंदी केली होती आणि म्हणूनच इंग्रजांच्या अश्या विश्वासघातकी वृत्तीच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी व्यापक चळवळ उभी केली होती. १ जानेवारी १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी जयस्तंभ परिसरात घेतलेली सभा हि याच चळवळीतील एक घटना होय.

महार रेजिमेंट

१८१८च्या कोरेगाव भीमा लढाईच्या निमित्ताने 'महार रेजिमेंट'बद्दल देखील सत्याचा विपर्यास करून अपप्रचार केला जातो. १८१८ कोरेगाव भीमा लढाईमध्ये इंग्रजांतर्फे ३ युनिट्स लढल्या..

१. 'सेकंड बटालियन फर्स्ट बॉम्बे नेटिव्ह इन्फन्ट्री' जी आज भारतीय लष्करामध्ये '२ ग्रेनेडिअर' नावाने कार्यरत आहे.

२. 'द पूना ऑक्सिलरी हॉर्स' जी आज भारतीय लष्करामध्ये 'द १७ पूना हॉर्स' या नावाने कार्यरत आहे.

३. 'मद्रास आर्टिलरी सपोर्टिव्ह' जी एक सहाय्यक तुकडी होती.

यामध्ये कुठेही महार रेजिमेंटचा उल्लेख समकालीन संदर्भांमध्ये मिळत नाही. अर्थातच त्यावेळेस अशी महार रेजिमेंट अस्तित्वात नव्हती. १ जानेवारी १९२७ कोरेगाव भीमा जयस्तंभ येथे झालेल्या कार्यक्रमात डॉ.आंबेडकर यांनी, इंग्रजांच्या जातीवादावर हल्ला चढवून महार बांधवांना सैन्यामध्ये भरती करून घेण्यासाठी सरकारला खडे बोल सुनावले होते. तोपर्यंत इंग्रज सरकारने महार बांधवांना सैन्यबंदीचे सूत्र कायम ठेवले होते हे निश्चित आहे.

पहिल्या महायुद्धात (१९१४-१८) इंग्रजांनी महार लोक कामगार म्हणून पलटणीत घेतले. १९१७ मध्ये १११ महार बटालियन उभारली. महार बटालियनने वझिरीस्तानच्या लढाईत शौर्याची कमाल केली. मात्र १९२२ मध्ये इंग्रजांनी १११ महार बटालियनचे विसर्जन केले. गणपत रोकडे, शिवराम कांबळे, रावबहादूर नाईक, लिंगय्या नायडू, पापन्ना यदये आदी मंडळींनी महार बटालियनचे विसर्जन करू नये म्हणून प्रयत्न केले, मात्र त्यास यश आले नाही.

१९४१ साली तत्कालीन संरक्षण समितीचे सदस्य असताना डॉ. आंबेडकरांच्या अथक प्रयत्नांनी 'महार रेजिमेंट'ची स्थापना झाली. महार रेजिमेंट आणि कोरेगाव भीमा लढाईचा काहीही प्रत्यक्ष संबंध नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महार सैन्यबंदी विरोधात केल्या गेलेल्या या चळवळीला स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी सुद्धा पाठिंबा दिला होता. या अनुषंगाने धनंजय कीर यांच्या पुस्तकातील संदर्भ पुढीलप्रमाणे: ''महारांनी ईस्ट इंडिया कंपनीची फार मोठी सेवा केलेली आहे. त्यांना पुढील काळात सैन्यात प्रवेश

नाकारण्यात आला. परंतु पहिल्या महायुद्धाच्या वेळी त्या लोकांची पलटण सरकारने उभारली होती. युद्ध आटोपताच सरकारने त्यांना नोकरीतून आर्थिक कारणे दाखवून कमी केले. ही सर्व हकीकत त्यांनी राज्यपालांना निवेदन केली. आणि महारांची एक पलटण दुसऱ्या जागतिक महायुद्धात प्रत्यक्ष भाग घेण्यासाठी उभारावी अशी राज्यपालांना त्यांनी कळकळीची विनंती केली. त्याप्रमाणे सरकारने महारांची एक पलटण उभारण्याचे निश्चित केले. महारांनी आपल्या देशाच्या संरक्षणासाठी आणि आपल्या स्वतःच्या कल्याणासाठी या संधीचा फायदा घेऊन सैन्यात जावे असे आंबेडकरांनी आवाहन केले. थोड्याच दिवसांत महार पलटण उभारण्यात आली. महार जातीतील पुष्कळ तरुणांनी त्यात प्रवेश मिळविला. त्यांच्यापैकी काहींची सैन्यभरती करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या जागी नेमणूक करण्यात आली. त्यात आंबेडकरांचे एक निष्ठावंत सहकारी ग. म. जाधव तथा मडकेबुवा हे होते. ते एक कुशल संघटक होते. महारांच्या सैनिकीकरणाच्या बाबतीत आंबेडकरांनी जे प्रयत्न चालविले होते त्यांविषयी वीर सावरकर ह्यांनी आपले असे मत व्यक्त केले की, आंबडेकरांच्या योग्य मार्गदर्शनाखाली महारबंधूंच्या लष्करी गुणांना पुन्हा उजाळा मिळून त्यांच्यातील लढाऊ शक्तीचा उपयोग सांघिक शक्ती वाढवण्यात होईल, असा मला भरवसा आहे. हिंदूस्थान हे एक लढाऊ राष्ट्र व्हावे यासाठी स्वतः सावरकर धडपडत होते.

स्वातंत्र्यानंतर महार रेजिमेंट भारतीय सैन्याचा भाग झाली. महार रेजिमेंटमधील सैनिकांना वेळोवेळी अनेक शौर्यपदकांनी भूषविले गेले आहे ज्यात परमवीर चक्राचा देखील समावेश आहे. स्थापनेपासून ४० वर्ष पूर्ण झाल्यावर १९८१ साली या रेजिमेंटच्या सन्मानार्थ पोस्ट तिकीट देखील रुजू केले गेले. सुरुवातीच्या काळात या रेजिमेंटमध्ये अनेक महार बांधवांनी नाव भरती केले. रेजिमेंटच्या चिन्हात, कोरेगावच्या लढाईचा जयस्तंभ होता परंतु नंतरच्या काळात रेजिमेंटच्या चिन्हामधून हा स्तंभ काढून टाकण्यात आला आणि चिन्ह बदलले गेले. ही रेजिमेंट सध्या अस्तित्वात असून यात सर्व संमिश्र जाती बांधवांचा अंतर्भाव आहे. या सर्वांनी देशाच्या रक्षणासाठी केलेली कामगिरी अभिमानास्पद आहे.

•••

प्रकरण ५

अपप्रचार आणि वास्तव – काही मुद्दे

आपले वर्तमानातील सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय जीवन गेल्या शेकडो वर्षांच्या इतिहासाचा परिणाम आहे. काही शे वर्षांच्या संघर्षमय स्मृतींचा वारसा आज आपण जगत आहोत. त्यामुळे त्या ज्वलंत इतिहासाची आपल्या अस्तित्वाशी जोडलेली नाळ कायम शाश्वत राहणार. परंतु गेल्या काही काळात राजकीय स्वार्थासाठी त्याच इतिहासाची मोड तोड केली जात आहे हा विरोधाभास सर्वांनी लक्षात घ्यायला हवा. त्यामागील फुटीरतावादी धोरण ओळखायला हवे.

भारतीय समाजात प्रदीर्घ काळापासून जातीभेद अस्तित्वात आहे ही बाब खेदजनक आहे. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाज बांधवांना याची झळ लागली हे विदारक सत्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवाने जातीभेदाविरूद्ध आजीवन लढा दिला. स्वतंत्र भारतात घटनात्मक दृष्टीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता अबाधित राहील यासाठी कठोर परिश्रम घेऊन संविधान तयार केले आणि या लढ्यात बव्हंशी यश प्राप्त केले. तरीही समाजात जातीभेदाचे समूळ उच्चाटन झाले आहे असा दावा करता येणार नाही. जातीभेदामुळे समाजाचे, देशाचे मोठे नुकसान होत आले आहे. म्हणून कोणत्याही प्रकारचा जातीभेद पूणर्पणे नष्ट व्हावा यासाठी आपण प्रत्येकाने जागरूकपणे काम करायला हवे. इतिहासातील घटनांचे असत्य दाखले देऊन अस्तित्वात असलेल्या जातिभेदाला खतपाणी घालणाऱ्या घटकांनाही ओळखून वेळीच रोखण्याची गरज निर्माण झाली आहे.

कोरेगाव भीमा लढाईच्या संदर्भाने अशाच स्वरूपाचा असत्य इतिहास नियोजनपूर्वक पसरविला गेला आहे. १४४ वर्षांच्या शिवशाहीच्या मराठ्यांच्या एका अनिर्णायक लढाईचे उदात्तीकरण एकाएकी का केले जाते? त्यासंदर्भात असत्य आणि अपप्रचार पसरवून जातीय तेढ का निर्माण केली जाते? हे सर्व एका रात्रीत होऊ शकत नाही. यामागे कोणत्या अराजकीय शक्ती आहेत? याचा

अभ्यास करण्याची गरज आहे. ज्या महामानवाने जातिभेदाविरुद्ध आयुष्यभर लढा दिला, त्यांचे असत्य संदर्भ देऊन समाजात दरी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो हा विरोधाभास दुर्दैवी आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या रक्षणासाठी, त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी या असत्याचे सप्रमाण खंडन करणे गरजेचे आहे. याच हेतूने कोरेगावच्या लढाई विषयी संदर्भ पुराव्यांसहित घडलेल्या इतिहासाचे विवेचन करण्याचा प्रयत्न पुस्तिकेच्या माध्यमातून आपल्यासमोर मांडला आहे. पुस्तिकेची सांगता करताना यातील महत्त्वाचे पैलू, विविध प्रकारे केला जाणारा अपप्रचार आणि त्याचे खंडन यासंदर्भात सारांश रूपात काही पुढीलप्रमाणे-

- **कोरेगावची लढाई कोणत्याही जाती धर्माशी जोडता येत नाही -** १ जानेवारी १८१८ कोरेगाव भीमाच्या लढाईत इंग्रज फौजेत विविध जाती समुहांच्या सैनिकांसह महार समाजाचे सैनिक होते. या लढाईत जखमी वा मृत झालेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ इंग्रजांनी लष्करी स्मारक बांधले. त्यास इंग्रजीत 'Military Monument' आणि मराठीत 'जयस्तंभ' म्हटले आहे. खुद्द इंग्रजांनी या स्मारकाचे इन-चार्ज ज्यांना नेमले ते खंडोजीबीन गजोजी माळवदकर मराठा समाजाचे होते. स्तंभावर कोरलेली माहिती वाचून हे लक्षात येते की, ही लढाई महार सैनिक विरुद्ध ब्राह्मण किंवा कोणत्याही जातींमधील नव्हती. ही जातीअंताची लढाईही नव्हती. इंग्रज व पेशवे दोघांच्या सैन्यात विविध जाती (तथाकथित सवर्ण व दलित) व धर्माच्या सैनिकांचा समावेश होता. तसेच कुठल्याही जातीचे प्रतिनिधी इंग्रजांकडे जाऊन पेशवे/ब्राह्मण वर्णद्वेषी असल्याने त्याविरोधात जातीअंताच्या लढाईसाठी साथ देण्यासंदर्भात प्रस्ताव घेऊन गेल्याची इतिहासात नोंद नाही.
- **वीर सिदनाक महार कोरेगावच्या लढाईत नव्हते-** कोरेगावच्या लढाईत सिदनाक महार हे इंग्रजांच्या सैन्यात होते असे काही लोक सांगतात. मात्र हे खोटे आहे. सिदनाक महार हे मराठ्यांकडील शूर योद्धा होते. त्यांच्याविषयी 'भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश' यामध्ये पुढीलप्रमाणे माहिती आहे-
  ''सातारा जिल्ह्यांत तासगांव तालुक्यांत कळंबी म्हणून एक गांव आहे तेथचा हा वतनदार महार. औरंगजेबाचे हातून संभाजी मारला गेल्यावर पुढें जी महाराष्ट्रात बंडाळी माजली, ती पंचवीस तीस वर्षे जास्त कमी चालूच

होती. त्या वेळी शिदनाकानें महार लोकांचे एक पथक उभारुन धामधूम केली. पुढें त्याचा मराठे लोकांस पुष्कळ उपयोग झाला. शाहुराजा मोंगलांचे कैदेंतून सुटून ताराबाईपासून आपलें राज्य मिळविण्याकरितां आला, तेव्हा ते लहान मोठे सरदार त्यास मिळाले. त्यांत हा शिदनाकही मिळाला. शाहूस राज्यप्राप्ति झाल्यावर ज्यांनी त्यास मदत केली, त्या सर्वांस त्याने त्यांच्या योग्यतेप्रमाणे देणग्या दिल्या. त्या वेळी शिदनाक ह्यास कळंबी गांव इनाम दिला. तो अद्यापि त्याच्या वंशजाकडे चालत आहे.

ह्या शिदनाकाचा नातू त्याच्याच नांवाचा होता, तो खर्ड्याच्या लढाईत होता. खर्ड्याच्या मैदानावर जेव्हां मराठ्यांच्या फौजेचा तळ पडला तेव्हां सरदार आपापल्या लोकांसह मिसली (मानाचा हक्क) प्रमाणे उतरले. शिदनाकाच्या गोटाच्या आसपास दुसऱ्या ब्राह्मण व मराठा सरदारांचे गोट होते. पेशवाईत सोंवळ्या ओंवळ्याचा विचार बराच फाजील वाढत चालला होता, त्यामुळें कित्येकांनी सवाई माधवराव कचेरीच्या डेऱ्यांत बसले असतां, विनंती केली की, महाराचा गोट मध्येंच आहे तो बाजूस काढावा. पेशव्यांनी विनंती ऐकून आपल्या बाजूस बसलेल्या हिरोजी पाटणकर नांवाच्या वयोवृद्ध सरदाराकडे पाहिलें. तेव्हां तो मराठा सरदार बोलला की ही कांही जेवणाची पंगत नव्हे, म्हणून मध्येंच महाराचा गोट असल्यास हरकत नाहीं. ही तलवार धरणाऱ्या शूरांची पंगत आहे. येथे जातीचा विचार नाही. 'ज्याची तलवार खंबीर तो हंबीर' पाटणकराचें बोलणें ऐकून पेशव्यांनी मान डोलविली.

पुढे लढाईचे दिवशी सरदार लोक पेशव्यांस मुजरे करुन लढाईस चालले. तेव्हा शिदनाकही मुजऱ्यास आला. मुजरा करुन हात जोडून पेशव्यांस म्हणाला. ''महाराज! मी शिदनाक महार आहे. मी महार म्हणून कांही लोक माझा तिरस्कार करीत आहेत. आज आपल्या पायाचा दास कामगिरी कशी करितो ती पाहावी असें म्हणून निघून गेला. पुढे लढाई चालूं झाली. परशुरामभाऊवर पठाणांनी मोठी गर्दी करुन भाऊस घोड्यावरुन खाली आणिलें. त्या वेळीं मराठे व पठाण ह्यांची जी चकमक झाली तींत शिदनाकाने अप्रतिम शौर्य दाखविलें. त्याची पटवर्धन मंडळीने मोठी तारीफ केली. पेशवाई बुडाल्यावरही हा शिदनाक बरींच वर्षे होता. चिंतामणराव अप्पा

सांगलीकर दुखण्याने फार आजारी असतां, त्यांच्या भेटीस हा गेला होता. तेव्हां त्यांनी मोठ्या समारंभाने ह्याची मुलाखत घेतली. आणि आपल्या पदरच्या मंडळीस त्याची माहिती करुन दिली.''

या आणि अशा अन्य संदर्भांवरून असा निष्कर्ष निघतो की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून तमाम मराठेशाहीत महार बांधवांवर कुठल्याच प्रकारची सैन्य बंदी नव्हती तर उलटपक्षी मराठेशाहीत महार समाजाला लष्करात प्रवेश होता. त्याचप्रमाणे महार सैनिक इंग्रजांच्या सैन्यात होते तसेच ते पेशव्यांसाठी देखील लढले असे ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. पेशवे काळात लढाईमध्ये पराक्रम गाजवणाऱ्या व्यक्तीस 'उडत रुमाल' हा बहुमान दिला जात असे व कित्येक प्रसंगी हा बहुमान महार बांधवांनी पटकावल्याचे नमूद आहे. इंग्रज विरोधी लढाईत पेशव्यांच्या सैन्यात मांग, रामोशी, भिल्ल समाजाचे सैनिक होते अशी नोंद इंग्रजांनी केली आहे.

- **एल्गार परिषदेत खोटी व अनैतिहासिक मांडणी–** १ जानेवारी १८१८ च्या कोरेगाव भीमा लढाईला २०० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ३१ डिसेंबर २०१७ रोजी पुण्यात शनिवार वाडा येथे 'एल्गार परिषद' हा कार्यक्रम आयोजित केला होता. ३१ डिसेंबर पूर्वी या एल्गार परिषदेचे काही आयोजक जयस्तंभ परिसर पाहणीकरिता आले असता कॅप्टन बाळासाो आनंदराव जमादार माळवदकर (निवृत्त) यांना भेटले होते. कॅप्टन जमादार माळवदकर यांनी कोरेगाव भीमा लढाईत शौर्य गाजविणारे आणि पहिले जयस्तंभ इन–चार्ज जमादार खंडोजीबीन गजोजी माळवदकर यांची माहिती त्यांना दिली. मात्र एल्गार परिषदेनिमित्त 'भीमा कोरेगाव शौर्यदिन प्रेरणा अभियान'ने जे पत्रक व पुस्तिका प्रकाशित केली त्यात कुठेही खंडोजीबीन गजोजी माळवदकर यांचा उल्लेख सापडत नाही. उलटपक्षी कोरेगाव भीमा लढाईत ज्यांचा सहभागच नव्हता त्या सिदनाक महार यांचा उल्लेख मात्र ठळकपणे केला आहे. ''उडवा ठिकऱ्या राई राई रं, गाडून टाका पेशवाई रं,गर्जना सिदनाकाची, आली नव्याने पेशवाई रं...गरज तिला ठोक्याची...'' असे गीत एल्गार परिषदेत सादर केले गेले. या गीताचा मोठा प्रचार प्रसारही करण्यात आला. सिदनाक महार मराठ्यांचे शूर योद्धा होते. ते पेशव्यांच्या

विरोधात लढल्याचे कोणतेही पुरावे नाहीत. त्यामुळे पेशवाई गाडायची 'गर्जना सिदनाकची' हा प्रचार खोटा आहे. जी लढाई जातीअंतासाठी लढली गेली नाही त्या कोरेगाव भीमाच्या लढाईला २०० वर्ष पूर्ण होताना, जणू आजची सर्व व्यवस्था लोकशाही नसून 'नवी पेशवाई' आहे आणि या नव्या पेशवाईला ठोकले पाहिजे, गाडले पाहिजे असे आव्हान सिदनाकाचे नाव वापरून केले गेले. हा प्रकार संशयास्पद आहे. दरम्यान एल्गार परिषद संबंधित दाखल गुन्ह्यात काही लोकांना प्रतिबंधित नक्षलवादी चळवळीतील सक्रिय सदस्य या आरोपाखाली पोलिसांनी अटक केली आहे.

- **इंग्रजांचा जातीवाद–** महार सैनिक शूर होते आणि आहेत यात शंकाच नाही. त्याचप्रमाणे तत्कालीन समाजात जातिभेदही अस्तित्वात होता. परंतु त्याचा इंग्रज–मराठा युद्धाशी काही संबंध नाही. १८१८च्या पूर्वी आणि नंतरही अनेक लढ्यांमध्ये इंग्रजांच्या सैन्यात महार सैनिक होते, अन्य जाती धर्माचे सैनिक ही होते. ते सर्व इंग्रज सैन्यात नोकरीस होते. मात्र १८९२ नंतर महारांना, अस्पृश्यांना इंग्रजांनी लष्कर प्रवेश बंदी केली. इंग्रजांच्या या जातीवादी आणि विश्वासघातकी धोरणाविरोधात डॉ. आंबेडकर यांसह अनेकांनी चळवळ उभी केली. १ जानेवारी १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांची जयस्तंभ भेट याच ऐतिहासिक इंग्रज विरोधी चळवळीतील एक घटना आहे. कोरेगावची लढाई खरोखरच जातीअंताची असती तर १०९ वर्षांनी इंग्रज सत्तेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना इंग्रजांच्या जातीभेद विरोधात जयस्तंभाला सभा बोलवावी लागली नसती. व्यापारासाठी आलेले इंग्रज सत्ता काबीज करू पाहत होते. इथल्या जातीभेदात वा त्याच्या निर्मूलनात त्यांना स्वारस्य नव्हते. उलटपक्षी त्यांनीही जातीवादी भूमिका घेऊन काम केल्याचे दाखले इतिहासात आहेत. कोरेगावच्या लढाईत इंग्रजांकडील पूना ऑक्सिलरी हॉर्स पलटणचे २५० घोडदळ सहभागी होते. या पलटणीच्या नवनिर्मितीच्या वेळी इंग्रजांनी दिलेल्या जाहिरातीमध्ये 'Men of low caste not to be admitted', असे म्हटले होते. (संदर्भ ''पूना हॉर्सेस'' या पुस्तकात मिळतो.) अशाप्रकारे आपल्या सैन्याच्या एका तुकडीत ''खालच्या जातीचे सैनिकांना प्रवेश नाही'' त्याचप्रमाणे ''जयस्तंभ इन

–चार्ज नेमण्यासाठी परवारी(म्हणजेच महार) जातीचा प्रतिनिधी नको''
असे इंग्रज सांगतात तेव्हा त्यांचा जातीवाद उघड दिसून येतो.

- **जातीअंताची लढाई? –** जातीअंताची लढाई कोरेगाव भीमा येथे लढली गेली नाही तर महाड येथे चवदार तळ्याच्या सत्याग्रहातून लढली गेली. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य बांधवांना मंदिर प्रवेशासाठी ही लढाई रत्नागिरीतील पतित पावन मंदिर आणि नाशिकमध्ये काळाराम मंदिरामध्ये लढली गेली. त्याचप्रमाणे ती पंढरपूर आणि पुण्यातील पर्वती मंदिरासाठी देखील लढली गेली. सर्व जाती धर्माच्या बांधवांना शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून ही लढाई अनेक शाळांमधून लढली गेली, तर कुठे पिण्याच्या पाण्यावर सर्वांचा सामान हक्क आहे म्हणून विहिरींवर लढली गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणेच महात्मा ज्योतिबा फुले, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ गणेश आगरकर, छत्रपती शाहू महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, साने गुरुजी, पा. ना. राजभोज हे आणि असे अनेक या जातीअंताच्या लढाईतील शिलेदार आहेत.त्यामुळे कोरेगाव भीमा येथील लढाईला जातीअंताच्या लढाईचा असत्य मुलामा देऊन दिशाभूल करून घेण्या ऐवजी याची खरी लढाई कुठे लढली गेली हे जाणून घेऊन त्याविषयी आपण अभिमान बाळगायला हवा.
- **जयस्तंभावर भारतीय लष्कराने लावलेल्या शिलापटावरून जातीवाद–** स्वातंत्र्यानंतर पूना हॉर्स नामक इंग्रजी घोडदळ तुकडी भारतीय सैन्याचा भाग झाली. काही वर्षांपूर्वी भारतीय सैन्याच्या पूना हॉर्सच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी जयस्तंभावर आपल्या पलटणीतील १९६५ आणि १९७१ च्या युद्धात पराक्रमाबद्दल परमवीर चक्र आणि वीर चक्र प्राप्त हुतात्मा सैनिकांची नावे कोरलेला 'रोल ऑफ ऑनर' शिलापट लावला. हे वीर सैनिक त्याच भूतपूर्व पूना हॉर्स पलटणचे आहेत जिने १८१८च्या कोरेगावच्या लढाईत भाग घेतला होता. तरीही या वीर सैनिकांचा जातीवाचक उल्लेख करून हा शिलापट म्हणजे बहुजनांचा अपमान आहे म्हणत काही लोक, संघटना यांनी विनाकारण फुटीरतावादी विचार पेरत समाजात प्रक्षोभ निर्माण करण्याचा डाव आखला आहे.बामसेफ व भारत मुक्ती मोर्चा संबंधित प्रा. विलास खरात यांनी '१ जानेवारी १८१८ स्वातंत्र्याचे बंड' या पुस्तकात 'केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारने भीमा कोरेगावच्या

विजयस्तंभाचा केलेला अपमान!' या प्रकरणात ''अलीकडच्या काळात 'रोल ऑफ ऑनर' या नावाखाली १९६५ व १९७१च्या युद्धामध्ये शहीद झालेल्या सैनिकांची त्यातही उच्चजातीय ब्राह्मण जातीच्या सैनिकांची नावे त्या शिलापटावर कोरण्यात आलेली आहे,'' असे म्हटले आहे. याच पुस्तकात असे म्हटले आहे कि, ''...अशा उपद्व्यापी कृत्यामुळे महाराष्ट्रामध्ये ब्राह्मणांच्या विरोधात दंगली सुद्धा पेटू शकतात.भीमा कोरेगावच्या जयस्तंभाचे विकृतीकरण चालू असल्याने जनतेत असंतोष वाढत आहे याला पेशव्यांचे वर्तमान वारस जबाबदार आहेत. ५०० विरुद्ध २८००० ब्राह्मण असे जे युद्ध झाले ते युद्ध जगातील अद्वितीय युद्ध होय. त्या युद्धाला मिटविणे ब्राह्मणांना शक्य नाही पण मुळातच उलट्या काळजाचे असलेले ब्राह्मण त्या जयस्तंभाचे कशा पद्धतीने विकृतिकरण करतात याचा हा दाखला होय.'' पुस्तकात असेही म्हटले आहे कि, ''१ जानेवारी २०१८च्या आत या अशा विकृतीकरणाला पायबंद बसला नाही तर या पेशवाई बुडाल्याच्या २००व्या वर्षानिमित्त मोठा जनउद्रेक हा मोहन भागवत आणि देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात नक्कीच उफाळेल!'' गंभीर बाब म्हणजे १ जानेवारी २०१८ रोजी कोरेगाव भीमा परिसरात हिंसाचारही झाला.आपण लक्षात घेणे गरजेचे आहे कि १ जानेवारी १८१८ कोरेगावची लढाई काही स्वातंत्र्याचे बंड नव्हते.या लढाईत विविध जातीधर्माचे सैनिक होते. तसेच कोरेगाव जयस्तंभाचा कोणत्याही राजकीय पक्ष किंवा अन्य संघटनेशी काहीच संबंध नाही. तरीही 'रोल ऑफ ऑनर' शिलापटावरील हुतात्मा सैनिकांचा जातीवाचक उल्लेख करणे आणि त्या अनुषंगाने उद्रेक होईल अशी चिथावणी देणे चुकीचे आहे. जातीवादी मानसिकतेतून 'रोल ऑफ ऑनर' शिलापट काढून टाकण्याची मागणी काही संघटना करतात, त्यासाठी आंदोलन उपोषण करतात. त्यांनी कोरेगावच्या लढाईचा इतिहास समजून घेणे गरजेचे आहे. या शिलापटामुळे कोणाचाही अपमान होत नाही. १९६५ आणि १९७१ च्या युद्धात भारतासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सैनिकांकडून आपण प्रेरणा घ्यायला हवी. तरीदेखील याबद्दल आक्षेप असेलच तरीही जातीवाद करून उद्रेकाची भाषा करणे समाजाच्या हिताचे नाही. माहिती अधिकारात प्राप्त पोलिसांच्या अहवालानुसार तर १ जानेवारी

२०१८ रोजी स्तंभाशेजारील आमच्या कुटुंबाच्या घरावर हल्ला करण्याचे नियोजन असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने तेथे संरक्षण देण्यात आले होते. एप्रिल २०१८ मध्ये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना सादर केलेल्या या अहवालातील नोंद पुढीलप्रमाणे आहे:

''जयस्तंभास मानवंदना देण्याच्या या कार्यक्रमाचा सुरक्षा बंदोबस्त आखणी करताना या जयस्तंभाच्या देखभालीसाठी इंग्रजांनी परंपरागत नेमलेले श्री. माळवदकर व त्यांच्या कुटुंबियांच्या जयस्तंभ परिसरातील घरास दलित संघटनांचा असलेला विरोध व ते घर उध्वस्त करण्या संदर्भातील त्यांच्या निर्धाराची गोपनीय सूत्रांकडून मिळालेली माहिती आणि जयस्तंभावर नव्याने बसवण्यात आलेली सन १९६५ व १९७१ च्या युद्धातील हुतात्मा झालेल्या सैनिकांच्या नावांची वादग्रस्त पाटी काढून टाकली जाण्याची शक्यता दाट असल्याने श्री. माळवदकर यांच्या कुटुंबियांना व त्यांच्या घरास वर नमूद केल्याप्रमाणे पुरेसे संरक्षण दिलेले होते. तसेच मानवंदना देताना जयस्तंभाचे शेजारूनच जावे लागते असल्याने जयस्तंभासही पुरेसे व सशस्त्र संरक्षण दिलेले होते.''

- **जातीवादामुळे भारतीय सैन्याने जयस्तंभाला येणे बंद केले–** भारतीय सैन्याने लावलेल्या या शिलापटामुळे निर्माण झालेल्या वादावर 'द इंडियन एक्सप्रेस'ने 'Controversy over 'Roll of Honour' tile put up by Army on Bhima Koregaon 'Jaystambh' अशी २२ डिसेंबर २०१७ रोजी बातमी दिली. यामध्ये भारतीय लष्करी अधिकाऱ्याची प्रतिक्रिया आहे. त्यानुसार जयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी पूर्वीपासून भारतीय सैनिक आणि अधिकारी येत असत. पण एका लष्करी लढाईला जातीय रंग दिल्याने भारतीय सैन्याने जयस्तंभाला येणे बंद केले. (सदर बातमी वाचण्यासाठी क्यू आर कोड वर स्कॅन करा.). खुद्द प्रकाश आंबेडकर यांनीही आपल्या 'कोरेगावचा अपमान' लेखात म्हटले आहे की– ''...कोरेगावचा स्तंभ १ जानेवारी हा सर्व फुटीरवादी, विभक्तवादी, व्यक्तिवादी दलालांचा राजकीय परवाने



नूतनीकरण करण्याचा अड्डा झाला. त्याचे फलित असे की लष्कराने स्तंभाला मानवंदना देण्याच्या कार्यक्रमातूनच माघार घेतली. ही फुटीरवादी नेत्यांची, गटवादी नेत्यांच्या कामाची लष्कराला हुसकावून लावणे ही फलश्रुती आहे.''

- **छत्रपती संभाजी महाराजांची हत्या आणि कोरेगावच्या लढाईचा संबंध नाही –** कोरेगाव भीमा लढाईच्या अनुषंगाने ''संभाजी महाराजांच्या हत्येचा बदला...! १ जानेवारी १८१८ चलो.......भीमा कोरेगाव'' अशा स्वरूपाचा अपप्रचार देखील केला गेला. याच आशयाचे लेख, व्हिडिओही सोशल मीडियावर प्रसारित केले गेले. १६८९ साली कोरेगावच्या लढाईच्या आधी तब्ब्ल १२९ वर्षापूर्वी शेजारच्या वढू (बु) या गावी छत्रपती संभाजी महाराजांच्या दुर्दैवी मृत्युदंडानंतर, औरंगजेबाच्या आदेशानुसार त्यांच्या शरीराचे तुकडे करून सर्वत्र फेकले. त्या छिन्नविच्छिन्न देहाचा अंत्यविधी कोणी केला यासंदर्भात वादग्रस्त इतिहास पसरविल्याने दोन समूहांमध्ये तेढ निर्माण झाली आहे. यामध्ये कोण चूक कोण बरोबर शोधणे हा या पुस्तिकेचा हेतू नाही. परंतु हेतू पुरस्सर खोटा इतिहास सांगून काही लोक छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येचा ओढूनताणून कोरेगाव भीमा लढाईशी संबंध जोडत आहेत.त्यामुळेच १ जानेवारी १८१८ रोजी कोरेगांव भीमा येथे झालेली लढाई आणि छत्रपती संभाजी महाराजांची औरंगजेबाने केलेली हत्या या दोन घटनांचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही हे लिहिणे क्रमप्राप्त आहे.
- **कोरेगावच्या लढाईत 'जय भीम' घोषणा दिल्याचे पुरावे नाहीत–** 'टाईम्स ऑफ इंडिया' वृत्तपत्राने दिलेल्या 'Chronologically 'Jai Bhim' is older than 'Jai Hind': Experts' या एप्रिल १८, २०१६ रोजी दिलेल्या बातमीनुसार दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात, समाजशास्त्र विभागात प्राचार्य असलेले विवेक कुमार यांनी कोरेगाव भीमा लढाईमध्ये सर्वप्रथम 'जय भीम' घोषणा वापरली असे म्हटले आहे. खोटा इतिहास आणि खोटा प्रचार याची ही परिसीमाच म्हणायला हवी. हे सर्वश्रुत आहे कि 'जय भीम' घोषणा बाबासाहेबांच्या 'भीमराव' या नावावरून त्यांच्या गौरवार्थ दिली जाते. विशेषतः आंबेडकरी चळवळीत एकमेकांना अभिवादन करतानाही या प्रेरणादायी घोषणेचा उच्चार केला जातो. डॉ आंबेडकरांच्या



जन्माच्या अनेक वर्षांपूर्वी घडलेल्या कोरेगावच्या लढाईत ही घोषणा दिली गेली असा दावा कोणी प्राध्यापक करत असेल तर नियोजनपूर्वक एक अपप्रचार चळवळ चालवली जात असल्याची शंका उत्पन्न होते. (सदर बातमी वाचण्यासाठी शेजारी दिलेला क्यू आर कोड वर स्कॅन करा.)

१ जानेवारी १८१८च्या घटनेनंतर अवघ्या सहा महिन्यांत शिवशाही संपुष्टात आली. मराठेशाहीत दुही निर्माण करुन इंग्रजांनी आपले सार्वभौमत्व गिळंकृत केले. काही शे इंग्रजांनी लाखो भारतीयांना गुलाम बनवले. ते स्वातंत्र्य मिळवायला पुढची १५० वर्षं खर्ची गेली. कोरेगाव भीमाच्या लढाईला जातीय वळण देऊन आज समाजात फूट पाडली जात आहे. लढाईत वीरगती प्राप्त झालेल्या सैनिकांना जातीची लेबले चिटकवली गेली आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील जातीभेद नष्ट करण्यासाठी वेचले. त्यांचेच नाव घेऊन जातीवादाला खतपाणी मिळेल अशा पद्धतीने खोटा इतिहास सांगून सामाजिक सलोखा भंग करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

इतिहासातील महापुरुषांची आणि खुद्द इतिहासाची हेतू पुरस्सर जातीजातीत विभागणी केली जात आहे. आपल्यात फूट पाडून समाज दुबळा करण्याचे हे प्रयत्न आहेत. परंतु छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांची प्रेरणा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या संवैधानिक लोकशाही मार्गाच्या आधारे आपण, आपली एकी, बंधुत्व टिकवून ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा फुटीरतावादाची आग आपल्या घरादारापर्यंत येणार हे निश्चित. समाजात विविध मतप्रवाह असतात आणि लोकशाहीत हे अपेक्षितही असते. परंतु हे सर्व भिन्न विचारधारेचे मतप्रवाह एकत्र घेऊन आपण शांततेत जीवन व्यतीत करू शकतो यावर आपला विश्वास हवा. वास्तवाची कास धरून, कोणाचाही द्वेष न करता, आपण जागरूकपणे सुसंवाद साधला पाहिजे. या पुस्तिकेच्या निमित्ताने असत्याचा नाश होऊन बंधुत्वाचा, समतेचा जागर होवो.. हीच सदिच्छा !

जय हिंद !

•••

परिशिष्ट सूची

परिशिष्ट १

पुण्यातील वाढत्या मराठा सैन्याची संख्या बघून इंग्रजांनी 'पुना ऑक्सिलरी हॉर्सेस' या नवीन पलटणीची बांधणी सुरू केली. इंग्रजांकडून केल्या गेलेल्या जाहिरातीमध्ये खालील बाबींचा उल्लेख होता.

''Each Risaldar to have Nishanburdar (standard beard), a Nagaraburdar (Kettle drummer) and a Karkun(orderly) at the expenses of the Government: Each Jamadar a Karkun.''

''Men of respectivity and family will be permitted, for the present, to recruit for promotion of following terms - Risaldar to rise 500 horses , a Jamadar 100 and Dafftardar 40.''

''**Men to be Sunnis, Shaikh's, Moguls, Pathans, Scindias, Beloochis,Shia's, Hindustanis, Brahmins, Rajputs and Marhattas spearsmen– men of low caste not to be admitted– Mussalmans, especially Syeds , Sikhs and Hindustanis to be preferred.**''

''No regular dress to be enforced: but if men will consent to wear cloth angrikas or turbans and kummerbands of uniform colour , they ought to be encouraged to do so: if not they must be required to wear some distinguishing mark in war, which must be often changed to prevent the enemy from taking it up.''

(संदर्भ 'पूना हॉर्सेस' पुस्तकातून.)

•••

परिशिष्ट २

१ जानेवारी १८१८च्या रात्री उसंत मिळताच कॅप्टन स्टाँटनने मदत मागविण्यासाठी एक पत्र लिहून काही घोडेस्वार सैनिकांद्वारे वरिष्ठांकडे रवाना केले.त्या पत्रातील संदर्भ पुढीलप्रमाणे

''We are completely surrounded by the Peishwa's army and cannot defend ourselves longer than tonight. We have lost many men and officers, send us aid, or we are all cut up tomorrow.''

•••

परिशिष्ट ३

३ जानेवारीला कॅप्टन स्टाँटन सैन्याला घेऊन शिरूरला पोचल्यावर त्याने त्याच्या कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल फिट्झीमानला लिहिलेल्या पत्रामध्ये त्याने ३१ डिसेंबर १८१७ पासून ते शिरूरला पोहचेपर्यंतचा सविस्तर अहवाल लिहून पाठविला. कॅप्टन स्टाँटनचा हा अहवाल दिनांक ९ जून १८१८ रोजी लंडन ग्याझेट या इंग्लंड मधील वृत्तपत्रात छापून आला होता, तसेच जॉन वायलीच्या 'स्केच ऑफ द कॉलम ऍट कोरिगम, विथ ए प्लॅन ऑफ व्हिलेज, सम लेटर्स प्रायव्हेट अँड पब्लिक, द जनरल ऑर्डर्स अँड द डिस्पॅच रीलेटिंग टू ॲक्शन ऑन द 1 जानेवारी 1818' या पुस्तकात देखील आहे. बॉम्बे कुरिअर न्यूजपेपर, भारत सरकार पुराभिलेखागार, इतर समकालीन ब्रिटीश पुस्तके अशा अनेक ठिकाणी या अहवालाचा संदर्भ मिळतो.

मूळ अहवाल खालीलप्रमाणे:

"To Lieutenant Colonel Fitzsimon,

Commanding &c. Seroor.

Sir, I have the honor to report, that in conformity to your instruction, I marked from Seroor at half past 8.P.M on the 31st December, in command of the following detachment, 2nd/1st Regiment about 500, two six-pounders, and about 250 Auxiliary Horse under Lieutenant Swanston.

Having proceeded on my way towards Poonah, as far as Corygaum by 10 A.M. on the 1st January, my further progress was arrested by the appearance (according to information then obtained) of the Peishwah, with a very large Army, supposed to be about 20,000 Horse and 8,000 infantry, with two heavy Guns; the whole formed on the opposite side of river Beemah ready to attack us. I continued my march till I reached the village of Corygaum, in which I determined to make a stand; and accordingly took post, selecting commanding situations for our two Guns. The enemy perceiving my intention sent three different bodies of Arabs, consisting of about 1,000 each under

cover of their Guns, and supported by large bodies of Horse for the same purpose; and I am sorry to say from their superior information of the nature of the village succeeded in the getting hold of its strongest post, and from which I was unable to dislodge them during the day. We continued incessantly engaged till 9 p.m. when we finally repulsed them.

At day-break on the morning of the 2nd day we took possession of the post the enemy had occupied the day before, but they did not attempt to molest us. On the evening of the 2nd despairing of being able to make my way good to Poona, and my men having been 48 hours without food, and no prospect of procuring any in the deserted Village we had taken post in, I determined upon the attempt to retreat; and having collected the whole of the wounded, secured the two Guns and one Tumbril for moving, I commenced my retreat at 7 P.M. being under the necessity of destroying one Tumbril, and leaving the Camp Equipage; under this explanation I trust I shall be deemed justified in the steps I have taken:- Our loss has been heavy indeed but not more so than might naturally be expected in a struggle like this, and is as follows:-

Killed - Lieutenant Chisholm, Artillery.
— Assistant Surgeon Wingate, 2nd Bat. 1st Regt.N.I.
Wounded - Lieutenant Pattinson dangerously.
— " Connellan { badly, but not dangerously.}
— " Swanston { "----------------------------"}
50 Men Killed 2nd Battalion 1st Regiment N.I.
12 ditto ditto Artillery.

Killed 62 do. do. (Artiliary Horse , not included.)

---

105 Men Wounded 2nd Battalion 1st Regiment N.I.
8 do. do. do. —Artillery.

Wounded 113
Total Killed and Wounded 175 men (Artillery Horse not included.)

In concluding this report I beg to assure you, that it is utterly impossible for me to do justice to the merits and exertions of the European officers, Native Commissioned and Non-Commissioned Officers and Privates, that I had the honor and good fortune to command on this trying occasion.

(Signed) F.F. Staunton, Capt. 1st Regt. B.N.I.

Seroor, 3rd January 1818. Commanding Detachment"

•••

परिशिष्ट ४

१ जानेवारी १८१८ कोरेगाव भीमा लढाईनंतर १८२२ साली लढाईत शौर्य गाजविलेल्या इंग्रज सैनिकांच्या स्मृतीप्रित्यर्थ मौजे पेरणे येथे इंग्रजांकडून जयस्तंभ उभारण्यात आला. सदर स्तंभ इंग्रजांच्या पुढाकाराने 'लष्करी स्मारक' म्हणून उभारण्यात आला. माउंट एल्फिन्सटन या अधिकाऱ्याने पुढाकार घेऊन २६ जून १८१८ रोजी वरिष्ठ अधिकाऱ्याला स्तंभाच्या उभारणीसाठी पत्र लिहून याबाबत सूचना केली. पत्रात तो लिहितो –

Sir,

I am certain I am performing an acceptable service to the Most Noble the Governor General in suggesting to his Excellency to commemorate by a monument at the public expense the heroic example of the officers and men who fell in the action at this village. I intended to have addressed his Excellency on this subject at the moment, but the impossibility of carrying on any work while the enemy was in force, obliged me to defer it till the conclusion of the war. I am not prevented from immediately ordering the monument to be begun on, by any doubt of the Most Noble the Governor General's approbation, but by my anxiety that the tribute to the memory of these gallant soldiers should be enhanced by its emanating from His Excellency's own authority and should be paid in his name.

The only suggestion I have to offer on the mode of carrying this design into effect is, that the name of every private soldier and sepoy should be recorded in English, Persian, and Mahratta.

I have the honor to be

Camp Corygaum, 26th June 1818. (Signed) M. Elphinstone

•••

परिशिष्ट ५

माऊंट एल्फिन्सटनने केलेल्या शिफारशीवर दि.१९ सप्टेंबर १८१८ रोजी चीफ सेक्रेटरी ऑफ गव्हर्न्मेंट, जे. ॲडम याने खालीलप्रमाणे उत्तर दिले.

To, The Honourable M. Elpinstone,

Sir,

I have received the command of the Governor General in Council, to acknowledge the receipt of your despatch of the 26th June, and convey to you, the full and cordial concurrence of His Lordship in Council, in the suggestion so laudably offered by you, of commemorating by a Monument at the public expense, the heroic example of the Officers and Men who fell in the action at Corygaum on the 1st of January.

The Governor General in Council accordingly requests, that you will without delay make known His Excellency's intention of paying this tribute to their Memory, and that you will be pleased to communicate to me for the consideration of the Governor General in Council, your sentiments as to the nature of the Monument most suitable to the spot on which it is proposed to erect it, and a rough estimate of the scale of expense which will be requisite, within reasonable limits, to render it worthy of the occasion.

Your suggestion that the name of every individual who fell in this Memorable contest should be recorded in the English, Persian, and the Mahratta Language, is highly approved and cordially adopted by His Lordship in Council.

(Signed) J. Adam,

FORT WILLIAM, the 19th Sept. 1818 Chief Secy. to the Govt.

•••

परिशिष्ट ६

दि. २२ मार्च १८२१ रोजीच्या पत्रामध्ये स्तंभाच्या पायाभरणीच्या संदर्भात नियोजनाचा खुलासा केला गेला.

To, William Chaplin Esqr., Commissioner, Poona.

It having been reported by Captain Nutt that he has prepared to Commence the Military Monument at Corygaum on the 26th Instant, I have the pleasure of informing you that the foundation will at his request be laid by me on that day; and I have ordered a Brigade of Guns and a Detachment of 200 Men of the 1st Batt. of the 1st or Grenadier Regt. from Poona to Corygaum in the honor of the occasion.

Head Quarters Poona, Division of the Army. Camp Seroor, 22nd March 1821

I have the honor to be., Sir Your Most Obedient Servant. (SIGNED)

•••

परिशिष्ट ७

जयस्तंभाच्या पश्चिमेची बाजू

THIS COLUMN IS ERECTED TO COMMLMORATE THE DEFENCE OF CORIGAUM BY A DETACHMENT COMMANDED BY CAPTAIN STAUNTON OF THE BOMBAY ESTABLISHMENT WHICH WAS SURROUNDED ON THE 1st OF JANUARY 1818 BY THE PAISHWAS WHOLE ARMY UNDER HIS PERSONAL COMMAND AND WITHSTOOD THROUGHOUT THE DAY A SERIES OF MOST OBSTINATE AND SANGUINARY ASSAULTS OF HIS BEST TROOPS.

CAPTAIN STAUNTON UNDER THE MOST APPALLING CIRCUMSTANCES PERSEVERED IN HIS DESPERATE RESISTANCE AND SECONDED BY THE UNCONOUERABLE SPIRIT OF HIS DETACHMENT AT LENGTH ACHIEVED THE SIONAL DISCOMEITURE OF THE ENEMY AND ACCOMPLISHED ONE OF THE PROUDEST TRIOMPHS OF THE BRITISH ARMY IN THE EAST TO PERPETUATE THE MEMORY OF THE BRAVE TROOPS TO WHOSE HEROIC FIRMNESS AND DEVOTION IT OWES THE CLORY OF THAT DAY THE BRITISH GOVERNMENT HAS DIRECTED THE NAMES OF THIER CORPS AND OTHE KILLED AND WOUNDED TO BE INSCRIBED ON THIS MANUMENT.

CCC XX II
SIMPSON & CL LEWELYN SCT'Ts
CALCUTTA

•••

परिशिष्ट ८

जयस्तंभाच्या पूर्वेची बाजू

NAMES OF CORPS AND EOROPEAN OFFICERS ENGAGED:

DETACHMENT OF MADRAS ARTILLERY

LIEUTENANT - W CHISHOEM (KILLED)

ASSISTANT SURGEON - J. WYLLIE,

110 BATT 1ST REGT BOMBAY NATIVE INEANTRY

CAPTAIN - FF. STAUNTON, LIEUTENANT - J. JONES, T. PATTINSON (KILLED), J. CONNELLAN (WOUNDED), ASSIST SURGEON - T. WINGATE (KILLED)

POONA AUXLLIARY HORSE

LIEUTENANT - SWANSTON (WOUNDED)

----LIST OF KILLED AND WOUNDED----

[KILLED = DETACHMENT OF MADRAS ARTILLERY]

SERJEANT, MARK BURKE, DORPORAL JOHN GORDON, GONNER WILLIAM CIBSON, MATROSSES, ROBERT SEAT, MICHAEL OBRIENT, THOMAS HORNSELY, MICHAEL HUGHES, JOHN BOYLE, PETER FLYNN, DEWIS HENDRICK, DENNIS DUINN.20, TINCAL JEMAUL, LASCAR GOVINDOO, SHAIK AHMED, DISSAN RAMSWAMY.

[110 BATT 1ST REGT BOMBAY NATIVE INFANTRY]

JEMADAR BAPPO SCINDEAH, GUNNAJEE GOWRAY, HAVILDAR CURRAG SING, NAIGUE ELMETER BALMETER, SONNAC CUMMULNAC, RAMNAC ESSNAC, PRIVATE PURSAD SING, BAPPOU SAWANT, LUXIMAN BONDOSA, GONDNAC COOTENNAC, RAM ESSNA, LAXIMON KOOADAH, BHAGNAC HORNAC, BAGOJEE NIER, AMNAC CANNAC, CANDOJEE, GOPALJEE, MOONDAH, GUNNAC SALNAC, SHOWANJEE ETTAKAR, SUDDY SING, SEW

BUCKAS SING, SUGNAJEE POMWAR, HANDOJEE JADDOW, BALNAC DHONONAC, ROOPNAC LUCKNAC, ETTNAC DHACKNAC, RANOJEE JAIDOW, ROBNAC RAMNAC, BALLOJEE SHEGWAN, RAZNAC GUNNAC, ABDUL CURSON, BOBNAC HUBNAC, ADJUZIE CHOWAN, RYNAC JANNAC, SUJUNNAC ESSNAC, GUNNAC DIRUMNAC, KATTAY KAWN, DEWNAC ANNAC, GOPALNAC BALNAC, PUMWANT MATER, HURNAC HIERNAC, MUNSHA RAM, ANNOJEE DARBEY, JETNAC DOWNAC, ESSRAM EDEKER, NEEDHAM SCING, GUNNAC LUCKNAC, SORET SGINE.

[POONA AUXILIARY HORSE] SILLADARS SHAICK EBRAM, SHAICK MATTOO, NUTTARY KHAN, SHAICK MAHOMED, APPAJEE, CUNDOJEE, GOPALLAH, MOKUND RAW, SUTWAJEE, DOOLOOBA, NAROOBA, EMAM KHAN, SHAICK ABDOLLA, RAMJEE NAICH, PIM SING, MYPUTTY, HYBUTTY EOTOBA, EMAN KHAN, GUNNESS SING, HURRY SING, DODAJEE, GUNGAJEE, NECKNAMA, BHOWANEY SING, BATT SIN, PARANJEE, SHAICK SHATTOO, WOOZEEN MAHOMED, KUNDE ROW, SHAICK LOLL MAHOMED, NUTTAY KHAN, DYSAM ETTOOJEE, RYEM KHAN, MOORJA MOOLLADEEN, ENOOJEE, DAWOOD KHAN, GUNGAJEE, ALLEY KHAN, HOOSSAIN KHAN, GODAJEE, LUXAMAN, ESSAGEE, RAMJANA, SUDDASHEE, LUXMAN.

[WOUNDED DETACHMENT OF MADRAS ARTILLERY] SERJT WILLIAM PIDGEON, JUNNER, JOHN TAYLOR MATROSSES, JOHN MURRAY, DANL McCARTHY, JOHN PAREIT, R-C-KING, RICH JUKES, JOHN BIRD, GUN LASCARS-SYRANG FUTTY MAHOMED, LASCARS IMAUM SAIB, NELIADUM, RAMROO, NENKUT CHELLUM, NINKAH SWAMY.

[110 BATT 1st REGT. B.N.I]

SUEEDAR DAVEY SING, JAMEDAUR BOAN MITTER,

GOND MITTER, SERJEANT-W DAVIS NAIGUE, TANOJEE SALOONKAY, DRUMMER-TANNAC HURNAC, PRIVATES-BHOOLA SCING, BUCKSOD SCINE, BHIDNAD, RUTTONNAC DHANNAC, BURSAR KHIER, MAHADJEE GOWLEY, BHISRAM SCING.

[POONA AUXILIARY HORSE] RUSSALDAR

MERAM GUNNEY, JEMIDAR BEEM SING, DUFFADAR VENCAT RAM RAJOO, SILLADARS HUNWOUNTA, SHAICK HASSIM, GOOLLAM RUSSOOL, SHICK JUMAUL, HASSAIN MAHOMED, GUNGA RAM, SIED BOODUM, HEERAPAH, EMAM ALLY, MYPUTTOO, HAMED SING, SHAICK MADDAR, HUSSAN MAHOMED, BAPPO BHOE, CHIMAJEE, RAMAH, BALDAJEE, MEER HOOSAIN ALLEY, BAGO JEE, ABDOOL CADER, FACKEER MAHOMED, MYAGEE DOOLJEE.

SIMPSON & CL LEWELYN SCTs
CALCUTTA

•••

परिशिष्ट १

ORIGINAL LETTER
Military Department N.3146
Bombay Castle 22nd November 1824

Sir,

The erection of the Pillar intended to commemorate the Battle of Corygaum having been completed, the Hon'ble the Governor in Council has resolved, in view to its preservation, that it shall be placed under the charge of a Meritorious Soldier of the Corps who may have been present at the action with the rank and Pay of a Jemadar.

I have, therefore, to convey the request of the Governor in Council that his Excellency the Commander in Chief will be pleased to direct Lt. Colonel Staunton to select one of the most deserving family men of the Grenadier Regiment, not being of the purvarree cast, for the trust in question one, who will be interested in the preservation of the building, and capable at the same time of affording Travellers information on the interesting subject which the monument is designed to commemorate.

The trust is to be considered hereditary, but, in case of the failure of any Male issue to the person enjoying the grant, it will rest with the Government to appoint a successor.

The grant of a Piece of Land contiguous to the Pillar, or of an annual sum of money (in addition to the rank & Pay of a Jemadar granted to the first Incumbent) will be assigned for the maintenance of person in charge.

True Copy Chief Sery. Chief Secretary

•••

परिशिष्ट १०

कॅप्टन स्टाँटन यांच्या सल्ल्याने कोरेगाव लढाईमधील शूरवीर सैनिक खंडोजी माळवदकर ज्यांनी लढाईतील मोक्याच्या क्षणी मराठ्यांच्या ताब्यात गेलेली तोफ मिळवून घेण्यासाठी शौर्य गाजविले, त्यांना जयस्तंभाचे प्रभारी (इनचार्ज)म्हणून नेमण्यात आले. दि. १३ डिसेंबर १८२४ रोजी गव्हर्नर जनरल यांनी खंडोजी माळवदकर यांच्या नावाने ऑर्डर दिली, ती ऑर्डर खालीलप्रमाणे,

GENERAL ORDER BY THE HONOURABLE THE GOVERNOR IN COUNCIL.

BOMBAY CASTLE, 13TH DECEMBER, 1824.

The erection of the Pillar intended to commemorate the Battle of Corygaum having lately been completed near the spot where the Action took place, the Hon'ble the Governor in Council is pleased, on the recommendation of Lieutenant Colonel Staunton, C.B who Commanded the British Troops on that memorable occasion, to appoint Cundojee Mullojee, now a Havildar in the 1st Company of Invalids, but late of 1st Battalion 2nd Regiment N.I , and wounded in the Action of Corygaum, to the charge of this Pillar, and to declare the trust to be hereditary in his Family for ever; but, in case of the failure of any male Issue to the Person enjoying the grant, it will rest with the Government to appoint a successor. Cundojee Mullojee is promoted to the Rank of Jemadar with the Pay and advantages of that Rank from this date, and will be borne on the Books of the Paymaster of the Poonah Division of the Army.

A piece of Land Adjacent to the Pillar, or an annual sum of Money, will be further assigned by Government for the further maintenance of the Person in charge of this trust.

By order of the Honourable the Governor in Council.

(Signed) W. NEWNHAM,

Chief Secretary."

•••

परिशिष्ट ११

दि.२६ मार्च १८२६ रोजी खंडोजी माळवदकर यांना कायदेशीररित्या स्तंभाशेजारील जमिनीचा हक्क मिळाला. दि.२६ मार्च १८२६चे कोर्ट डीसपॅच खालीलप्रमाणे,

ORIGINAL LETTER

Extract from the Court dispatch, dated 26th March 1826.

The pillar erected at Corygaum to commemorate the gallant defence of that village by the 2nd Grenadian N.I. Regi. placed under charge of Havaldar of Native Invalids who was present at the action with the Rank and pay of Jemadar and a piece of ground contiguous to the Pillar,yielding 200 Rupees per annum granted to that individual, and his male heir for ever, but in the event of his dying without male issue, the appointment of a successor will rest with the Government.

•••

परिशिष्ट १२

दि. ७ डिसेंबर १८४१ रोजी खंडोजी माळवदकर यांना इनाम म्हणून अधिक जमीन देण्यात आली. त्याची मूळ सनद खालीलप्रमाणे :

To, Jemadar Khandoji bin Gazujee Malivutkar Patell of Mouza Jejooree Turff Curra Puttar Purgunnab Poorundher and Resident at Koregaon Turff Paubul.

Known to you that Government have erected an obelisk on the southern banks of Bheema in the lands of village Pairna, opposite to the village of Koregaon purgama paubal in order to communicate the successful defence of the latter village on the 1st January 1818, by a small british detachment against the whole army of the Peshwa Bajeerow , commanded by himself in person; and the Hon'ble Governor in Council was further pleased to issue a General Order dated the 13th December 1824, stating that, at the recommendation of Lt. Colonel Staunton C.B. who commanded the British troops at the Battle of Koregaon, Government had appointed you, then Havaldar in the 1st Company of Invalid but previously of the 1st Battalion 2nd Regiment Infantry, and who had been wounded in the action, to take charge of the Pillar and further to promote you to the rank of Jemadar and to assign you a piece of land for the maintenance of yourself and the persons who may succeed you in this trust. The following pieces of land are therefore assigned to you in Pune-Koorum being, No.s 12, 137, 139 & 140 of the piece of land situated at the village Pimpri Sandas consisting of 52 acres and 29 Goontas assessed at Rs.49.

Piece of disputed land no. 165 between the village of Waree Kesnund and Bakori included in the accounts of the village of Kesnund consisting of 47 acres and 31 Goontas assessed at Rs.42.

Kooran No. 162, 163 and 164 situated at the village of Kesnund consisting of 96 acres and 6 Goontas assessed at Rs 78.

Kooran No. 195, 196, 197 and 198 situated at the village of Bholaee consisting of 63 acres and 31 Goontas assessed at Rs. 45.

Total No. of acres 260 and 17 Goontas. Rs. 215.

You and your successors are therefore to enjoy the produce of the lands about specified, to take care of the obelisk and preserve it and the enclosure which surrounds it, and tree which have been planted therein, from all injuries which it is in your power to prevent and your not to permit any ceremony to be instituted in connection with the monument. The charge of the obelisk and the above lands, the produce of which is assigned as a remuneration for the charge are declared hereditary in your family forever, but in case of failure of your male issue, it will rest with Government to appoint a successor.

The above lands not having been selected and put into your position at the time of issuing the General Order, you have received arrears in cash from the Government treasury and your possession of the land will be held to commence from the present year 1841/42 fuslee 1251.

•••

परिशिष्ट १३

माऊंटस्ट्यूअर्ट एल्फिन्स्टन याला जेव्हा कोरेगावच्या लढाईबद्दल बातमी कळते तेव्हा त्याने त्याबद्दल लिहिलेलं दि. ०३-०१-१८१८ रोजीचे सकाळचे पहिलं पत्र.

ORIGINAL LETTER:

03 January 1818 Camp Chankan,
Sir,
The Paishwa I am afraid has succeeded in cutting off the 2/1, a weak battalion on its march from Seroor to Poona. This will make the enemy more enterprizing and will require you to be more on your guard. It will also render it desirable that you should march as soon as possible on Seroor, weather General Smith will also proceed & where a new distribution of the whole force can be made, situated to present circumstances.

I HAVE THE HONOR TO BE.,
(SIGNED) M.ELPHINSTONE Rest.

If the 2/15 should be within reach I hope you will have recalled it, General Smith is very anxious it should have joined you, as you will require very strong flanking parties to protect your baggage.

•••

परिशिष्ट १४

माऊंटस्ट्यूअर्ट एल्फिन्स्टनने सकाळी लिहिलेल्या पत्रानंतर तो कोरेगाव येथे जातो आणि त्यादिवशी दि. ०३-०१-१८१८ रोजी संध्याकाळी त्याने लिहिलेले दुसरे पत्र.

ORIGINAL LETTER:

Brigadier General Pritzler, Camp Corygaum
January 3rd 1818.

Sir,
When I wrote to you this morning I was induced by the distinct report of the Natives corroborated by the opinion of the officer commanding at Poona and the reports of Commanding officer of the 2/1 Battalion to believe that the 2/1 Bombay Native Infantry had been cut off by the Paishwa, and that His Highness was likely to endeavour to maintain his ground in this part of the country. It now appears that the Battalion though it suffered severe loss maintained it's position and it repelled the attacks of the Paishwa's whole army, until the approach of General Smith compelled him to fly with his usual precipitation. His Highness was yesterday evening at Loni below the Little Bore Ghant which he has probably ascended today. It is possible that you may have set out in pursuit of him on receiving intelligence of his approach in that case it would be advisable that you should continue the pursuit without relaxation but if when you receive this letter you should be at Pairgaum or to the North of it, and should have no immediate prospect of ** a blow at the enemy. I would recommend you not now engaging in the pursuit, but proceeding to Seroor and I before requested.

I have the honor to be.,
(Signed) M. M.ELPHINSTONE Rest.

•••

संदर्भसूची

Political journal (German language) Published in 1818

The journal of a route. Across India, through EGYPT to ENGLAND in the letter end of the year 1817 and the beginning of 1818: Published in 1819

The Asiatic Journal and Monthly Register for British India an It's Dependencies volume 7 (July to December) Published in 1821. (London)

Memoir of the operation of the British Army in India , during the Mahratta war of 1817 , 1818 and 1819.Published in 1821 . (London)

The East India Military Calendar Containing the Services of General and field officers of the India Army Published in 1823. (London)

The Asiatic Journal and Monthly Register for British India and its Dependencies. Volume 19 (January to June) Published in 1825. (London)

A History of the Mahrattas. Volume 3.Published in 1826. (London)

The East India Military Calendar Containing the services of General and field officers of the India Army volume. 3.Published in 1826 (London)

History of the rise and progress of the British power in India. Volume 2.Published in 1837 (London)

Sketch of the column at Corygaum.Published in 1839

Gazetteer of the Bombay presidency volume 8. Part 3.Published in 1885.

The last of the Peshwas.Published in 1907.

Selection from the Satara Raja's and the Peshwas diaries. V. Bajirao 2.Published in 1908.

Poona in Bygone days. Published in 1921

History of modern India British period part 1) Published in 1923.

India China etc. by Thomas Carter medals of the British Army. Page number 33

England's battles by sea and land. Volume 3 1857 - 1859.Page number 199 209 210. Corygaum.

History of tha services of Madras artillery. volume 1 1852.Page number 37 42 43 44 45 46. Corygaum.

The Illustrated history of the British Empire in India. Volume 2.Page number 522, 523.

Chambers Encyclopedia: volume 3: 1873.Page number 261.

The east India Company: 1874,Page number 16

The history of the British Empire in India: 1859, Page number 442.

The cyclopedia of India : 1885.Page number 818 , 1023.

The history of England from 1760 to 1837. volume VI 1855.Page number 291 , 292.

The modern traveler. Volume 3 - 1828.Page number 11 ,12 ,13 , 14 ,15.

Bishops Wilson's Journal letters - 1863. page number 113. Koreigaum

Bentley's Miscellany. Volume XLll 1857.Page number 581 , 582.

Or military and Naval encyclopedia - 1879.Page number 200.Corygaum

History of the Indian Navy 1877.Page number 379 , 380.

A popular history of British India. 1842.Page number 264 , 265.

A soldier's Reminiscences of native and European life in the presidencies. 1839.

Page number 234 , 235.

London Gazetteer newspaper - 9 June 1818.

Bombay Gazetteer newspaper - 22nd December 1824

History of the Mahrattas- James Grant Duff

The Marathas 1600–1818- Written by- Stewart Gordon

2nd Battalion 4th Bombay Grenadiers (King Edwards Own) formerly The 102nd King Edward's Own Grenadiers. Published in 1933

A dictionary, Marathi and English complied by J.T.Molesworth assisted by George and Thomas Candy. Published in 1857.

A Glossary of Judicial and Revenue terms and of useful words occurring in official documents relating to the administration of the Government of British India by H.H.Wilson.

A handbook for India, Part 2-Bombay. Published in 1859

The appeal of Lieut. Colonel Charles Barton Burr, C.B. of the Bombay Infantry Establishment to his Excellency the Most Noble The Marquis of Hastings, K.G. Published in 1819

The Asiatic Journal and monthly register for British India and its dependencies: Vol. 6 From June to December 1818. Published in 1818

Bulletins of State Intelligence, 1818.

Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches Vol.17 Part 3.

Military Duties of Amry Surgeons Page. 28, 29.

Gazetteer of the Bombay Presidency Vol. 18 Part 2. Published 1885

Handbook of the Bombay Presidency with an account of Bombay City. Published in 1881.

Regimental Colours with two war trophies Published in 1922

Cassel's illustrated History of India. Published in 1890.

History of the Indian Navy Vol.1. Published in 1877

History of the services of the Madras Artillery Vol.1. Published in 1852.

Illustrated Naval and Military Magazine Vol.2. Published in 1885.

Medals of the British Army by Thomas Carter

Life of the Honorable Mountstuart Elphinstone By Sir.T.E.Colebrooke Vol. 2. Published in 1884

Catalogue of a Very Valuable Collection of Coins and Medals.

Catalogue of the Valuable Collection of Naval and Military Medals and Decorations.

A Military and Naval Encyclopedia. Published in 1879

Papers respecting the Pindarry and Mahratta Wars. Published in 1824.

Appendix to the Report of the select committee of the house of Lords. Published in 1830

Political or Foreign, Appendix to the Report from the select committee of the House of Commons. Published in 1833.

The Annals of Indian Administration. Published in 1856.

The Claims of the Army of the Deccan Part 1.

The Indian News and Chronicle of Eastern Affairs. 2nd January 1851.

The Life of John Wilson. 1878.

The Naval and Military Heroes of Great Britain. 1860.

The Poona Horse Vol. 1. 1933.

Thirty years in India By Major H.Bevan. 1839.

Treaties and Engagements with Native Princes and States in India.

Report from Commissioners Vol.11.

The Tribes and Castes of Bombay Vol.2. 1922.
Pune Archive's (Government of Maharashtra)
Mumbai Archive's (Government of Maharashtra)
National Archive's of India
British Library London.
Bombay Gazetteer Vol.33, Wednesday, September 18,1822, No.1685.
Bombay Courier Vol. XXVIII , Saturday, February 14, 1818, No. 1329
Dalit Movement in India and its leaders- Ramchandra Kshirsagar

मराठी संदर्भ

मराठ्यांच्या लढायांचा इतिहास - १९२८
मराठी रियासत - उत्तर विभाग ३ - १९३२
मराठी राज्याची अखेर - १९३४
डॉ. भीमराव रामजी आंबेडकर - खंड १ व ९ , लेखक - चांगदेव खैरमोडे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर (चरित्र) लेखक- धनंजय कीर
भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोष-विद्यानिधी -सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
पेशव्यांच्या रोजनिशीतील उतारे -१९३२
बापू गोखले यांचे चरित्र -१८८९
कोरेगाव भीमा ते वढू बुद्रुक -कॉम्रेड भीमराव बनसोड (संपादक)

वृत्तपत्र संदर्भ

"*Controversy over 'Roll of Honour' tile put up by Army on Bhima Koregaon 'Jaystambh*"- चंदन हायगुंडे, सुशांत कुलकर्णी - इंडियन एक्सप्रेस, 22 डिसेंबर 2017

"*Chronologically 'Jai Bhim' is older than 'Jai Hind': Experts*"- आशिष त्रिपाठी, अरुणव सिन्हा-टाइम्स ऑफ इंडिया, 18 एप्रिल 2016

ब्लॉग

Gktoday Blog for Martial Race Theory
Esamskriti Blog part 1,2,3 for Koregaon Bhima Battle

•••

नोंदी



कोरेगाव भीमाची लढाई ही १८१७– १८१८ दरम्यान तिसरे इंग्रज–मराठा युद्ध झाले, त्यातील एक घटना आहे. नोव्हेंबर १८१७ मध्ये झालेल्या खडकी आणि येरवडा येथील लढाईनंतर आणि फेब्रुवारी १८१८ मधील आष्टी येथील लढाईपूर्वी, १ जानेवारी १८१८ रोजी कोरेगाव भीमा परिसरात इंग्रज आणि मराठा सैन्य आमने सामने आले आणि लढाई झाली. इंग्रजांचे नेतृत्व कॅप्टन फ्रान्सिस स्टाँटनकडे होते. बॉम्बे नेटिव्ह इन्फन्टरी, मद्रास आर्टिलरी आणि पूना ऑक्सिलरी हॉर्स या पलटणी इंग्रजी सैन्यात होत्या. त्यांच्या सैन्यात विविध जाती धर्माचे सैनिक होते. मराठा सैन्यातही विविध जाती धर्माचे सैनिक होते. कोरेगाव भीमाची लढाई चालू असताना स्वत: सातारचे छत्रपती प्रतापसिंह भोसले हे दुसरे बाजीराव पेशवे यांसह फौजेसोबत होते. तिसरे इंग्रज–मराठा युद्ध व कोरेगाव भीमाच्या या अनिर्णायक लढाईचे तत्कालीन अस्सल संदर्भ, कागदपत्र उपलब्ध आहेत. त्यांचा अभ्यास केल्यास ही जातीअंताची लढाई नव्हती हे समजते. स्वतः भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनीही कोरेगावच्या युद्धास जातीअंताची लढाई कधीच म्हटलेले नाही. याउलट जातीवादी कारणांमुळे महार बांधवाना इंग्रजांनी आपल्या सैन्यात प्रवेश बंदी केली म्हणून कोरेगावच्या लढाईच्या स्मरणार्थ इंग्रजांनी जयस्तंभ उभारला तिथेच सभा घेऊन १ जानेवारी १९२७ रोजी डॉ आंबेडकरांनी इंग्रजांच्या विरोधात आंदोलन पुकारले. तरीही जातीअंताच्या नावाखाली समाजात जातीय तेढ निर्माण होईल अशा पद्धतीने कोरेगावच्या लढाईचा खोटा इतिहास मांडला जात आहे. या लढाईत शौर्य गाजविणारे खंडोजीबीन गजोजी माळवदकर यांना इंग्रजांनी जयस्तंभाचे इन–चार्ज नेमले. त्यांचा वंशज या नात्याने खरा इतिहास समोर यावा, सामाजिक सलोखा कायम राहावा या उद्देशाने संदर्भ पुराव्यांच्या आधारे दोन शतकांपूर्वी झालेल्या कोरेगाव भीमाच्या लढाईचे वास्तव सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न या पुस्तिकेच्या माध्यमातून केला आहे.

ॲडव्होकेट रोहन बाळासाहेब जमादार (माळवदकर)

ISBN



भूमिका प्रकाशन

मूल्य ₹: ६०/-